## जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली, रुग्णालयात दाखल

जालना, दि.१० प्रतिनिधी

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज जालन्यात सकल मराठा समाज आणि मराठा संघटनांकडून जनआक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला. या मोर्चामध्ये देशमुख कुटुंबीय, मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील, दीपक केदार यांच्यासह समाज बांधव सहभागी झाले होते. परंतु या मोर्चात मनोज जरांगे यांचे भाषण झाले नाही. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खराब आहे. त्यामुळे त्यांनी मोर्चाच्या आयोजकाना मी बोलणार नाही. माझी तब्येत खालावली आहे, असे सांगितले होते. त्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांना उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २८४ * | * नागपूर * | शनिवार, दिनांक ११ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


### संपादकीय
### खरीखरी

## नेहमीची फाटाफूट

इंडिया आघाडी फक्त लोकसभेसाठी होती, असे आता काँग्रेसने स्पष्ट केलेले आहे. काँग्रेसचे पवन खेडा यांनी या गोष्टीवर शिक्कामोर्तब केल्यावर आता इंडिया आघाडीचे विविध पक्ष आपापल्या मनाप्रमाणे आणि मताप्रमाणे राजकारण करतीलच. प्रश्न असा आहे की, इंडिया आघाडीतील घटक पक्ष अनेक राज्यात परस्परांच्या विरुद्ध उभे राहतात. त्यामुळे म्हणा किंवा अंतर्गत मतभेदामुळे म्हणा इंडिया आघाडीचे विघटन होते. हे जवळजवळ ठरलेलेच आहे. काँग्रेस पक्ष या आघाडीतील देशभरात पसरलेला सर्वाधिक मोठा पक्ष होता. काँग्रेसची सर्व धोरणे इंडिया आघाडीतील इतर घटकांना किंवा घटक पक्षांना मान्य नव्हती. राहुल गांधींचा अदानी विरोध अनेक राज्यांना पचला नाही. काँग्रेस आधीपासूनच जवळजवळ अलिप्त होती. लोकसभेतील इंडिया आघाडीमध्ये सध्या पश्चिम बंगालने स्वतःची वेगळी वाट चोखाळली होती. काँग्रेसला पश्चिम बंगालमध्ये दारूण अपयशाला सामोरे जावे लागले. तीच परिस्थिती उत्तर प्रदेशातील सपाबद्दल उद्भवली. लोकसभेत खांद्याला खांदा लावून लढणारे राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांची मैत्री आता जवळजवळ भंगली आहे. आम आदमी पक्षाबद्दल तर बोलायलाच नको. त्यांनी काँग्रेसच्या मतावरच डल्ला मारल्याने दिल्लीतील काँग्रेसजन आम आदमी पक्षाचा घोर विरोध करीत आहेत. एकूणच आपल्या देशातील विरोधी पक्ष आतापर्यंत आपसातच फाटाफुटीचे राजकारण करीत होते. एक तर या आघाडीतील सर्व पक्षांनी सर्वमान्य नेता कोण हे कधी ठरवलेच नाही. आधी अशी आघाडी करण्याची कल्पना बिहारच्या नितीश कुमार यांनी काढली होती. त्यांनीच अनेक राज्यांचा दौरा करून ही आघाडी एकजीव होईल. अशी आशा करत नवीन कल्पना मांडली होती. पण दोन-तीन सभा झाल्यानंतर नितीश कुमार यांच्या नेतृत्वावर सहमती न झाल्यामुळे नितीश कुमार यांची मती फिरली आणि ते सहजच एनडीएवासी झाले. इंडिया बसलेला तो पहिला झटका होता. किंबहुना नितीश कुमार यांचा पक्ष बदल झाला नसता. तर एनडीएला बिहारमध्ये देदीप्यमान यश मिळालेच नसते. एकूणच या इंडियातील घटक पक्षांची गोळा बेरीज केल्यावर असे दिसते आहे की, हे सर्वच पक्ष सैरभैर झालेले आहेत. भारतीय जनता पक्षाला संपूर्ण बहुमत मिळालेले नसले. तरी आता या सरकारला फारसा धोका दिसत नाही. काँग्रेस पक्ष म्हणा किंवा इतर पक्ष म्हणा. निवडणुका जवळ आल्या म्हणजे त्यांच्या हालचाली सुरू होतात. काँग्रेस पक्ष बलाढ्य असताना त्याचा फायदा त्या पक्षाला मिळत होता. आता ती जागा भारतीय जनता पक्षाने घेतलेली आहे. दक्षिण भारतामध्ये याच पक्षाला म्हणजेच भारतीय जनता पक्षाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नसला, तरी संपूर्ण देशव्यापी किंवा राष्ट्रव्यापी पक्ष म्हणून आता भारतीय जनता पक्षाला स्थान देण्यात येते. एनडीएसोबत छोटे-मोठे अनेक्ष पक्ष असले. तरी त्यापैकी कोणताही पक्ष सरकारच्या पाठिंबा काढण्यास तयार होईल, असे सध्यातरी अजिबात वाटत नाही. अशा सर्व परिस्थितीमध्ये यापुढे इंडिया आघाडीतील घटक पक्ष पुढील लोकसभेच्या निवडणुकीआधी चुंबाचुंबी करतील. पण जोपर्यंत या पक्षांचे 'स्थायी' मनोमीलन होत नाही. तोपर्यंत भारतीय जनता पक्षाला किंवा एनडीएला कोणताही धोका नाही, असेच दिसते.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


## त्यावेळी जे पंतप्रधान असतील त्यांच्या हस्ते स्मारकाचे उद्घाटन होईल - उद्धव ठाकरे

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचं कामकाज कुठपर्यंत झालं हे पाहण्यासाठी स्मारकस्थळी भेट दिली. शिवसेनाप्रमुखांच्या स्मारकाच्या कामकाजाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता दुसऱ्या टप्प्यात काम सुरु होईल. या दोन्ही टप्प्यांचं कामकाज 23 जानेवारी 2026 च्या आधी पूर्ण होईल, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. यावेळी उद्धव ठाकरे यांना शिवसेनाप्रमुखांच्या स्मारकाच्या उद्घाटनावेळी कोण-कोण येईल? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी त्यावेळी जे पंतप्रधान असतील त्यांच्या हस्ते स्मारकाचं उद्घाटन होईल, असं उत्तर दिलं. यानंतर त्यांनी आणखी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं. 'राजकारणात उद्या काय होईल ते सांगता येईल का?', असं वक्तव्य त्यांनी केलं.

"त्यावेळी जे पंतप्रधान असतील ते उद्घाटनाला येतील", असं उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी पत्रकारांनी त्यांना कोण पंतप्रधान असतील? असं विचारलं. त्यावर त्यांनी "उद्या काय होईल हे आज सांगता येत नाही. एनडीएचं सरकार असेल तर ते लोक येऊ शकतात. त्यावेळी जे सरकार असेल ते लोक येतील. भूमिपूजनाच्यावेळी मी मुख्यमंत्री होतो. आता नाही", असं उद्धव ठाकरे म्हणाले.



### 'या वास्तूसह आम्ही एक भावनात्मक बंधनासह जोडले गेलो'

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकात आपलं स्वागत करताना आनंद होतोय. या स्मारकावर काम सुरु आहे आणि चर्चादेखील सुरु आहेत. मी आर्किटेक्ट आभा लांबा आणि टाटा प्रोजेक्ट यांना धन्यवाद देऊ इच्छितो. हे काम आता फार सोपं वाटतंय. पण करताना फार कठीण होतं. माजी मंत्री सुभाष देसाई आणि आदित्य ठाकरे यांनी या जागेचं महत्त्व सांगितलं. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचं स्मारकही बाजूलाच आहे. पण या जागेतला आव्हान म्हणजे, एक महापौर बंगला. या बंगल्याला आम्ही केवळ वास्तू म्हणून बघत नाहीत तर त्या वास्तू बरोबर आम्ही एक भावनात्मक बंधनासह जोडले गेलो आहोत, अशी भावना उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.

"आताच इथे शिवसेनेचे चार महापौर या वास्तूत राहिले होते. ते आपल्यासोबत इथे उपस्थित आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या अनेक बैठका इथे झाल्या आहेत. महायुतीच्या बैठका इथे झालेल्या आहेत. ही वास्तू हेरीटेज वास्तू आहे. या वास्तूला कुठेही धक्का न लावता काम करणं खूप कठीण होतं. त्या वास्तूचं वैभव जपून काम करणं हे फार कठीण होतं. हेरीटेद म्हटल्यावर काही नियम असतात. त्यामुळे सीआरझेडचा कायदा आला", असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### 'ही वास्तू उभी करणं हे आव्हानाचं होतं'

"मग आम्ही असं ठरवलं, ही कल्पना आर्किटेक्ट आभा लांबा यांची आहे. स्मारक भूमिगत करुयात. हे बोलायला खूप सोपं आहे. बाजूला समुद्र आहे. त्या समुद्राचा रेटा हा जमिनीखालून ही खूप असतो. काही वर्षांपूर्वी इथे आपण संयुक्त महाराष्ट्राचं दालन केलं. पण ते दालन झाल्यानंतरही तिकडे रिपेअरिंग करायची गरज लागली. कारण समुद्राचं पाणी जमिनीखालून सर्व मर्यादा ओलांडून येत होतं. त्यामुळे ती खबरदारी घेणं, त्यानंतर ती वास्तू उभी करणं हे आव्हानाचं होतं. त्यामुळे मी आर्किटेक्ट आभा लांबा आणि टाटा प्रोजेक्ट्स यांचा आभारी आहे. त्यांनी अत्यंत देखणं काम वेळेमध्ये टप्पा 1 पूर्ण केलेला आहे", अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

### शिवसेनाप्रमुखांनी आत्मचरित्र का लिहिलं नाही?

"टप्पा 2 च्या कामाला आता सुरुवात होईल. या कामातून संपूर्ण शिवसेनाप्रमुखांचा जीवनपट बघायला मिळणार आहे. अर्थात तो मुक्त असा जीवनपट नाही. शिवसेनाप्रमुखांनी कधी आत्मचरित्र लिहिलं नाही. त्यांना अनेकदा विचारलं की तुम्ही आत्मचरित्र का लिहित नाहीत, त्यावेळी त्यांनी उत्तर दिलं की, मी कपाटातला माणूस नाही. मी मैदानावरचा माणूस आहे. त्यामुळे त्यांचं आयुष्य उघडं पुस्तक होतं. पण ते नुस्त मांडणं म्हणजे स्मारक नाही. मी असा विचार केला की, शिवसेनाप्रमुखांचं स्मारक असं झालं पाहिजे की, जे शिवसेनाप्रमुखांनी आयुष्यभर महाराष्ट्राला, देशाला आणि देशातील हिंदूंना दिलं, तेच काम त्यांच्या स्मारकाने सुद्धा पुढचे अनेक वर्ष दिलं पाहिजे", असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

## ब्लॅकमेल करणे योग्य नाही, ज्यांना जायचे त्यांनी जा

### उद्धव ठाकरेंची ठाम भूमिका

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

मुंबईतील आगामी निवडणुकांच्या तयारीसाठी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आढावा बैठकीत पक्षातील काही जुन्या नगरसेवकांनी आपल्या नाराजीचा सूर उंचावला. या नाराज पदाधिकाऱ्यांना उत्तर देताना उद्धव ठाकरेंनी ठाम भूमिका घेत "अडचणीच्या काळात पक्षाला ब्लॅकमेल करणं योग्य नाही. ज्यांना पक्ष सोडायचा आहे, त्यांनी खुशाल सोडावा," असे स्पष्ट शब्दांत सांगितले.

या बैठकीत नगरसेवकांनी ठाकरे गटाच्या नेतृत्वावर नाराजी व्यक्त करत काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. मातोश्रीवर होणाऱ्या पदाधिकारी आढावा बैठकीत माजी नगरसेवकांना बोलवले जात नसल्याची तक्रार करण्यात आली. तसेच विधानसभा निवडणुकीदरम्यान उमेदवारी निश्चित करताना माजी नगरसेवकांना विश्वासात घेतले गेले नाही, अशी नाराजी एका नगरसेवकाने जाहीर केली.

अखंड शिवसेना असताना अशा प्रकारे उघड उघड नाराजी प्रकट करण्याची ताकद कोणत्याही पदाधिकाऱ्यांमध्ये याआधी कधीच नव्हती. विधानसभा निवडणुकीमध्ये ठाकरे गटाला मोठ्या प्रमाणात फटका बसला त्यानंतर पक्षाच्या धोरणांबद्दल उघडपणे नाराजी प्रकट करण्याची ही पहिलीच वेळ आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये नाराजांपैकी अनेक जण शिवसेना शिंदे गट तसेच भाजपच्या संपर्कात आहेत. यापैकी अनेक जण भाजपकडून उमेदवारी मिळवून निवडणुका लढवू देखील शकतात.

या तक्रारींवर उद्धव ठाकरे यांनी कडक भूमिका घेत नाराजांना धीर देण्याऐवजी पक्षाच्या बांधिलकीवर भर दिला. त्यांनी म्हटले की, "पक्ष अडचणीत असताना निष्ठा दाखवण्याची गरज असते. जो संघर्ष करतो, तोच खरा शिवसैनिक आहे."

आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या नाराजीचा पक्षाच्या तयारीवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो. मात्र, उद्धव ठाकरेंनी घेतलेली ठाम भूमिका पक्षातील अस्वस्थतेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न आहे. आगामी निवडणुकीत ठाकरे गट कसा पुढे जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीत लढल्या जाणार

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून महायुतीचे संकेत

ठाणे, दि.१० प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाने महायुतीत लढवून राज्यात सत्ता स्थापन केली असली तरी, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मात्र तिन्ही पक्ष स्वबळावर लढवतील, अशी चर्चा रंगली आहे. असे असतानाच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीचे संकेत देत विधानसभा निवडणुकीनंतर आता महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद अशा निवडणुकांमध्ये महायुतीचा भगवा फडकवायचा असल्याचे स्पष्ट केले आहे.



राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, जिल्हा परिषद अशा सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांची पंचवार्षिक मुदत काही वर्षांपुर्वीच संपुष्टात आली आहे. या सर्वच ठिकाणी प्रशासकीय राजवट अस्तित्वात आली असून प्रशासनामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सुरू आहे. काही पालिकांच्या निवडणुका तीन ते चार वर्षांपासून होऊ शकलेल्या नाहीत. या निवडणुका कधी होणार, याविषयी अद्याप स्पष्ट झालेले नाही. सहा महिन्यांपुर्वी लोकसभा निवडणुका पार पडल्या आणि त्यानंतर विधानसभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांनंतर येत्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, अशी चर्चा रंगली आहे. या निवडणुका राजकीय पक्ष स्वबळावर लढणार की युती-आघाडीत लढणार याविषयी वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) पक्षाने महायुतीत तर, शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि काँग्रेस या पक्षांनी महाविकास आघाडीत निवडणुका लढविल्या. या निवडणुकीत महायुतीने मोठे यश संपादन करत राज्यात सत्ता स्थापन केली. असे असले तरी, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) हे तिन्ही पक्ष स्वबळावर लढतील, अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. असे असतानाच, महायुतीतील शिवसेना पक्षाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका कशा लढल्या जातील, याविषयी ठाण्यातील कार्यक्रमात बोलताना स्पष्ट केले आहे. काहीजण म्हणत होते की, सुप्रीम कोर्ट झाले आता जनतेच्या न्यायालयात जाऊ. पण, विधानसभा निवडणुकीत आपले ६० आमदार निवडुण आल्याने खरी शिवसेना कुणाची हे जनतेने ठरवले. काही जणांना स्वप्न पडले होते. त्यांनी मंत्रीमंडळही तयार केले होते. हॉटेलही बुक केले होते. पण, जनतेने आणि लाडक्या बहिणींनी त्यांचे बुकींग रद्द केले, असा टोला शिंदे यांनी लगावला. लाडकी बहिण, भाऊ, शेतकरी, युवक, जेष्ठ अशा सर्वांनी भरभरून मतांचा वर्षाव केला आणि मी सांगत होतो, त्याप्रमाणे विरोधक चारही मुंड्या चीत झाले. आता विधानसभा निवडणुकीनंतर आता महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद अशा निवडणुकांमध्ये महायुतीचा भगवा फडकवायचा आहे, असे सांगत त्यांनी महायुतीचे संकेत दिले आहेत.

## खरी शिवसेना ही ठाकरेंचीच

### भाजपमध्ये प्रवेशानंतर ठाकरे गटाच्या माजी नगरसेवकांचे वक्तव्य

पुणे, दि. १० प्रतिनिधी

पुण्यातील शिवसेना ठाकरे गटाच्या 5 माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पक्ष प्रवेश झाल्यानंतर पाचही नगरसेवकांनी पुण्यातील भाजप कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. या पहिल्याच पत्रकार परिषदेत खरी शिवसेना ही उद्धव ठाकरे यांचीच असल्याचं भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नगरसेवकांनी ठासून सांगितलं आहे. त्यामुळं आता महायुतीच्या स्थानिक नेत्यांमध्ये वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे.

पुण्यातील पाच माजी नगरसेवकांनी ठाकरेंना अखेरचा जय महाराष्ट्र केला आहे. विशाल धनवडे, प्राची आल्हाट, बाळा ओसवाल, संगीता ठोसर आणि पल्लवी जावळे या पाचही माजी नगरसेवकांनी मुंबईत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर पुण्यात आज पत्रकार परिषद घेतली. यामध्ये त्यांनी खरी शिवसेना ही ठाकरेंचीच असल्याचं सांगितलं. आता नव्याने भाजपात दाखल झालेल्या या नेत्यांच्या वक्तव्यामुळे पुण्यातील महायुतीत मिठाचा खडा पडला आहे. खरी शिवसेना ही ठाकरेंचीच आहे.





पण जे काही राजकारण सुरु आहे ते चालूच राहील असं वक्तव्य विशाल धनवडे यांनी केलं. आमच्या पक्षप्रवेशाच्या पहिल्याच दिवशी आम्ही सांगितलेले आहे. ज्या पक्षामध्ये आम्ही 25 वर्ष होतो तो पक्ष वाढवण्यासाठी आम्ही जे प्रयत्न केले ते अतिशय प्रामाणिक होते. त्यामुळं त्या पक्षाविषयी आमच्याकडून कोणताही चुकीचा शब्द जाणार नाही असे धनवडे म्हणाले. शिंदे यांनी शिवसेना चोरली हे आत्तापर्यंत तुम्ही बोलत होतात त्यावर तुम्ही ठाम आहात का? असा प्रश्न विशाल धनवडे यांना विचारण्यात आला. यावेळी धनवडे म्हणाले की, 100 टक्के आम्ही आजही त्यावरच ठाम आहोत. मात्र, न्यायालयात जो काही निकाल लागेल त्याला आम्ही सामोरे जाऊ असेही धनवडे म्हणाले. भाजपमध्ये प्रवेश करण्यापूर्वी माजी नगरसेवक विशाल धनवडे, बाळा ओसवाल आणि पल्लवी जावळे यांनी मुंबईत देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर धनवडे आणि ओसवाल यांनी समाज माध्यमांतून आपली भूमिका स्पष्ट करताना पक्षांतर करणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर मुंबईच चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर आज त्यांनी पुण्यात भाजप कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी खरी शिवसेना ही ठाकरेंचीच असल्याचं सांगितलं आहे. त्यामुळं पुण्यात शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते आक्रमक होण्याची शक्यता आहे. भाजपात प्रवेश केलेल्या नगरसेवकांच्या वक्तव्यावर शिंदे गटाचे कार्यकर्ते काय बोलणार याकडं आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## धनंजय मुंडेनी घेतली छगन भुजबळांची भेट



मुंबई, दि. १० प्रतिनिधी

मंत्रिपद न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसवर उघडपणे नाराजी बोलून दाखवणाऱ्या छगन भुजबळांची धनंजय मुंडे यांनी भेट घेतली. शुक्रवार, दि. १० जानेवारी रोजी दुपारच्या दरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये भेट झाली. विशेष म्हणजे भुजबळ परदेशातून माघारी परतले तरी त्यांच्याबाबत राष्ट्रवादीने किंवा भाजपने काहीही निर्णय घेतलेला नाही. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे राज्याचं वातावरण तापलेलं आहे. या हत्येमागे धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याचा हात असल्याचा आरोप आहे. मात्र सध्यातरी वाल्मिक खंडणीच्या गुन्ह्यात पोलिस कोठडीमध्ये आहे. यावरुन मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे.

या भेटीबद्दल धनंजय मुंडेनी सांगितेले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी उपमुख्यमंत्री आदरणीय छगन भुजबळ साहेब यांची आज मुंबईत सदिच्छा भेट व आशीर्वाद घेतले. अन्न व नागरी पुरवठा खात्याचे अनेक वर्ष भुजबळ साहेबांनी मंत्री म्हणून काम केलेले असल्याने या खात्यातील कामकाजासंबंधी त्यांनी मार्गदर्शनही केले.

## आता जीव गेला तरी मागे हटणार नाही- धनंजय देशमुख

जालना, दि.१० प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे तीव्र पडसाद आता राज्यभर उमटत आहेत. या प्रकरणाचा मोठ्या प्रमाणावर राज्यभर निषेध करण्यात येत असून बीड, परभणी आणि ता जालन्यात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्च्यात देशमुख कुटुंबीय, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील, दीपक केदार यांच्यासह समाज बांधव मोर्चा मध्ये सहभागी झालेले आहे. यावेळी दिवंगत देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख भावूक झाली होती. तर देशमुख यांचे भाऊ यांनी, 'आता जीव गेला तरी मागे हटणार नाही', असा निर्धार केला आहे.



### संतोष देशमुखांना न्याय द्या

सरपंच संतोष देशमुख आणि सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्यासाठी जालन्यातील छत्रपती संभाजी महाराज चौकापासून जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला आहे. या मोर्चाचा शेवट अंबड चौफुली येथे करण्यात आला. समारोप सभास्थळी ज्योती मेटे, माजी आमदार संतोष सांबरे, ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख आसाराम बोराडे, आमदार अर्जुन खोतकर यांचे पुत्र अभिमन्यू खोतकर उपस्थित आहे.

यावेळी दिवंगत संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख भावूक झाली. वैभवीने आमच्या पाठीशी रहा, न्याय मिळवायचाय असं भावनिक आवाहन उपस्थितांना केले. वैभवी देशमुखला अश्रू अनावर झाले होते. यावेळी वैभवीने, आमचा आनंद आमच्यापासून हिरवून घेतला असून तुमच्या पाठिंब्याने आम्हाला न्यायाचा लढा पुढे नेऊ शकलो. आपल्याला न्याय मिळवायचा आहे. त्यासाठी मानवतेच्या नात्याने सर्व एकत्र या. आम्हाला न्याय मिळवून द्या. आमच्या न्यायासाठी आमच्या कुटुंबीयांच्या पाठीमागे सदैव उभे राहा, अशी भावनिक साद घातली.

### छळ करून का मारलं?

यावेळी वैभवीने, माझ्या वडिलांना इतका छळ करून का मारलात? असा सवाल आरोपींना केला. तर त्यांना किती वेदना झाल्या असतील? याचे उत्तर द्या असेही तिने म्हटले आहे. तसेच तिने, पप्पा तुम्ही आज जिथे कुठे असाल तिथे हसत रहा, आम्हाला माफ करा. आम्ही तुम्हाला वाचवू शकलो नाही, असे म्हटले आहे. यावेळी तिला अश्रू अनावर झाले होते.

एकीकडे राज्यभर सरपंच देशमुख हत्याकांडाचे पडसाद उमटत असतानाच देशमुख कुटुंबियांचे राज्यातील जनतेला न्यायासाठी साद घातली जात आहे. तर दुसरीकडे विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांना निशाना केलं जात आहे. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणाला सोडणार नाही, अशी कबुली दिली आहे.

## संभलमधील जामा मशिद परिसरातील विहिरीसंदर्भात सुप्रीम कोर्टाने मागविला स्टेटस रिपोर्ट

नवी दिल्ली, दि. १० प्रतिनिधी

संभल जिल्ह्यातील वादग्रस्त शाही जामा मशिदीजवळ असलेल्या विहिरीबाबत संभल नगरपालिकेने नोटीस बजावली होती. या नोटीशीला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसंच, दोन आठवड्यांत स्थिती अहवाल मागवण्यात आला आहे. ही विहिर सरकारी जमिनीवर असल्याचा दावा उत्तर प्रदेश सरकारने केला आहे. मुख्य न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि संजय कुमार यांचा समावेश असलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नोटीस जारी करताना अधिकाऱ्यांना दोन आठवड्यांत स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.



संभल जिल्हा प्रशासन शहरातील जुनी मंदिरे आणि विहिरींचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एक मोहीम राबवत आहे, ज्याच्या अहवालात असं दिसून आलंय की कमीत कमी ३२ जुनी मंदिरे आणि १९ विहिरी पुनर्जीवित करण्यात आली आहेत. या विहिरी सार्वजनिक वापरासाठी खुल्या करण्यात येणार असल्याची अशी नोटीस संभल नगरपालिकेने लावली आहे. त्यापैकी एक विहिर संभल येथील मशिदीजवळ आहे. त्याचा वापर मशिदीच्या कामासाठी केला जात असल्याचं मशिद समितीतर्फे उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील हुजेफा अहमदी म्हणाले. तसंच, अनादी काळापासून या विहिरीतून पाणी काढत असल्याचा दावाही त्यांनी केला. परंतु, या नोटीशीलाच सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती लावली आहे.

अहमदी यांच्या या दाव्यावर वरिष्ठ वकिलांनी आक्षेप घेत येथे हरि मंदिर असल्याचा प्रतिदावा करून आता विहिरीतील पाणी पूजा, अंघोळ आणि इत्यादीसाठी वापरले जाईल, असं म्हटलं. परंतु, अशा कोणत्याही उपक्रमांना येथे परवानगी दिली जाणार नाही, त्यासाठी आधी स्टेटस रिपोर्ट दाखल करण्याचे आदेश सरन्यायाधीशांनी दिले आहेत.

## मुंबई ते शिर्डी पदयात्रा, साईदर्शन 10 किमीवर असतानाच एपीआयचा दुर्दैवी मृत्यू

मुंबई, दि. १० प्रतिनिधी

नव्या वर्षाचा संकल्प करत अनेकांनी पहिल्या दिवसाची सुरुवात देवदर्शनाने केली. नववर्षाच्या पहिल्या दिवशी शिर्डी साईबाबांच्या दर्शनाला मोठी गर्दी झाल्याचं पाहायला मिळलं. तर, नवीन वर्षातील पहिल्याच महिन्यात मुंबईहून शिर्डी साईबाबाच्या दर्शनासाठी पदयात्रेचे आयोजन करण्यात आलं होतं. या पदयात्रेत सहभागी झालेल्या पोलीस सहायक फौजदाराचा हृदयविकारच्या झटक्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. प्रफुल सुर्वे असे या पोलीस सहाय्यक फौजदाराचे नाव असून ते अंधेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. विशेष म्हणजे शिर्डीचे अंतर केवळ 10 किमी दूर असतानाच त्यांचे पायी यात्रेतच दुर्दैवी निधन झाले.

अंधेरी पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे सहाय्यक फौजदार प्रफुल सुर्वे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी निधन झाले.



मुंबई ते शिर्डी पायी यात्रेदरम्यान आज सकाळी त्यांना हृदयविकाराचा झटका आला, तिथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सुर्वे हे दरवर्षी अंधेरी ते शिर्डी पायी चालत जात असे. यंदाही आपली नियमित पायी वारी करण्यासाठी ते यात्रेत सहभागी झाले होते. विशेष म्हणजे मुंबई ते शिर्डी 240 किमी अंतर आहे. हे अंतर कापताना त्यांनी तब्बल 230 किमीपर्यंत पायी प्रवास केला. शिर्डीला पोहोचण्यासाठी अवघे 10 किलोमीटरचे अंतर बाकी असतानाच सुर्वे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. सुर्वे यांच्या निधनाने साई पालखी मंडळ आणि पोलीस दलावर शोककळा पसरली असून त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## मी मिनी पाकिस्तानमधून चारवेळा चौकार मारत आमदार झालो - सुरेश खाडे

सांगली, दि. १० प्रतिनिधी

राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि भाजपचे हिंदुत्त्वावादी नेते नितेश राणे आज सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून मिरज येथे त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हिंदू गर्जना सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या सभेत बोलताना नितेश राणेंनी हिंदुत्वाचा हुंकार भरला. तर, विरोधकांच्या टीकेवर पलटवार करताना आम्ही ईव्हीएममुळेच जिंकलो. पण, ईव्हीएम म्हणजे एव्हरी व्होट अगेन्स्ट मोहल्ला असे म्हणत त्यांनी एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केल्याचं दिसून आलं. दरम्यान, येथील मेळाव्यात माजी मंत्री आणि मिरजचे आमदार सुरेश खाडे यांनीही भाषण केलं. यावेळी,



सुरेश खाडे यांनी मिरज विधानसभेचा उल्लेख मिनी पाकिस्तान असा करण्यात आला. त्यामुळे, आता नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. दरम्यान, मिरज मतदारसंघ हा मुस्लीम बहुल मतदारसंघ असून येथे मुस्लीम मतदारांची संख्या लक्षणीय आहे.

जे हृदयात आहे, त्याला जागृत करण्यासाठी, चालना देण्यासाठी हा मेळावा निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. विधानसभा निवडणुकांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत आपला पराभव झाला. निसटता पराभव आपल्या पदरी पडला, काही मतं कमी पडली. पण, विधानसभा निवडणुकांवेळी बटेंगे तो कटेंगे या नाऱ्यावर सगळा हिंदू एकत्र झाला आणि विधानसभेचा निकाल भरभराटीने दिसून आला. आज सभागृहात एवढीच गल्ली त्यांच्यासाठी राहिलीय, बाकी सगळं सभागृह आपलं आहे. आम्ही जरी दलित असलो तरी आम्ही हिंदू आहे, त्यामुळे आम्ही मागे नाही. आम्हीपण मिनी पाकिस्तानमध्ये लढतो. मी मिनी पाकिस्तानमधून चारवेळा चौकार मारत आमदार झालो आहे, असे माजी मंत्री व मिरजेचे आमदार सुरेश खाडे यांनी म्हटलंय. त्यामुळे मिरज विधानसभेचा आमदार सुरेश खाडे यांनी मिनी पाकिस्तान असा उल्लेख केलाय. बटेंगे तो कटेंगे या नाऱ्या भोवती सर्व हिंदू विधानसभेमध्ये एकत्र झाल्याचे सांगताना एक साथ रहेंगे तो टिकेंगे असे देखील सुरेश खाडे यांनी म्हटले.

# वंजारी समाजाची मनोज जरागे विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी



नवी मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

वंजारी समाज व मंत्री धनंजय मुंडे यांची नाहक बदनामी करणाऱ्या मनोज जरांगे व इतरां विरोधात वंजारी समाज आक्रमक होऊन आता रस्त्यावरच्या लढाईसाठी सज्ज झाला आहे. मंगळवारी रात्री मोठ्या संख्येने वंजारी बांधव नेरूळ पोलीस ठाण्यात एकत्र आले होते. मनोज जरांगे व अंजली दमानिया यांचा तीव्र शब्दात जाहीर निषेध करीत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी एका लेखी निवेदनात वंजारी समाजातील नेत्यांची बदनामी करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या विरोधात नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली. तसेच श्री संत वामनभाऊ व भगवान बाबा प्रतिष्ठानच्या वतीने राज्याचे पोलीस महासंचालक यांना लेखी तक्रार केली आहे.

राज्यातील विविध पोलीस ठाण्यात मनोज जरांगे विरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. नवी मुंबईतील वंजारी समाज बांधवानी भाजपा नवी मुंबई सरचिटणीस भगवानराव ढाकणे यांच्या उपस्थितीत नेरुळ पोलिसांना लेखी निवेदन देवून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. प्रारभी, मयत सरपंच संतोष देशमुख यांना प्रथम श्रद्धांजली वाहण्यात आली. देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांप्रती आम्हाला संवेदना असून आरोपींना फाशी मिळावी अशी मागणीही उपस्थित नेत्यांनी केली.

यावेळी भाजप नवी मुंबई सरचिटणीस भगवानराव ढाकणे, निवृत्ती गर्जे, महेंद्र जायभाये, भगवान वटूळे, बबन खेडकर, सुधाकर गर्जे, प्रयागताई वारे,श्री संत वामनभाऊ व भगवान बाबा प्रतिष्ठानचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी नेरुळ पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक पंकज धाडगे यांनी निवेदन स्वीकारले. राज्यातील वंजारी समाजाचा आक्रोश वाढत असून वंजारी समाजाची व आमच्या नेत्यांची बदनामी थांबली नाही तर यापुढे तीव्र आंदोलन रस्त्यांवर केले जाईल असा इशारा यावेळी भगवानराव ढाकणे यांनी दिला.

# दस्तऐवज नोंदणीसाठी फेसलेस प्रणाली राबविणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी



राज्यातील कोणत्याही भागातील नागरिकास राज्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करता येण्यासाठी वन स्टेट वन रजिस्ट्रेशन संकल्पना राबविण्यात येणार आहे. तसेच घरबसल्या नागरिकांना दस्त नोंदणी करण्यासाठी महसूल विषयक काही दस्त नोंदणीसाठी फेसलेस प्रणाली राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे महसूल विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील जमीन मोजणीसाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित ई - मोजणी राज्यात लागू करण्यात येणार आहे. पासपोर्ट कार्यालयाप्रमाणे भूमी अभिलेख विभागातील सर्व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रथम टप्प्यात 30 कार्यालयांमध्ये भू प्रमाण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील ग्रामीण भागातील वडिलोपार्जित जमिनीवर स्थायिक असलेल्या लोकांना आता त्यांच्या जमिनीचे स्वामीत्व अर्थात मालमत्ता कार्ड मिळावे यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महत्वपूर्ण स्वामीत्व योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत गावातील मिळकतींचे ड्रोन द्वारे जीआयएस सर्वेक्षण व गावठाण भूमापन करण्यात येणार आहे. पी एम किसान नोंदणीकृत शेतकऱ्यांचे ओळख क्रमांक तयार करण्यात येणार आहेत.

जनतेला वाळू सहज उपलब्ध होण्यासाठी सुलभ वाळू धोरण आणण्यात येईल. लवकरच भूसंपादन प्रक्रिया ऑनलाईन करण्यात येणार असून यासाठी पोर्टल तयार करण्यात येणार आहे. रेडी रेकनरचे दर पीडीएफ स्वरुपात राहते मात्र हे दर आता गाव निहाय, प्लॉट निहाय मिळविता येणार आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठी अधिमूल्य व कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी नियम बनविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. महसूल विभागातील चार कॅडरची संपूर्ण माहिती पोर्टलवर आणण्यात येणार असून महसूल अधिकाऱ्यांसाठी मॅन्युअल तयार करण्यात येणार आहे. केंद्राच्या 'अभिनव पहल' या पोर्टलमध्ये राज्यातील अधिकाऱ्यांच्या चांगल्या प्रॅक्टिस टाकण्यात येत आहे. नवीन जिल्हा करताना प्रशासकीय यंत्रणा यापूर्वीच तयार करावी. संपूर्ण यंत्रणेला अतिरिक्त स्वरूपात तयार करून ठेवावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ.पी.गुप्ता, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.

# आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून महसूल वाढविण्यावर भर द्यावा

मुंबई, दि. १० : प्रतिनिधी

राज्य उत्पादन शुल्क विभाग हा शासनाला महसूल मिळवून देणारा महत्वाचा विभाग आहे. महसूल वाढविण्यासाठी विभागाने नवनवीन संकल्पना अंमलात आणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महसूल वाढवण्यावर भर द्यावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला. या बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची प्रमुख उपस्थित होती. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, या विभागातील सेवा हमी कायद्यांतर्गत सुचित केलेल्या १३४ सेवा पैकी ६२ सेवा कार्यान्वित असून उर्वरित ७२ सेवा ऑनलाइन करण्यात येणार आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध कार्यप्रणालीमध्ये अत्याधुनिक साधनसामुग्रीचा वापर करण्यात यावा. मद्यार्क वाहतूक करणाऱ्या वाहनावर डिजिटल लॉक बसविण्याची कार्यवाही करावी. तसेच गुन्हेगारांना वचक बसावा या पद्धतीने कार्यप्रणाली आखण्यात यावी. अवैधरित्या मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीला आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. याप्रसंगी अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ.पी.गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी आदी उपस्थित होते.

# सरपंच हत्येच्या निषेधार्थ ग्रामपंचायतीमध्ये कामबंद आंदोलन



वाडा, दि. १० : प्रतिनिधी

बीड जिल्हातील मस्साजोग ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्ये प्रकरणी त्यांना न्याय मिळावा म्हणून महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेने पुकारलेल्या बंदला वाडा तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून बहुतांशी ग्रामपंचायतींनी कामकाज बंद ठेवून घटनेचा निषेध नोंदवला. वाडा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी स्व.संतोष देशमुख यांना श्रध्दांजली वाहून कार्यालय बंद ठेवून निषेध नोंदवला. सदरची केस जलदगती न्यायालयात चालवून मारेक-यांना फाशीची शिक्षा द्या अशी मागणी ग्रामपंचायतीकडून करण्यात आली.या आंदोलनात सरपंच, उपसरपंच, सदस्य कर्मचारी वर्ग सहभागी झाले होते.

# उल्हासनगरच्या शासकीय निरीक्षणगृहातील आठ अल्पवयीन मुली पळाल्या

उल्हासनगर, दि. १० : प्रतिनिधी

उल्हासनगर येथील शासकीय निरीक्षण गृह व विशेष गृहातील आठ १५ ते १७ वयोगटातील मुली मंगळवारी सकाळी शयनगृहातील खिडकीच्या जाळ्या तोडून पळून गेल्या. ही माहिती निरीक्षण गृहातील कर्मचाऱ्यांनी तातडीने हिललाईन पोलीस ठाण्याला दिली. पोलिसांनी तातडीने उल्हासनगर शहरात शोध मोहीम राबवून उल्हासनगर रेल्वे स्थानक भागातून सात अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात यश आले. एक अल्पवयीन मुलगी मात्र पोलिसांना सापडली नाही. तिचा शोध घेतला जात आहे, असे हिललाईन पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने सांगितले.

उल्हासनगरच्या शासकीय निरीक्षण गृहात या अल्पवयीन मुली काही महिन्यांपासून राहत आहेत. त्यांना या निरीक्षण गृहातील सेवासुविधा आवडत नसल्याने आणि मनाजोगे राहता येत नसल्याने त्यांनी पळून जाण्याचा निर्णय घेतला, असे अधिकाऱ्याने सांगितले. याप्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, उल्हासनगर शहराच्या मध्यवर्ति ठिकाणी शासकीय निरीक्षण आणि विशेष गृह आहे. याठिकाणी विविध वयोगटातील मुलींना ठेवले जाते. या निरीक्षण गृहातील सेवासुविधा आवडत नसल्याने काही महिन्यांपासून राहत असलेल्या आठ मुलींनी निरीक्षण गृहातून गुपचूप पळून जाण्याचा निर्णय घेतला. या निरीक्षण गृहातून मुलींना बाहेर सोडले जात नाही. त्यांच्यावर कर्मचाऱ्यांची पाळत असते. त्यामुळे मंगळवारी सकाळी शय्यागृहात असताना आठ मुलींनी निरीक्षण गृहातील शय्या गृहातील खिडकीच्या लोखंडी जाळया तोडल्या. एका पाठोपाठ एक खिडकीतून उड्या मारून पळून गेल्या.

निरीक्षण गृहातील कर्मचारी फेरफटका मारण्यासाठी शय्यागृहात आला. त्यावेळी त्यांना शय्या गृहात एकही मुलगी नसल्याचे आणि खिडकीच्या लोखंडी जाळया तुटल्या असल्याचे दिसले. या मुली पळून गेल्याचा संशय व्यक्त करून निरीक्षण गृहातील अधिकाऱ्यांनी तातडीने हिललाईन पोलीस ठाण्याला माहिती दिली. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी तातडीने उल्हासनगर शहराच्या विविध शोध मोहीम राबवली. त्या आढळून आल्या नाहीत. या मुली उल्हासनगर रेल्वे स्थानकातून पळून जाण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी उल्हासनगर रेल्वे स्थानक परिसरात शोध मोहीम राबवली. त्यावेळी उल्हासनगर रेल्वे स्थानकातून लोकलने पळून जाण्याचा प्रयत्नात असताना पोलिसांनी सात अल्पवयीन मुलींना ताब्यात घेतले. इतर एक मुलगी पळून जाण्यात यशस्वी झाली. तिचा शोध घेतला जात आहे, असे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

# ठाण्यातील 23 तलावाची होणार सफाई पाण्यावरील तरंगता कचरा केला जाणार साफ

ठाणे, दि.१० : प्रतिनिधी

तलवांचे शहर अशी ओळख टिकविण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासनाकडून गेल्या काही दिवसांपासून विविध उपक्रम राबविले जात असतानाच, त्यापाठोपाठ आता शहरातील २३ तलावातील पाण्याच्या पृष्ठभागावरील तरंगता कचरा साफ करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. जलप्रदुषण रोखण्यासाठी पालिका प्रशासनाने हा निर्णय घेतला असून यासंबंधीच्या प्रस्तावास प्रशासकीय सभेने मान्यता दिली आहे.

ठाणे शहराला 'तलावांचे शहर' म्हणून ओळखले जाते. एकेकाळी शहरात ७५ हून अधिक तलाव होते. परंतु अतिक्रमणामुळे अनेक तलाव नामशेष पावले. शहरात सद्यस्थितीत ३५ तलाव आहेत. या तलावांचे अस्तित्व टिकविण्यासाठी पालिका प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून तलावांचा परिसर सुशोभित करण्याबरोबरच पाणी शुद्धीकरणांसाठी यंत्रे बसविण्यात येत आहेत. गणेश मुर्ती विसर्जनामुळे तलाव प्रदुषित होऊ नयेत यासाठी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येत आहेत. असे असतानाच, त्यापाठोपाठ आता शहरातील २३ तलावातील पाण्याच्या पृष्ठभागावरील तरंगता कचरा साफ करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

शहरातील तलावांच्या परिसरात नागरिक सकाळ आणि सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी येत असतात. सणांच्या कालावधीत याठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांच्या ठिकाणी नागरिक मोठी गर्दी करतात.या तलावातील पाण्याच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात तरंगत्या कचऱ्यात वाढ होऊन पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून आणि जलप्रदुषण नियंत्रणाकरिता तलावांच्या पृष्ठभागाची दैनंदिन साफसफाई करणे गरजेचे आहे. त्यामुळेच पालिकेने आता शहरातील २३ तलावांची निवड करून त्याठिकाणी साफसफाईसाठी मनुष्यबळ पुरविण्याच्या कामाचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यास पालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिली आहे.

**या तलावांची होणार सफाई**

कळवा, मुंब्रा व दिवा भागातील दिवा तलाव, खिडकाळी डायघर तलाव, फडकेपाडा तलाव, दातीवली तलाव, शिळ तलाव, मुंब्रेश्वर तलाव, कौसा तलाव, न्यु शिवाजी नगर तलाव, ठाणे शहरातील मखमली तलाव, पांडुरंग भोईर तलाव, कोलबाड तलाव, गोकुळनगर तलाव, सिध्देश्वर तलाव, ब्रम्हाळा तलाव, गांधी नगर तलाव, कचराळी तलाव, घोडबंदर भागातील कासारवडवली तलाव, रेवाळे तलाव, कोलशेत तलाव, डावला तलाव, तुर्फेपाडा तलाव, जेल तलाव, देवसर तलाव यांची सफाई केली जाणार आहे. या कामासाठी १ कोटी १० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

# रोड रोलरने तरुणाला चिरडले, एकाचा मृत्यू

भिवंडी, दि. १० : प्रतिनिधी

२५ वर्षीय तरुण रोडवर निद्रावस्थेत असतानाच एका रोड रोलर चालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून त्याच्या ताब्यातील रोलरने तरुणास चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मुंबई - नाशिक वाहिनी समोरील रोडवरून समोर आली आहे.याप्रकरणी रोलर चालकाच्या विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रकाशकुमार लड्डू महतो (२५) असे चिरडून दुर्दैवी मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.तर बसंतकुमार वर्मा असे गुन्हा दाखल झालेल्या चालकाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,७ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास प्रकाशकुमार हा जेवण करून मुंबई - नाशिक वाहिनी समोरील बाबोसा कंपाऊंड जवळील मामा कंपाऊंडच्या रोडवर झोपलेला असताना रोड रोलर क्र. एलएनटी ११९० वरील चालकाने त्याच्या ताब्यातील रोलर वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून पुढे कोण आहे की नाही,याची शहानिशा न करता रोलर चालवून पुढील चाकाने प्रकाशकुमार यास चिरडले आहे.यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.दरम्यान कोनगाव पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत प्रकाशकुमार याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात पाठवला आहे.तर या मृत्यू प्रकरणी प्रकाश कुमार याचा भाचा अमरेशकुमार जोतीषराय मंडल (२२) याच्या फिर्यादीवरून रोलर चालकाच्या विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात भान्यासं तेच्या कलम १०६(१),२८१ न्वये गुन्हा दाखल केला असून त्यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५ (३) अन्वये नोटीस अदा करण्यात आली आहे.पुढील तपास सपोनि सुधिर सपकाळ करीत आहेत.

# एसटी बस स्थानकात खड्डे भरण्याचे काम सुरु

## भिवंडी-वाडा मार्गावरील एसटी बसची दररोज दुरुस्ती

भिवंडी, दि. १० : प्रतिनिधी

भिवंडी एस.टी.बस स्थानकात पावसाळ्यात साचलेल्या पाण्याने खराब झालेल्या रस्त्यामधील खड्डे पेव्हर ब्लॉक भरण्याचे काम नुकतेच सुरु झाले असून केवळ हि तात्पुरती डागडुगी करण्यापेक्षा भिवंडी एस.टी.बस स्थानकाची नव्याने उभारणी करणे गरजेचे झाले आहे. सध्या भिवंडी आगाराची झालेली दुरावस्था पाहता अपघात होऊन प्रवासी आणि आगारातील कर्मचारीवर्ग यांच्या जीवाला धोका झाला आहे.भिवंडी आगाराची उभारणी १९७२ साली झाली असून स्थानकाच्या मूळ इमारतीस ५२ वर्षे झाली आहेत.हि इमारत जुनी झाल्याने पावसाळ्यात ठिकठिकाणी गळत असते. वेळीच दुरुस्त न झाल्याने इमारतीच्या काही खिडक्या तुटल्या आहेत. तर काही ठिकाणी प्लास्टर निघालेले आहे. नागरिकांना रांगेत उभे राहण्यासाठी ठाणे-कल्याण च्या फलाटाचे लोखंडी पाईप तुटले असून त्या ठिकाणी कोणीही रांग लावत नाही.अनेकवेळा या इमारतीबाहेर प्रवाशांना उन्हात-पावसात उभे करून बसमध्ये बसविले जाते. स्थानकाच्या कॅन्टीनमध्ये देखील प्रवाशांना सुविधा उपलब्ध नाही. पिण्याचे शुद्ध पाणी देखील पुरविले जात नाही. त्याचप्रमाणे शौचालयाची देखील दुरवस्था असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. गेल्या काही वर्षांपासून भिवंडी आगारात पावसाचे पाणी साचत असल्याने आगाराच्या परिसरात खड्डडे पडतात. त्याची दरवर्षी जाते. परंतु पाणी प्रवाहित करण्यासाठी मार्ग काढला जात नाही. पावसाळा संपून तीन महिन्यानंतर आता महामंडळाच्या ठाणे विभागाने आगारामध्ये झालेल्या खड्डयाची दुरुस्ती सुरु केली आहे.या दुरुस्तीसाठी काही ठिकाणी लावलेले जुने पेव्हर ब्लॉक काढून त्या ठिकाणी नवीन ब्लॉक लावण्याचे काम ठेकेदाराने सुरु केले आहे. वारंवार अशा दुरुस्तीपेक्षा या आगाराचे इमारतींसह नूतनीकरण होणे हि काळाची गरज आहे. काही वर्षांपूर्वी या आगाराच्या नूतनीकरणासाठी टेंडर प्रक्रिया महामंडळामार्फत करण्यात आली होती. त्यानुसार पीपीपी तत्वावर शासनाने हे नूतनीकरण करण्याचे ठरविले होते. मात्र ३० वर्षाची मुदत असल्याने ठेकेदारांनी या टेंडर प्रक्रियेमध्ये भाग घेतला नाही. मागील राज्य शासनाच्या काळात हि मुदत ६० वर्षे केल्याने या आगाराचे नूतनीकरण करण्याच्या आशा बळावल्या आहेत. भिवंडी हे औद्योगिक शहर असून रेल्वे स्थानक गाठण्यासाठी या शहराला एस.टी.बस हेच सार्वजनिक प्रवासी साधन असल्याने जिल्ह्यात प्रामुख्याने या आगाराचे प्रथम नूतनीकरण झाले पाहिजे. यासाठी नवीन सरकारात असलेल्या मंत्र्यांनी देखील मनावर घेऊन प्रयत्न केले पाहिजे.दरम्यान

भिवंडी आगारातुन दररोज १० ते १२ हजार प्रवासी प्रवास करीत असतात. एकूण ६० बसेस असून त्यापैकी अनेक गाड्या सीएनजी केलेल्या आहेत. तर शासनाकडून १६ दिसेल गाड्या येणार असल्याची माहिती मिळते. सध्या असलेल्या गाड्यांसाठी आगारात २५० चालक -वाहक काम करीत असून इतर ५० कर्मचारी देखील कार्यरत आहेत. तर भिवंडी आगारातून कल्याण व वाडा या मार्गावर जाणाऱ्या प्रवाशांची मोठी संख्या आहे. त्यापैकी भिवंडी-वाडा मार्गावर मोठमोठे खड्डे झाल्याने त्यामधून दररोज प्रवाशांना न्यावे लागत आहे. त्यामुळे कायम बसेसचे नुकसान होत आहे. या मार्गावरून बस जाऊन अली कि त्याचे काही सामान (पार्ट) ना दुरुस्त होतात. परिणामी हा भुर्दंड शासनाला सहन करावा लागत आहे. तसेच कर्मचाऱ्यांना देखील प्रवाशांना नेण्यासाठी कसरत करावी लागते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना शारीरिक त्रास होतो. त्यामुळे शासनाच्या अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या नादुरुस्त रस्त्याची दखल घेऊन ते वेळीच दुरुस्त केले पाहिजेत.



पावसाळ्यात भिवंडी आगारातील पाणी स्थानिक महानगरपालिकेच्या गटारातून वाहत जात होते. परंतु जाम झालेली व घाण साचलेली गटारे पालिकेने साफ न केल्याने वारंवार आगारात खड्डे होत आहेत. या कारणासाठी पालिकेकडे लेखी तक्रार देऊनही प्रशासन दुर्लक्ष्य करीत आहे. तर शासनाडून आजच्या नूतनीकरणासाठी प्रयत्न सुरु असून स्थानिक लोकप्रतिनिधी देखील याबाबत प्रयत्नशील आहेत.

**- इम्रान पटेल, भिवंडी एस.टी.आगार व्यवस्थापक**

# राष्ट्रीय युवा दिना निमित्त दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बेलापूर येथे विविध स्पर्धांचे आयोजन

नवी मुंबई, दि.१० : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्यावतीने, दि 12 जानेवारी 2025 रोजी स्वामी विवेकानंद जंयती निमित्त दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) बेलापूर जि. ठाणे येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात येणार आहे. अशी माहिती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,बेलापूर यांनी दिली. युवकांच्या विविध गुणांना तसेच कौशल्यांना वाव मिळावा व प्रोत्साहन मिळावे यासाठी दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर जि. ठाणे येथे दिनांक 09 ते 11 जानेवारी 2025 या कालावधीत संस्थेमध्ये कॅरम, बुध्दीबळ, चित्रकला व निबंध अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि. 10 जानेवारी 2025 रोजी श्री. आदित्य कारखानिस सहाय्यक निर्देशक, श्रम मंत्रालय, मुंबई भारत सरकार यांचे मार्फत अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीच्या वर्ष १८ वयोगटातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी एक दिवसीय उद्योजकता जागृकता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी डॉ. स्नेहल म्हात्रे, तेजज्ञान फाऊंडेशन पुणे, ध्यान ज्ञान केंद्र पनवेल यांचे स्वामी विवेकानंद व त्यांचे विचार यावर मार्गदर्शन होणार आहे. तसेच या स्पर्धामध्ये विजय प्राप्त केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा गौरव करून त्यांना प्रशस्ती पत्रक देण्यात येणार आहे.या स्पर्धांमध्ये जास्तीत प्रशिक्षणार्थ्यांनी सहभाग घ्यावा,असे आवाहन दि. बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बेलापूर जि. ठाणेचे प्राचार्य स.ज.पाटील एका प्रसिध्द पत्रकाद्वारे केले आहे.

# शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जयंती प्रित्यर्थ व्यंगचित्रकला स्पर्धा आणि व्यंगचित्रांचे प्रदर्शन 2025

ठाणे, दि.१० : प्रतिनिधी

शिवसेवा मित्र मंडळ, ठाणे पूर्व तर्फे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती प्रित्यर्थ व्यंगचित्रकला स्पर्धा,आयोजित केली आहे. स्पर्धेचं हे १२ वे वर्ष असून "व्यंगचित्रांच्या माध्यमातून समाज प्रबोधन" या विषयावरील व्यंगचित्र पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत वय वर्ष १५ खालील बालव्यंगचित्रकार,दिव्यांग स्पर्धकांसाठी विशेष गट तर वय वर्ष १६ वरील हौशी व्यंगचित्रकारासाठी खुला गट भाग घेऊ शकतात तसेच स्पर्धेतील उत्कृष्ट सहभागासाठी पहिल्या तीन शाळांसाठी विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल व्यंगचित्रकला स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली आहे.

परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल,व्यंगचित्राच्या पुढील भागात स्पर्धकाचे नाव लिहिलेली व्यंगचित्र स्पर्धेसाठी पात्र नसतील,राजकीय नेत्यांची किंवा राजकीय किंवा जातीय सलोखा बिघडवणाऱ्या विषयांवरील व्यंगचित्र स्पर्धेसाठी आणि प्रदर्शनासाठी पात्र नसतील,एकदा पाठवलेली व्यंगचित्र ही पुन्हा परत मिळणार नाहीत,

व्यंगचित्र, अे ३ साईझ ४२ X ३० सेंमी पेपर मध्ये, तसेच मागे आपले संपूर्ण नाव, जन्म तारीख,वय , स्पर्धक गट, मोबाईल नंबर, पूर्ण पत्ता व बालव्यंगचित्रकारांनी आपल्या शाळेचं नाव लिहून, धर्मवीर आनंद दिघे चौक , मंगला हिंदी शाळेसमोर, कोपरी, ठाणे पूर्व ४००६०३ येथे स्पर्धकांची व्यंगचित्र त्यांनी स्वखर्चाने आणि स्वतःच्या जबाबदारीवर पाठवलेल्या स्पीड पोस्ट अथवा कुरियर मार्फत दि १६ जानेवारी २०२५ ते अंतिम दि २० जानेवारी २०२५ पर्यंत सायंकाळी ७ ते ९ या वेळेत पोहचवावीत. त्यासाठी ९८३३१५८८०० या भ्रमणध्वनी वर संपर्क साधावा.

परीक्षकांनी निवडलेल्या निवडक व्यंगचित्रांचे प्रदर्शन गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते रात्री १० पर्यंत आयोजित केले जाणार आहे आणि गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ रोजी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या शुभहस्ते सायंकाळी ७ वा ठाणे महापालिका खुले कलादालन, अष्टविनायक चौक, मिठ बंदर रोड, ठाणे पूर्व येथे आयोजित करण्यात येईल.

# विनयभंगाच्या गुन्ह्याविरोधात आलेगाव ग्रामस्थ एकवटले



■ महासागर प्रतिनिधी,
**पातूर, दि. ९ :** पातूर तालुक्यातील एका गावातील मुलीचा विनयभंग प्रकरणी चान्नी पोलिसांनी ६ जानेवारी रोजी दाखल गुन्ह्याविरोधात ८ जानेवारी रोजी आलेगावातील सर्व जाती, धर्माचे हजारो महिला पुरुषांनी एकत्र येऊन माळी भवन ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मूकमोर्चा काढला. कडकडीत बंद ठेऊन सदर घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला.

प्रकरणाची पुन्हा चौकशी करून आरोपीविरुद्ध दाखल गुन्हा तात्काळ रद्द करावा अशी मागणी आलेगाव ग्रामस्थांकडून करण्यात आली. पातूर तालुक्यातील आलेगाव येथील व्यावसायिक अशोक जानकीराम काळदाते यांच्या विरुद्ध ६ जानेवारी रोजी अल्पवयीन मुलीच्या बयाणानुसार चान्नी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली. हा गुन्हा खोटा दखल करण्यात आल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. पोलिसांनी पुन्हा चौकशी करून गुन्हा तात्काळ रद्द करावे, असे ग्रामस्थांनी भाषणातून व्यक्त केले.

तपासानंतर पुढील कारवाई भसदर प्रकरण अल्पवयीन मुलीचे असल्यामुळे, फिर्यादीवरून गुन्हा दाखल करणे कायद्यानुसार गरजेचे होते. पुढील तपासाची प्रक्रिया सुरू आहे. तपासाअंती पुढील कारवाई करण्यात येईल.

**रवींद्र लांडे, ठाणेदार, चान्नी**

# केरळ येथील एनसीसी कॅम्पमध्ये एलआरटीचे ३ कॅडेट्स सहभागी



■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ९ :** ३२ के बटालियन एनसीसी पाय्यानुर, केरळद्वारा २३ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान एक भारत श्रेष्ठ भारत-२ कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. कॅम्प कमांडर कर्नल सार्जीद्रान यांच्या मार्गदर्शनाखाली हा कॅम्प सुरू करण्यात आला. या कॅम्पसाठी भारतातील वेगवेगळ्या राज्यातील कॅडेट्सची निवड झाली. या कॅम्पसाठी प्रत्येक बटालियनमधील उत्कृष्ट कॅडेट्सला सहभागी होण्याची संधी मिळाली. ११ महाराष्ट्र बटालियनचे १६ कॅडेट्सची नियुक्ती कॅम्पसाठी झाली होती. यात श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिशन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयाचे कॅडेट धनश्री दाणे, कॅडेट आयुष थोरात व कॅडेट हर्ष देवगिरीकर यांची निवड करण्यात आली होती. एक भारत श्रेष्ठ भारत- स्कॅम्प हा कॅडेट्सला राष्ट्रीय एकात्मतेला चालना देण्यासाठी कार्य करते व या कॅम्पच्या माध्यमातून एन.सी.सी. कॅडेट्समध्ये राष्ट्रवाद आणि एकतेची भावना रुजवण्यात आली आहे. या कॅम्पमध्ये सहभागी होणाऱ्या कॅडेट्सला केरळ राज्यातील विविध स्थळांना आणि सांस्कृतीक ठिकाणांना भेट देण्याची संधी मिळाली. त्यांनी तय्याम टेम्पल, इंडियन नेवल अकॅडमी व वेहकल फोर्ट अशा विविध स्थळांना भेट दिली. या कॅम्पमध्ये कॅडेट्सना विविध राज्यांतील जीवनशैली, सण-उत्सव, पाककृती, संस्कृती यांची माहिती मिळली आणि वेगवेगळे उपक्रम राबवण्याची संधी मिळाली. या कॅम्पमध्ये कॅडेट धनश्री दाणे, कॅडेट आयुष थोरात व कॅडेट हर्ष देवगिरीकर यांनी चांगली कामगिरी बजावली त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे, व्यवस्थापन अभ्यासक्रम समन्वयक डॉ. वर्षा सुखदेवे व एनसीसी अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांनी त्यांचा सत्कार केला. कॅडेटने केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा बी. जी. ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. मोतीसिंह मोहता, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल, उपाध्यक्ष अभिजित परांजपे, मानद सचिव डॉ. पवन माहेश्वरी, सहायक सचिव विक्रम गोलेच्छा सर्व कार्यकारी सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलनास उद्यापासून प्रारंभ : अध्यक्षपदी संत साहित्याचे अभ्यासक श्यामसुंदर महाराज यांची निवड ?

## संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद




■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ९ :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज सेवा समिती अकोला यांच्या वतीने अकरावे राज्यस्तरीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन ११, १२ जानेवारी रोजी अकोल्यात आयोजित करण्यात आले आहे. गुरुवारी शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत संमेलनाची माहिती देण्यात आली. यंदाचे संमेलन भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाचे मुख्य मार्गदर्शक आचार्य हरिभाऊ वेरुळकर, तर संमेलन अध्यक्षपदी संत साहित्याचे अभ्यासक श्यामसुंदर महाराज सोन्नर (बीड) यांची निवड करण्यात आली आहे. स्वागताध्यक्षपदी युवा उद्योजक मंगेश कराळे यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनात ११ जानेवारीला सकाळी १० ते २ वाजेपर्यंत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, ज्यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील ७० विद्यार्थी सहभागी होतील. दुपारी २ वाजता जानोरकर मंगल कार्यालय ते संत तुकाराम महाराज कॅन्सर हॉस्पिटल पर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात येईल. यात विविध शाळांचे विद्यार्थी, वारकरी भजन मंडळे सहभागी होतील.

दुपारी ३ वाजता उद्घाटन समारंभ पार पडणार आहे. समारंभासाठी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जावेद पाशा, राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज, पोलिस अधीक्षक बच्चनसिंह, ग्रामगीता प्रचारक डॉ. भास्कर विघे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. ज्ञानेश्वर रक्षक, डॉ. श्रीराम रोकडे, रामेश्वर फुंडकर, अरविंद देठे, गुणवंत जानोरकर, प्रा. सचिन बुरघाटे, प्रा. संतोष हुशे, डॉ. शांताराम बुटे आदी उपस्थित राहतील.

यावेळी ग्रामगीता जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा भजन सम्राट स्व. रामभाऊजी गाडगे पातूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय कीर्तनकार गुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रसारक लक्ष्मण काळे अमरावती व ग्रामगीता प्राचारिका शामा दहिफळे परडी वैजनाथ या दोन मंडळींना प्रदान केला जाईल. याशिवाय राष्ट्र संत तुकडोजी महाराज सेवा गौरव पुरस्कार कविता येनुरकर, प्रा. नीलेश मोहकार, राष्ट्रसंत युवा उद्योजक पुरस्कार विजय अरविंद देठे, प्रज्वल तायडे पाटील युवा उद्योजक अकोला या दोन मंडळींना प्रदान केल्या जाईल. राष्ट्रसंत आदर्श शेतकरी पुरस्कार विठ्ठल ठोंबरे कान्हेरी सरप, संदीप बर्डे तांदळी यांना प्रदान होईल. तुकड्यादास वाङ्मय पुरस्कार नयन परहाड अम., राष्ट्रसंत युवा जागृती पुरस्कार गोपाल मुकुंदे अकोला पोलीस सक्षम उपक्रम यांना प्रदान केले जाईल. सायंकाळी ६ वाजता सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व प्रार्थनेवरील चिंतन प्रा. मनोज चौबे मांडतील. सायंकाळी ७ वाजता प्रकट मुलाखत प्रभात किड्स संचालक डॉ. गजानन नारे यांची मुलाखत उमेश आलोणे, गोपाल गाडगे घेतील. सायंकाळी ७:३० वाजता प्रा. जावेद पाशा यांचे 'आजच्या पिढीसाठी राष्ट्रसंतांची दिशादर्शक विचार' यावर व्याख्यान होईल. रात्री ८.३० वाजता राष्ट्रीय कवी संमेलन नरेंद्र इंगळे यांच्या अध्यक्षतेत होईल.

संमेलनाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी अनंत खेडकर करतील. किशोर बळी, ॲड. दिलीप कोहळे, हिंमत ढाळे, धनंजय मिश्रा, गोपाल मापारी, अमोल गोंडचवर, तुळशीराम बोबडे, रामराव पोटखेडे, पुनम तायडे, बबलू तायडे कवी मंडळींचा सहभाग असेल. पत्रकार परिषदेला समितीचे अध्यक्ष डॉ. रामेश्वर बरगट, स्वागताध्यक्ष मंगेश कराळे, सचिव राजेंद्र झांबरे, सहसचिव ॲड. सचिन माहोकार, प्रसिद्धी प्रमुख गोपाल गाडगे, श्रीकृष्ण ठोंबरे, नरेश देशकर व सुभाष जयस्वाल उपस्थित होते.

प्रथम परिसंवाद सकाळी ११ वा. 'राष्ट्रसंतांच्या साहित्यातील परिवर्तनवादी विचारांची दिशा' विषयावर होईल. अध्यक्षस्थानी आचार्य हरिभाऊ वेरुळकर तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. भास्कर विघे, ज्ञानेश्वर रक्षक, डॉ. गोवर्धन खवले राहतील. द्वितीय परिसंवाद १२.३० 'स्त्रिया पुढील आव्हाने आणि राष्ट्र संताचे महिल्लोंनती विचार' अध्यक्ष सुधा जवंजाळ तर प्रमुख वक्ते प्रा. संप्रदा ढाकरे, डॉ. प्राची अनोकार, ॲड. साक्षी पवार राहतील. दुपारी १.३० राष्ट्रसंतांची राष्ट्रीय भजने श्री गुरुदेव भजन मंडळ सादर करेल. तृतीय परिसंवाद दुपारी २ वा. 'सुनले भारत के प्यारे जवान तुझपे सौपी है जिंदगी तमाम' अध्यक्ष विष्णुपंत भिसे असतील तर प्रमुख वक्ते प्रा. डॉ. स्वप्नील इंगोले, ॲड. सचिन माहोकार, ॲड. वंदन कोहाडे, अरविंद काळमेघ, ॲड. कोमल हरणे, डॉ. प्रकाश मानकर, डॉ. नरेंद्र तराळे यांची उपस्थिती असेल. समारोप कार्यक्रम दुपारी ४ वाजता होईल. सायंकाळी ६ वाजता सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना, ६.३० राष्ट्रीय भजने प्रभात किड्स स्कूल अकोला तसेच प्रा. गोपाल गावंडे यांच्या आवाजात राष्ट्रसंतांची राष्ट्रीय भजने सादर करण्यात येतील.

# विदर्भ विज्ञान उत्सव २०२४-२५ मध्ये अकोल्यातील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला, दि. ९ :** नागपूर येथील एल. ए. डी. महाविद्यालय आणि श्रीमती आर. पी. कॉलेज फॉर वुमन येथे विज्ञान भारती विदर्भ प्रदेश मंडळ व राष्ट्र संत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भस्तरीय शालेय मॉडेल स्पर्धेत अकोल्यातील विद्यार्थ्यांनी यश मिळवले. शालेय स्तरावरील या प्रतिष्ठित स्पर्धेत अकोल्याच्या स्कूल ऑफ स्कॉलर्स, कौलखेड शाखेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर एमराल्ड हाइट्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला. स्कूल ऑफ स्कॉलर्स विद्यार्थी अर्णव दहिभात आणि अभिनव चव्हाण यांनी मार्गदर्शक शिक्षक पवन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय गटात स्लीप अलार्म फॉर ड्रायव्हर्स यावर प्रतिकृती सादर केली. या प्रतिकृतीत वाहन चालवताना ड्रायव्हरला जर डुलकी लागली तर अलार्म वाजवण्याचे तंत्र विकसित करण्यात आले आहे. एमराल्ड हाइट्स स्कूलची विद्यार्थिनी खुशी अग्रवाल आणि सई नवलाखे यांनी शिक्षिका शबनम फक्रयाजुद्दीन यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण या गटात 'ट्रेश टू कॅश' विषयावर प्रतिकृती सादर केली. यात मंदिरातील निर्माल्याची फुले आणि पाणी यापासून उदबत्ती, गुलाबपाणी आणि गुलकंद तयार करण्याचे तंत्र सादर करण्यात आले. कार्यक्रमात विज्ञान भारती अकोला शाखेच्या संयोजिका डॉ. मीनल सोमण, प्रा. अमित सबनीस, प्रा. कुशल सेनाड, सुधीर सोमण, अकोला शाखेच्या विज्ञान भारतीच्या सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांना प्रेरणा दिली.

# बुलढाण्यात लोक अचानक टकले का होत आहेत?:पाण्यात नायट्रेट आढळले, TDS ही अचानक वाढल्याने केस गळती वाढल्याचा दावा



■ महासागर प्रतिनिधी,
**बुलढाणा, दि. ९ :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील नागरिकांचे केस अचानक गळण्यास सुरुवात झाल्यामुळे भीती निर्माण झाली होती. पण आता या लोकांच्या केस गळतीचे खरे कारण समोर आले आहे. येथील पाण्यात नायट्रेट सारखा अत्यंत विषारी घटक मोठ्या प्रमाणात आढळला असून, पाण्याची टीडीएस लेव्हलही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे येथील नागरिकांचे केस गळतीचे प्रमाण अचानक वाढल्याचा दावा केला जात आहे.

गत काही दिवसांपासून शेगाव तालुक्यातील बोंडगाव व खातखेड येथील ग्रामस्थांचे केस गळतीचे प्रमाण अचानक वाढले होते. त्यांचे डोक्याचे व दाढीचे केस अचानक गळू लागले होते. त्यामुळे गावात जवळपास सर्वचजण टकले होत आहेत. पुरुषच नव्हे तर महिला मध्येही ही समस्या दिसून येत होती. त्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. हा प्रकार कुणाच्याच लक्षात येत नसल्यामुळे एखादा नवीन व्हायरस आला की काय? अशी शंका निर्माण झाली होती. पण आता या प्रकारामागील खरे कारण समोर आले आहे.

**पाण्यात नायट्रेटचे घटक आढळले, टीडीएस मध्येही वाढ**

शेगाव तालुक्यातील बोंडगाव व खातखेड येथील पाण्यात नायट्रेट सारखा अत्यंत विषारी घटक मोठ्या प्रमाणात आढळला आहे. या शिवाय येथील पाण्याची टीडीएस लेव्हलही भयंकर प्रमाणात वाढली आहे. या दोन्ही घटकांमुळेच हे पाणी नागरिकांसाठी विष ठरत असून, त्यामुळेच त्यांच्या केस गळतीचे प्रमाण वाढले असल्याचा दावा केला जात आहे. खबरदारी म्हणून खारपाणपट्ट्यातील या गावात पिण्याच्या पाण्याची वेगळी सोय करण्यात आली आहे. पण नायट्रेटमुळे हे पाणीही वापरण्यासाठी योग्य नसल्याचे म्हटले जात आहे.

**पाणी व त्वचेचे नमुणे प्रयोगशाळेत**

दुसरीकडे, या घटनेत टक्कल पडलेल्या नागरिकांची संख्या ५१ वर पोहोचली आहे. मागील ३ दिवसांतच टक्कल पडल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आरोग्य विभागाकडून या प्रकरणी घरोघरी सर्वेक्षण केले जात आहे. चर्मरोग तज्ज्ञांचे पथकही गावात पोहोचले आहे. त्यांनी या प्रकरणी कठोरा, बोंडगाव, हिंगणा आदी ठिकाणी तपासणी सुरू केली आहे. सकृतदर्शनी हा फंगल इन्फेक्शनचा प्रकार असल्याचे सांगण्यात येत आहे. पण हा आजार पाण्यामुळे होत असल्याचेही सांगितले जात आहे. गावातील पाणी व त्वचेचे नमुणे पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आलेत. त्याचा अहवाल मिळाल्यानंतर येथील लोकांचे केस गळतीचे खरे कारण समोर येईल. पण तूर्त पाण्यातील नायट्रे व वाढलेल्या टीडीएसला दोष दिला जात आहे.

**खाली पाहू कोणत्या गावात किती जणांचे केस गळाले ?**

बोंडगाव -१६ कालवड -१३
कठोरा -७ भोनगाव -३
हिंगणा वैजनाथ -६ घुई -७

**अवघ्या ३ दिवसांतच संपूर्ण टक्कल**

टक्कल पडणाऱ्या गावांतील नागरिकांच्या डोक्याला प्रथम खाज येते. त्यानंतर हळूहळू केस गळण्यास सुरुवात होते. त्यानंतर अवघ्या ३ दिवसांतच संपूर्ण डोक्याला टक्कल पडते. या विचित्र आजारामुळे ग्रामस्थ घाबरलेत.

**विशेषतः** या प्रकरणात दाढीचेही केस गळत असल्यामुळे गावकऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एकट्या बोंडगावात १६ हून जास्त रुग्ण आढळलेत, अशी माहिती स्थानिक आरोग्य तज्ज्ञांनी दिली आहे.

# लोकांना पक्षाशी जोडण्याचे काम करणार: आ. श्वेताताई महाले यांचे प्रतिपादन; महासदस्य अभियान



■ महासागर प्रतिनिधी,
**चिखली, दि. ९ :** चिखली : जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेल्या भारतीय जनता पक्षाचे महा सदस्यता अभियान देशभर उत्साहात सुरू आहे. चिखली मतदारसंघात देखील आमदार श्वेताताई महाले यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान प्रभावीपणे राबवले जात आहे. हे अभियान लोकांना भारतीय जनता पक्षाशी जोडण्याचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. चिखली शहर व ग्रामीण भागात पक्षाचे नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने या महा सदस्यता अभियानात सहभागी होत असून सोशल मीडियावर देखील या अभियानाचे पडसाद उमटलेले पहायला मिळत आहेत.

आ. श्वेताताई महाले यांच्या कुशल नेतृत्वाखाली अतिशय सुनियोजित पध्दतीने भारतीय जनता पक्षाच्या वतीने चिखली मतदारसंघात महा सदस्यता अभियानाला सुरूवात झाली. दि. ५ जानेवारी रोजी श्री अंबिका अर्बन पतसंस्थेच्या सभागृह आणि धाड येथील देशमुख टॉवरमध्ये यांच्या संकल्पनेतून मतदारसंघातील ग्रामीण भागातील व खटकेश्वर महाराज मंदिरात चिखली शहरातील पदाधिकारी, बूथ प्रमुख व शक्ती केंद्र प्रमुखांचा मेळावा पार पडला. प्रत्येक कार्यकर्त्याने किमान २५० सदस्य जोडावे भमहा सदस्यता अभियान हे भारतीय जनता पक्षाच्या विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे, ही बाब लक्षात घेऊन भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने किमान २५० सदस्य पक्षाशी जोडण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून जिद्दीने ते पूर्ण करावे असे आवाहन आ.

श्वेताताई महाले यांनी केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात पक्ष अधिक मजबूतीने उभा राहिल व त्याचा लाभ कार्यकर्ते आणि सर्वसामान्य माणसाला निश्चित मिळेल असा विश्वास आ. श्वेताताई महाले यांनी व्यक्त केला आहे.

# बघीरा देवाभाईची जोडी यात्रा महोत्सवात चर्चेत



**परतवाडा:** सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या चांदूर बाजार तालुक्यातील श्री क्षेत्र बहिरम बाबा यात्रा महोत्सवात विदर्भातील सर्वप्रथम हिंद केसरी मैदानावर आमदार हिंद केसरी जंगी शंकर पटाचे तीन दिवसीय आयोजन करण्यात आले असून अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे यांच्या नेतृत्वात आयोजित या शंकरपटाचा मंगळवारी (दि. ८) शुभारंभ झाला. तीन गटात होणाऱ्या या शंकरपटात जवळपास २५० बैलजोड्या या स्पर्धेत सहभागी झाल्या आहेत. त्यामध्ये बुलढाणा एक्सप्रेस बाब्या डॉन, बघीरा देवाभाई ही बैलजोडी चर्चेत आहे. शंकरपटाच्या शुभारंभा प्रसंगी माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रवीण तायडे, प्रमुख अतिथी म्हणून आमदार केवलराम काळे, उपविभागीय अधिकारी बळवंतराव अरखराव, तहसीलदार डॉ. संजय गरकल, शिरजगाव कसबाचे ठाणेदार महेंद्र गवई, प्रमोद कोरडे, अतुल वाठ आदी उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I, **Sabahat Salman Tarique Ansari, W/O Dr. Salman Tarique Ansari,** R/O V/361, Near Church, Naya Godam, Ismailpura, Kamptee, Distt: Nagpur; have changed my name to **Sabahat Hafiz Khan,** for all future purposes, vide affidavit No. 24505403212684005 7726 dated 08.01.2025, sworn in the Court of Executive Magistrate, Nagpur (Urban).

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Short e-Tender Notice**

Super scribed e-tenders are invited from Established, Reputed, Experienced Contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the works of **1). Various civil maintenance works at Training Center and Prakash Bhavan Premises Gaddigodam, Nagpur, Dist. Nagpur. amounting to Rs. 6.86 Lakhs, 2). Drilling of Borewell and Commissioning of Submersible Pump and 33/11 KV WadodaS/Stn. Taluka mouda Dist. Nagpur amounting to Rs. 1.43 Lakhs, vide e-tender specification no. EEC/NGP/e-T-53/2024-25 and EEC/NGP/e-T- 54/2024-25, respectively.** The tender with all details will be available on MSEDCL's website **www.mahadiscom.in** from date - **11.01.2025 to 17.01.2025 and submission on 18.01.2025 upto 13.00 hrs. Corrigendum if any will not be published, the bidders have to check it on website itself.**

**PRO No. 02/NZ**
**Dt. 10.01.2025**

**Executive Engineer (C)**
**CCCM Division, Nagpur**

# अकोलेकरांना बोचऱ्या थंडीचा अनुभव, पारा १०.३ अंशांवर

**अकोला:** गेले दहा-बारदिवसात सौम्य असणाऱ्या थंडीचा प्रकोप पुन्हा वाढत आहे. यामुळे अकोलेकरांना बोचरी थंडी सहन करावी लागत आहे. गुरुवारी किमान तापमान पुन्हा घसरले. ९ जानेवारी रोजी सरासरी १०.३ किमान तापमानाची नोंद करण्यात आली. एका दिवसात ०.७ अंशाने तर आठवड्यात ४ अंशांपर्यंत कमाल तापमान खाली आले. गुरुवारी पारा घसरल्यामुळे अकोलेकरांना तीव्र थंडीचा सामना करावा लागला. दिवसभर वातावरणात गारवा होता. अकोल्यात मागील आठवड्यात ढगाळ वातावरण होते. मात्र, थंडीची तीव्रता कमी होती. कमाल तापमान १५-१६अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले होते. जवळपास पाच ते सहा दिवस कमाल कायम राहिले. काही दिवस तीव्र अकोलेकरांना थंडीपासून दिलासा मिळाला. मात्र, मागील तीन दिवसांपासून पुन्हा तापमान तीव्र थंडीकडे वाटचाल करत आहे.

बुधवारी काही प्रमाणात त्यांची चाहूल लागली. त्यात गुरुवारी पुन्हा ०.७ अंशाने कमाल तापमान कमी झाले. यामुळे वातावरणात चांगलाच गारवा जाणवत होता. येत्या दिवसात मात्र, कमाल पारा काही अंशाने वाढणार आहे. १० जानेवारी ११.५ ११ जानेवारी १३.२ १२ जानेवारी १४.५ १३ जानेवारी १६.२ १४ जानेवारी १६.४येत्या दिवसातील अंदाजे तापमान



# भावी युवा पिढी समोरील आव्हाने,समस्या आणि उपाय

प्रस्तावना : स्वामी विवेकानंद हे भारतीय विचारवंत, योगी, आणि आध्यात्मिक गुरु होते. स्वामी विवेकानंद यांची १२ जानेवारी या दिवशी जयंती असते. १२ जानेवारी हा दिवस भारतात 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यांनी भारतीय तरुणांना समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रेरित केले. तसेच समाजाच्या आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी योगदान देण्याचे आवाहन केले. त्यांचा विश्वास होता की, युवकांमध्ये अपार शक्ती आहे आणि योग्य मार्गदर्शनाने ते देशाला प्रगतीकडे घेऊन जाऊ शकतात. मात्र, सध्याची युवा पिढी अनेक आव्हाने आणि समस्यांचा सामना करत आहे, ज्यांवर उपाय आवश्यक आहे.प्रस्तुत लेखात युवा पिढीसमोरील आव्हाने,समस्या आणि त्यावरील उपाय याचा उहापोह केला आहे.वाचकांना याचा निच्छित लाभ होईल.

१. शिक्षण व कौशल्य विकासातील अडथळे : आजकालच्या शैक्षणिक प्रणालीत बदल आवश्यक आहे, कारण केवळ पारंपरिक शिक्षण पद्धती पुरेशी नाही. तरुण पिढीला डिजिटल कौशल्ये, नवनविन ऊपक्रम, आणि व्यवसायिक प्रशिक्षणाची गरज आहे. शिक्षण संस्थांमधून मिळणारे शिक्षण व्यावहारिक नाही असे तरुणांना वाटते. परिणामी, उपलब्ध रोजगाराच्या संधी मर्यादित वाटतात. शिक्षणात संधींची कमतरता आणि कौशल्यांमधील असमाधान ही एक मोठी समस्या ठरली आहे.

२. बेरोजगारी व करिअर निवडण्याची समस्या : तरुण पिढीला आजच्या बाजारपेठेत करिअर घडवण्यात अनेक अडथळे येतात. बेरोजगारी ही एक प्रमुख समस्या असून, उच्च शिक्षण घेतल्यानंतरही चांगल्या नोकऱ्या मिळणे अवघड झाले आहे. याशिवाय, करिअर निवडण्याबाबतची गोंधळलेली मानसिकता, फक्त सरकारी नोकरीकडे लक्ष केंद्रीत असणे, उद्योग क्षेत्रातील माहितीचा अभाव आणि नवीन संधींचा शोध घेण्यात उदासीनता यामुळे तरुणांमध्ये नकारात्मकता येते.

३. मानसिक आरोग्याचे संकट : दिवसेंदिवस तरुण पिढीत मानसिक आजारांचे प्रमाण वाढत आहे. करिअर, स्पर्धा, अपेक्षा आणि समाज माध्यमांवर होणाऱ्या ताण–तणावांमुळे मानसिक समस्या गंभीर होत आहेत.यातून डिप्रेशन, चिंता, ताण,आणि आत्महत्येचे विचार या समस्या वाढल्या आहेत. मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता आणि उपचाराच्या सुविधांचा अभाव यामुळे हा प्रश्न अधिक बिकट झाला आहे.

४. व्यसनाधीनता व तणाव व्यवस्थापन : सध्याच्या काळात, अनेक तरुण धूम्रपान, मद्यपान आणि ड्रग्जच्या आहारी जात आहेत. ही व्यसने मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करतात. तणावाचे व्यवस्थापन न जमल्यामुळे व्यसनाधीनता वाढत आहे. अशा प्रकारे, तरुणांच्या उर्जेचा अपव्यय होत असून, त्यांचे आयुष्य प्रभावित होत आहे.

५. डिजिटल माध्यमांचा अत्यधिक वापर आणि सामाजिक आयुष्याचा अभाव : डिजिटल माध्यमे आजच्या तरुणांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि तंत्रज्ञानात अधिक गुंतल्याने अनेक तरुण आभासी जगात अडकले आहेत. परिणामी, त्यांचे सामाजिक आयुष्य, संवाद कौशल्य आणि वास्तव जगातील नाती कमकुवत झाली आहेत. आभासी जगात अडकणे ही तरुणांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्यासाठी मोठी समस्या ठरली आहे.

६. नैतिकता आणि समाजातील गोंधळलेली भूमिका :आजची युवा पिढी आपल्या समाजातील नैतिक मूल्यांपासून काहीशी दूर गेली आहे असे जाणवते. समाजातील वाढती हिंसा, असहिष्णुता आणि सामाजिक दृष्टिकोनातील फरक यामुळे तरुणांचे मानसिक संतुलन बिघडते. समाजाची बदलती मूल्ये आणि आधुनिक जीवनशैलीतील दडपण या समस्या अधिक गंभीर बनवत आहेत.

७.या समस्यांवर उपाय आणि प्रेरणा : या सर्व समस्यांचे निवारण करण्यासाठी शिक्षण व्यवस्था अधिक व्यावहारिक करणे, डिजिटल साक्षरता वाढवणे, मानसिक आरोग्यासाठी मार्गदर्शन व सल्लागार सुविधा उपलब्ध करणे आणि तणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. यासोबतच, तरुणांनी स्वतःला शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक दृष्ट्या सशक्त ठेवले पाहिजे. तरुण पिढी ही देशाची अमूल्य संपत्ती आहे, परंतु या पिढीने स्वतःच्या आव्हानांचा यशस्वीपणे सामना केला तरच स्वतःबरोबर देशाची प्रगती शक्य आहे.यामुळेच स्वामी विवेकानंद यांनी आत्मविश्वास, देशप्रेम आणि परिश्रमाचे महत्व याविषयी युवकांना दिलेली शिकवण आजही बहुमोल आहे. त्यांचे ऊठ, जागा हो, आणि जोपर्यंत लक्ष्य गाठत नाहीस तोपर्यंत थांबू नकोस हे शब्द तर युवकांसाठी प्रेरणादायक आहेत. तसेच, स्वामी विवेकानंदानी आत्म–उद्धरणाविषयी युवकांनी आपल्यातील दैवी गुण शोधून त्यांचा विकास करावा, असे म्हटले आहे. त्यांनी आत्मविश्वास, कार्यनिष्ठा, समाजसुधारणेचे कार्य, आणि राष्ट्रप्रेम यांचे महत्त्व शिकवले. या शिकवणीचा आपल्या जीवनात अवलंब केला, तर आपल्या जीवनातील उद्दिष्ट साध्य होऊन आपला समाजही समृद्ध होईल. त्याचप्रमाणे प्रत्येकाने आपल्यातील दोष काढून टाकून गुणसंवर्धन करण्याची आवश्यकता आहे. हे प्रत्यक्षात कसे करायचे हे आपण थोडक्यात जाणून घेऊया.

८.आदर्श व्यक्तीमत्त्व विकसित करण्याची आवश्यकता : व्यक्तीच्या जीवनातील कोणत्याही कठीण प्रसंगी मानसिक संतुलन बिघडून देता त्या प्रसंगाला धैर्याने तोंड देता यावे, तसेच त्याच्याकडून प्रत्येक कृती आदर्श व्हावी, यासाठी व्यक्तीचे मनोबल उत्तम आणि व्यक्तीमत्त्व आदर्श असणे आवश्यक असते. व्यक्तीमधील स्वभावदोष त्या व्यक्तीचे मन दुर्बल करण्यास कारणीभूत ठरतात, तर त्याच्यातील गुण हे आदर्श व्यक्तीमत्त्व विकसित करण्यास साहाय्यभूत ठरतात. म्हणूनच आदर्श व्यक्तीमत्त्व विकसित करण्यासाठी व्यक्तीमत्त्वातील स्वभावदोषांचे निर्मूलन करून गुणांचे संवर्धन करणे आवश्यक ठरते.

९.सुखी जीवन जगण्यात स्वभावदोष हा मोठा अडथळा :मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः। या वचनानुसार मन हेच मनुष्याच्या बंधनास (जन्म–मृत्यूच्या चक्रात अडकण्यास) आणि मोक्षास (जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटून सुख–दुःखाच्या पलीकडे असलेल्या आनंद आणि शांती यांची नित्य अनुभूती मिळण्यासाठी) कारणीभूत असते. व्यक्तीमत्त्वातील स्वभावदोष, हे व्यक्तीच्या दुःखास, तर गुण, हे व्यक्तीला सुख मिळण्यास कारणीभूत असतात. दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगांत आपल्याकडून होणाऱ्या वर्तनावरून आपल्यातील गुण–दोष लक्षात येतात. स्वभावदोषांमुळे जीवनात पदोपदी संघर्षाची आणि तणावाची परिस्थिती निर्माण होते. असे तणाव निर्माण झाल्यानंतर त्याचे खापर आजूबाजूचे वातावरण, परिस्थिती आणि अन्य व्यक्तींचे स्वभावदोष यांवर फोडले जाते; पण त्यामागील मूळ कारण असलेले स्वतःमधील स्वभावदोष शोधण्याचा प्रयत्नच केला जात नाही. त्यामुळे स्वभावदोष आहेत तसेच रहातात. परिणामी मनःशांती मिळत नाही; म्हणूनच जीवन सुखी होण्यासाठी स्वभावदोषांचा अडथळा दूर करणे अनिवार्य आहे.साधनेतही स्वभावदोषांचाच (षड्रिपूंचाच) प्रामुख्याने अडथळा असतो. स्वभावदोषांच्या माध्यमातून षड्रिपूंचे प्रकटीकरण होते. त्यामुळे साधनेने मिळालेली ऊर्जा स्वभावदोषांमुळे होणाऱ्या चुकांमुळे खर्ची पडते. स्वभावदोष म्हणजे चित्तातील जन्मोजन्मीचे संस्कार. ते चित्तात खोलवर रुजलेले असतात. म्हणूनच स्वभावदोष–निर्मूलनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे अपरिहार्य ठरते.

राष्ट्राची दुःस्थिती दूर करण्यासाठी सुसंस्कारित समाजमनाची आवश्यकता : प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये अनेक दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला आहे. समस्त राष्ट्रवासियांना धर्म आणि नीती यांचा पडलेला विसर आणि त्यांची होणारी घोर विटंबना यांमुळेच राष्ट्राला अवकळा आलेली आहे. समाजव्यवस्था सुस्थित करण्यासाठी स्वतःतील दुर्गुणांचे निर्मूलन आणि गुणांचे संवर्धन करणे, हे समाजातील प्रत्येक घटकाचे आद्य कर्तव्य ठरते. धर्म आणि जीवन यांची सांगड घालून समाजमन सुसंस्कारित करण्यासाठी आणि समाजातील घटकांमध्ये आंतरिक ऐक्य निर्माण करण्यासाठी स्वभावदोष–निर्मूलन, तसेच गुणांचे संवर्धन करणे आवश्यक आहे. यातूनच स्वामी विवेकानंद यांना अपेक्षित असा युवक निर्माण होईल आणि खऱ्या अर्थाने युवा दिन साजरा झाला असे म्हणता येईल.

: संकलक :
**सौ. अंजली पाध्ये**
**सौजन्य : सनातन संस्था**
**संपर्क : ९९७५५३६९०६**

# नव्या युगाचे आचार्य स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद केवळ एक अध्यात्मिक गुरु नव्हे तर अफाट बुद्धिमत्ता असलेले राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक सामाजिक समस्यांचा वेध घेऊन त्यावर आपल्या ओजस्वी मनाचा प्रकाश झोत टाकणारे युगाचार्य....!नव्या युगाचे आचार्य म्हणून भारताबरोबर जगभर स्वामीजींचे चाहते आहेत विशेषत: तरुणांनाना त्यांच्यातील दौर्बल्य,उदासीनता याची जाणीव करून दिली. आपण एक राष्ट्र विकासाचा कणा आहे त्यासाठी त्यांनी व्यायाम,वाचन किती महत्त्वाचे आहे हे सांगितले. वाचन,व्यायाम आणि विवेकानंद यांचे विचार ही त्रिसूत्री तरुण पिढीस स्वतःचा उत्कर्ष साधण्यास मदत करेल. मनुष्य म्हणजे देह आणि मन याची संरचना आहे त्यामुळे शरीराकडे दुर्लक्ष करणे शक्य नाही. शारीरिक दौर्बल्य हा आपल्या जीवनातील एक मोठा अडथळा आहे.स्वामीजींच्या मते आपण पोपटाप्रमाणे पुष्कळ बोलतो पण प्रत्यक्ष कृती करत नाही अर्थात शारीरिक दौर्बल्य याचे कारण आहे म्हणून म्हणून शरीर बलवान असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी व्यायामावर भर द्यायला हवा त्याचबरोबर नुसते शरीर बलवान असून भागणार नाही कारण नेमकं काय करावे. आपण जे कार्य करणार ते समाजहित व राष्ट्रहिताचे आहे की नाही यातील फरक लक्षात घेण्यासाठी मेंदू बलवान असणे महत्त्वाचे आहे. दुर्बल मेंदू काहीच करू शकत नाही. आपण तो वाचन, ज्ञान शिक्षणाने बलवान केला पाहिजे. प्रथम आपली तरुण पिढी सशक्त बनली पाहिजे. धर्म नंतरची बाब आहे. माझ्या तरुण मित्रांनो सामर्थ्य संपन्न व्हा...!

आकाशाप्रमाणे विशाल आणि सागराप्रमाणे खोल असे स्वामी विवेकानंद यांचे व्यक्तिमत्त्व आहे. दीडशे वर्ष इतका सुदीर्घकाळ लोटल्यानंतरही या महामानवाची, युगपुरुषाची मोहिनी जण–माणसांवर अजून सुद्धा तितकीच आहे, याचे कारण त्यांच्या व्याख्यानातून, संवादातून, भाषणातून, पत्रातून दिलेले विचार आजही तितकेच शुद्ध, ताजे आणि प्रासंगिक वाटतात. तुम्ही कोणत्या धर्माच्या आहात. कोणत्या संप्रदायाचे आहात किंवा कोणत्या जातीचे,वर्णाचे, देशाचे आहात हे सर्व प्रश्न अक्षरशः अर्थशून्य,कस्पटाप्रमाणे वाटू लागतात. तुम्ही मनुष्य आहात ना? तुम्हाला तुमची स्वतःची तसेच तुमच्या कुटुंबाची,समाजाची, राष्ट्राची उन्नती, विकास करायची इच्छा आहे का? तुम्हाला तुमच्या स्वतःचे जीवन सार्थक करण्याची तळमळ आहे का? अर्थात या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याची प्रमाणिक इच्छा आहे का? थोडक्यात तुम्ही जिथे ज्या अवस्थेत आहात तिथून तुम्हाला वर उठायचे आहे का? स्वतःचा उत्कर्ष साधायचे आहे का? जर ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतील तर स्वामी विवेकानंदांचे विचार हे तुमच्यासाठीच सर्वोत्तम आहे. हे सूर्यप्रकाशा इतके स्वच्छ आहे. स्वामीजींच्या ओजस्वी शब्दातील शक्ती आपल्या अंतरात्म्याला खडबडून जागी करणारी आहे. ज्याप्रमाणे कडक उन्हाळ्यामध्ये भर दुपारी उन्हाचे चटके, गर्मी,धुळ यांचा जीवघेणा त्रास सोसत घामाघुन झालेले असताना अचानकपणे मेघ दाटून यावे व सोबत शितल मंद वाऱ्यांची झुळूक यावी यातून तो अल्हाददायक आनंद आतील जीव सुखावतो. ते तुटक तुटक पावसाचे थेंब, गार हवा हवी हवीशी वाटते, त्याचप्रमाणे स्वामीजींच्या शब्दांमध्ये विचारांमध्ये अशीच पावसाचचे थेंब शितल गारव्याप्रमाणे आपला कायापलट करण्याची,जगण्याला नवा अर्थ देण्याची, हवीहवीशी वाटणारी नवी उभारी आणण्याची ताकद आहे. स्वामीजी म्हणतात, जेव्हा आपण खूप अडचणीत असतो जसे की,युद्धप्रसंगी, अक्षरश: मृत्याच्या छायेत, घनदाट जंगलात अथवा कुठेही असताना स्वतः म्हणा मी दुर्बल नाही.मी बलवान आहे.असे स्वतःचे स्वतःला सांगत राहा.असं रात्रंदिवस म्हणा हे सर्वात मोठे सामर्थ्य आहे.हाच धर्म आहे. दुर्बलांना कधीही आत्मलाभ होऊ शकत नाही.हे ईश्वरा! मी दीन आहे असे कधीही म्हणू नका. तुम्हाला कोण मदत करणार? तुम्हीच तुमचे सहाय्यक आहात. तुम्ही या विश्वाचे ईश्वर आहात. तुमच्याहून वेगळा असा कोणी तुमचा साह्यकर्ता नाही. तुम्हीच विश्वाचे निर्माते आहात.रेशमांच्या किड्यांप्रमाणे तुम्ही आपल्या भोवती एक कोष निर्माण केला आहे.तुमचा उद्धार कोण करील? तुम्हीच हा कोष तोडून बाहेर या व मुक्त होऊन फुलपाखराप्रमाणे विचरण करा, तेव्हाच तुम्हाला सत्याचा साक्षात्कार होईल. जी महाशक्ती मूलत:च तुमच्या ठायी आहे, ती जागृत करा. सतत सत्य श्रवण केल्याने ती शक्ती जागृत होईल इतर कोणत्याही उपायाने नाही. जिथे कुठे दुर्बलता निर्माण करणारा विचार असेल तिथे मुळीच जाऊ नका. ज्ञानी व्हायचे असेल तर सर्व तऱ्हेने दौर्बल्य टाळा. असा मोलाचा उपदेश स्वामीजी तरुणांना करतात.

स्वामीजींच्या महासमाधीनंतर जगात दोन महायुद्ध होऊन गेली त्याचा परिणाम संपूर्ण जगभर होऊन गेला व होत आहे. कित्येक राष्ट्र उदयास आली व लोकपावली. भारताला अनेक संघर्षातून व बलिदानातून एक वैशिष्ट्यपूर्ण स्वातंत्र्य मिळाले त्यानंतरही शत्रूंकडून भारताची शांतता भंग करण्याचे कार्य चालू आहे ते आजतागायत.....! अशा परिस्थितीतही आपला भारत देश सहीसलामत वाचला व पुढे हळूहळू चालू लागला आहे. विज्ञान तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. या सर्व घडामोडी मध्ये आपण बरेच काही मिळवले आहे व अनेक पटींनी गमावले सुद्धा..! परिस्थिती निराशादायक नसली तरी आशादायक निश्चितच आहे...! राष्ट्राचाकणा म्हटली जाणारी आजची ही तरुण पिढी व्यसनाधीनता, मोबाईल, इंटरनेटचा



अतिवापर त्यातून येणारी उदासीनता, नैराश्य,एकाकीपणा यामुळे मानसिक व शारीरिक दुर्बल होत आहेत म्हणून, स्वामीजींच्या विचारांशी अंतर्मुख होऊन आत्मचिंतन करूया. स्वामीजींच्या भाषेत आता बडबड नको तर खरे कार्य पाहिजे स्वामीजींच्या जीवनातून,उपदेशातून प्रेरणा घेऊन सर्व समाजाचे राष्ट्राचे जीवन धन्य करूया. युगाचार्य स्वामी विवेकानंदजीं यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...!

**विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जी. बुलढाणा**
**मो. ९७६३२८२०७७**

# बांगलादेशात आणखी किती हिंदूंचा बळी जाणार?




गतवर्षी ५ ऑगस्टला बांगलादेशात हसीना शेख यांचे सरकार पडल्यानंतर देशभरात हिंसाचाराची लाट पसरली. सुरुवातीला आपापसांतील वाटणारा हा वाद हळूहळू तेथील हिंदूंच्या दिशेने वळला. स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष केले जाऊ लागले, हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली, त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली, त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या, त्यांना त्यांच्याच घरातून हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले, देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली, हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदुविरोधी लोण आजही कायम आहे. सुदेव हलदर नावाच्या एका २८ वर्षीय तरुणाचा गळा चिरलेला मृतदेह नुकताच बांगलादेशातील रामपूर जोरापोल परिसरात आढळून आला. मोबाईलचे दुकान चालवणारा सुदेव रात्री दुकान बंद करून घरी परतत असताना अज्ञातांनी त्याची गळा चिरून हत्या केली. सुदेव याचे कुणाशीच वैर नव्हते त्यामुळे तो हिंदू असल्यानेच त्याची हत्या झाली असल्याचे म्हटले जात आहे. असे शेकडो सुदेव मागील ५ महिन्यात बांगलादेशमधील हिंसाचाराला बळी पडले आहेत. शेकडो हिंदू माता भगिनींवर बलात्कार झाले आहेत, हिंदूंची मंदिरे फोडली गेली आहेत. हिंदूंनी आपले घरदार सोडून बांगलादेशातून चालते व्हावे यासाठीच हा हिंसाचार चालू आहे. बांगलादेशातील हिंदूंची स्थिती अत्यंत दयनीय आहे.

१९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या पाच महिन्यांत तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांत बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटीहून अधिक झाली आहे भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचे सिद्ध झाले आहे. घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही. एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत. देशात राहून देशाशी बेईमानी करणारे काही देशद्रोही नागरिक या बांगलादेशीच्या खाण्याची आणि राहण्याची व्यवस्था करत आहेत, त्यामुळे त्यांना शोधून देशातून हाकलून लावणे पोलिसांनाही जिकरीचे होऊ लागले आहे. मध्यंतरी काही भागांत नागरिकांनीच पुढाकार घेऊन परिसरातील बांगलादेशी नागरिकांना शोधण्याची मोहीम सुरु केली होती; मात्र तीही आता थंडावली आहे. बांगलादेशातून पळून भारतात आलेल्या शेख हसीना यांच्या सुरक्षेत सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. त्यांच्या पारपत्राची मुदत संपल्यानंतरही सरकारने त्यांच्या व्हिसाची मुदत वाढवली आहे, दुसरीकडे बांगलादेशात प्रतिदिन होणाऱ्या हिंदूंच्या दमनासाठी देशाचे सरकार काहीच पावले उचलताना दिसत नाही. देशाची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था धोक्यात आणणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांबाबत सरकार कोणतेही विशेष धोरण आखताना दिसत नाही त्यामुळे भविष्यात भारतातून घुसखोरांना हाकलण्यासाठी सामान्य जनतेनेच पुढाकार घेतल्यास आश्चर्य वाटायला नको!



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

# भारत मातेचे थोर सुपुत्र; लाल बहादूर शास्त्री



भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५९ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. आज ५९ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# जीवघेणा नायलॉन मांजा

जानेवारी महिना उजाडला की सर्वांना वेध लागतात ते मकर संक्रांत या सणाचे. मकर संक्रांत हा हिंदू धर्मातील सर्वात महत्वाचा सण मानला जातो. मकर संक्रांतीनिमित्त पंतगोत्सव साजरा करण्याची आपल्याकडे खूप जुनी परंपरा आहे. रंगीबेरंगी पतंग आकाशात उडवून हा उत्सव साजरा केला जातो. लहानांपासून मोठयांपर्यंत सर्वचजण पतंग उडविण्याचा आनंद यानिमित्ताने लुटत असतात पण अलीकडे हा खेळ जीवघेणा ठरत आहे. पतंग उडविण्यासाठी पूर्वी साधा सुती दोरा वापरला जात होता मात्र काही वर्षांपासून पतंग उडविण्यासाठी चिनी किंवा नायलॉन मांजाचा वापर केला जातो आणि हाच नायलॉन मांजा आता जीवघेणा ठरत आहे. मागील आठवड्यात पुण्यातील वारजे, धनकवडी आणि कात्रज – कोंडवा परिसरात दुचाकी वरून जाणाऱ्या व्यक्तींच्या गळ्याला नायलॉन मांजा कापल्याने दुखापत झाल्याची घटना घडल्या. केवळ नशीब बलवत्तर होते म्हणून त्यांचा जीव वाचला अर्थात सर्वांचेच नशीब बलवत्तर असते असे नाही. मागील वर्षी दुचाकीवरून जाताना नायलॉन मांजाने गळा चिरून पोलीस हवालदाराचा मृत्यू झाल्याची बातमी नुकतीच वाचण्यात आली होती. अर्थात नायलॉन मांजाने गळा चिरून निष्पाप नागरिकाचा मृत्यू झाल्याची टी पहिलीच बातमी नव्हती दरवर्षी अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. दौंडमध्येही दोन वर्षी अशाच प्रकारे एका दुचाकी स्वाराचा बळी गेला होता. तीन वर्षापूर्वी पुण्यात एका तरुणीला ही अशाच प्रकारे दुर्दैवी मृत्यू आला होता. केवळ पुण्यात नाही तर नाशिकमध्येही अशीच घटना घडली होती त्यातही एका महिलेचा नायलॉन मांजाने गळा चिरून दुर्दैवी मृत्यू झाला होता. अर्थात हे प्रातिनिधिक उदाहरणे आहेत अशाप्रकारे नायलॉन मांजाने राज्यात अनेक निष्पापांना आपला जीव गमवावा लागला आहे. या मांजामध्ये अडकून आकाशात मुक्तविहार करणारे पक्षीही जखमी होतात काही पक्षी मृत्यू पावतात. चिनी बनावटीचा हा मांजा नायलॉन धागा, काचेचा चुरा, लोखंडाचे कण आणि रासायनिक पदार्थांपासून बनवला जातो. हा मांजा माणसांसोबत पक्षी आणि प्राण्यांसाठी देखील घातक आहे. वास्तविक नायलॉन मांजाचा खरेदी विक्रीवर बंदी घालण्याचे आणि वापराबाबत प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. मांजामुळे पशूपक्षांना होणाऱ्या दुखापतीच्या संदर्भात पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाने राज्य सरकारला पत्र पाठवले होते. नायलॉन मांजामुळे वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ च्या अनुसूचितील वन्यप्राणी व पक्षांचा मृत्यू झाल्यास किंवा त्यांना दुखापत झाल्यास वन कायद्याच्या कलम ९ नुसार कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यामुळे नायलॉन मांजाच्या विक्रीवर महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली असतानाही हा मांजा दुकानात सर्रास विकला जात आहे तरीही विक्रेत्यांवर कारवाई होताना दिसत नाही. काही ठिकाणी प्रशासनाने कारवाई केल्याच्या बातम्या आल्या ही समाधनाची बाब असली तरी कारवाईत सातत्य नाही. जो मांजा दुकानात विकण्यासाठी येतो तोच मांजा प्रशासनाला कसा मिळत नाही? आणखी किती बळी गेल्यावर प्रशासनाला जाग येणार आहे? प्रशासनाने नायलॉन मांजा विरोधात धडक मोहीम राबवायला हवी. नायलॉन मांजा विकणारा आणि खरेदी करणारा अशा दोघांवरही कारवाई व्हायला हवी. नागरिकांनीही नायलॉन मांजाने पतंग उडविण्याऐवजी साध्या सुती दोरीचा वापर करून पतंग उडवावी आणि हा सण साजरा करावा.

# स्प्रिंग फेस्ट त्याच्या ६५व्या आवृत्तीसह परत येत आहे



स्प्रिंग फेस्ट हा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) खरगपूरचा वार्षिक सामाजिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे. स्प्रिंग फेस्ट हा आशियातील सर्वात मोठा सांस्कृतिक उत्सव आहे जो संपूर्णपणे विद्यार्थ्यांद्वारे आयोजित केला जातो, ज्याची ऑनलाइन पोहोच २ दशलक्षाहून अधिक आहे. भारतातील ८०० हून अधिक आघाडीच्या महाविद्यालयांतील उत्साही सहभागी या ३ दिवसांच्या मौजमजेच्या आणि उत्साहाच्या उत्सवासाठी खरगपूरला येतात.

स्प्रिंग फेस्ट २०२५ ने २४–२६ जानेवारी २०२५ रोजी त्याची ६६ वी आवृत्ती साजरी केली.

स्प्रिंग फेस्टने नृत्य, नाटक, संगीत, फॅशन इत्यादी विविध कलात्मक कार्यक्रमांसाठी हिचहाइक नावाची देशव्यापी प्राथमिक फेरी यशस्वीपणे आयोजित केली. हा रोमांचक कार्यक्रम दिल्ली, मुंबई, पुणे, बेंगळुरू, हैदराबाद, अहमदाबाद, विशाखापट्टणम, लखनौ, जयपूर आणि चंदीगड सारख्या १० दोलायमान भारतीय शहरांमध्ये झाला. स्प्रिंग फेस्ट सर्व न्यायाधीशांना त्यांच्या मौल्यवान वेळेबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. सहभागी आणि समर्पित आयोजक संघाचे उत्साही वातावरण प्रेक्षकांसाठी आनंददायी आणि उत्साही होते.

एका भव्य सुरुवातीच्या फेरीनंतर, स्प्रिंग फेस्ट आता कोलकाता, भुवनेश्वर, पाटणा, रांची, गुवाहाटी आणि रायपूर या आणखी ६ शहरांमध्ये नृत्य, नाटक, संगीत, फॅशन आणि साहित्यिक कार्यक्रमांच्या एलिमिनेशन फेस्टकडे जाण्यासाठी सज्ज झाला आहे. सर्व इच्छुक विद्यार्थी आणि सांस्कृतिक अकादमी या एलिमिनेशनमध्ये सहभागी होऊ शकतात. अधिक माहिती आणि नोंदणीसाठी eliminations.springfest.in ला भेट द्या आणि तुमच्या आवडत्या कार्यक्रमासाठी लवकर नोंदणी करा.

बॅटल ऑफ द बँड्स वाइल्डफायर ही प्रीमियर रॉक बँड स्पर्धा लवकरच मुंबई, बेंगळुरू, दिल्ली, कोलकाता आणि शिलाँग या ५ मोठ्या शहरांमध्ये १.५ लाख रुपयांच्या बक्षीस रकमेसह आपली जादू पसरवणार आहे. सर्व बँड ज्यांना त्यांची प्रतिभा दाखवायची आहे आणि स्प्रिंग फेस्टच्या इतिहासात त्यांचे नाव लिहायचे आहे ते wildfire.springfest.in वर नोंदणी करू शकतात.

स्प्रिंग फेस्टमध्ये १३ वेगवेगळ्या शैलींमध्ये १३० हून अधिक कार्यक्रम आयोजित केले जातात, जिथे भारतातील सर्वोत्कृष्ट प्रतिभा सुमारे ३५ लाख रुपयांच्या एकूण बक्षीस रकमेसाठी स्पर्धा करतात. या वर्षीही तुमच्या संवेदनांना चालना देण्यासाठी आणि तुमच्यात दडलेल्या कलागुणांना उलगडण्यासाठी अनेक नवीन कार्यक्रम सादर करण्यात आले आहेत. हे कार्यक्रम सहभागींना आयुष्यभराच्या अनुभवाचा आनंद घेण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करतात.

दरवर्षी स्प्रिंग फेस्ट हा एक महत्त्वाचा सामाजिक उपक्रमही हाती घेतो. गेल्या वर्षी, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्याच्या उद्देशाने प्रबल – फायटिंग स्ट्रॉन्जर, वन सेल ट अ टाइम नावाचा उपक्रम सुरू केला.

स्टार नाईट्स हा स्प्रिंग फेस्टच्या आकर्षणाचा नेहमीच अविभाज्य भाग राहिला आहे. वर्षानुवर्षे शान, सुनिधी चौहान, विशाल–शेखर, किंग, न्यूक्लिया, फरहान अख्तर, अमित त्रिवेदी, शंकर–एहसान–लॉय, सलीम–सुलेमान, केके, प्रतीक कुहाड, निखिल डिसूझा, रघु दीक्षित प्रोजेक्ट, अग्नि, भारतीय महासागर, अननस एक्सप्रेस, परिक्रमा, युफोरिया, पेंटाग्राम, लोकल ट्रेन आणि एप्रिलपर्यंत मृत, स्मारके, यांसारखे भारतीय कलाकार, टेसरॅक्ट सारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांनी अप्रतिम कामगिरी केली आहे.

स्प्रिंग फेस्ट हा इतिहास आणि समृद्ध संस्कृतीने भरलेला एक भव्य उत्सव असल्याचे वचन देतो. हा एक उत्सव आहे जो तुम्हाला चुकवायचा नाही.

अधिक माहितीसाठी, स्प्रिंग फेस्ट, IIT खरगपूरच्या फेसबुक पेजला भेट द्या किंवा आमच्या वेबसाइट www.springfest.in वर लॉग इन करा.

**तंत्रज्ञान विद्यार्थी जिमखाना**
**इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी,**
**खरगपूर ७२१३०२**
**www.springfest.in**

# रात्रभर चांगल्या झोपेसाठी सॅमसंग विंडफ्री एअर कंडिशनर्स आता खास वैशिष्ट्यासह उपलब्ध

**गुरुग्राम, १० जानेवारी :** सॅमसंगने रात्रीभर चांगली झोप येण्यासाठी झोपेच्या टप्प्यानुसार घरातील तापमान समायोजित करणारा गुड स्लीप मोड सादर केला आहे. आता या मोडमध्ये आणखी सुधारणा करण्यात आली आहे, ज्यामुळे वापरकर्ते त्यांचे एअर कंडिशनर गॅलेक्सी वॉच सीरिजशी कनेक्ट करू शकतील आणि झोप लागल्यानंतर गुड स्लीप आपोआप सक्रिय होईल.

झोपेसाठी योग्य आजूबाजूच्या तापमानाचा प्रभाव खूप महत्त्वाचा असतो. मध्यरात्री घामाने भिजून जागे होणे किंवा थंडीत गारठणे, अशी अवस्था बहुतेक लोकांसाठी परिचित आहे. याच कारणामुळे सॅमसंगने लोकांना रात्री चांगली झोप मिळावी यासाठी एअर कंडिशनरमध्ये एक मोड विकसित करण्याचा निर्णय घेतला.

या मोडचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे झोपेसाठी योग्य तापमान झोपेच्या पूर्ण कालावधीसाठी एकसारखे राहात नसते. त्यामुळे अनेकजण झोपण्यापूर्वी आपले एअर कंडिशनर योग्य तापमानावर सेट करतात, तरीही ते मधेच जागे होतात. व्यक्ती झोपेच्या कोणत्या टप्प्यात आहे झोप लागत आहे, गाढ झोपेत आहे किंवा झोपेतून जागे होत आहे त्यानुसार योग्य तापमान बदलते. सॅमसंगच्या टीमने २०१५ मध्ये क्युंगही विद्यापीठासोबत भागीदारी करून प्रत्येक झोपेच्या टप्प्यासाठी योग्य तापमान शोधले आणि एअर कंडिशनरसाठी एक अचूक अल्गोरिदम तयार केला.

गुड स्लीप मोड झोपेच्या चक्रानुसार घरातील तापमान बदलतो. झोप ५ टप्प्यांची असते वेक, आरईएम जलद डोळ्यांची हालचाल (रॅपिड आय मूव्हमेंट), आणि एनआरईएम जलद डोळ्यांची हालचाल नसलेली झोप (नॉन-रॅपिड आय मूव्हमेंट स्लीप) झोपेचे ३ टप्पे. झोपेच्या प्रत्येक टप्प्यात मेंदूच्या लहरींमध्ये, डोळ्यांच्या हालचालींमध्ये, आणि शरीराच्या तापमानामध्ये बदल होतात. झोपेचे हे पाच टप्पे साधारणतः ९० मिनिटांचे एक पूर्ण चक्र तयार करतात. रात्रीच्या झोपेत हे चक्र चार ते सहा वेळा पुनरावृत्त होते.

गुड स्लीप चक्र झोपेच्या टप्प्यानुसार घरातील तापमान समायोजित करते. सुरुवातीला, प्रथम, व्यक्ती झोपेत जात असताना, ५ मिनिटांत तापमान लवकर कमी करून एक आनंददायक वातावरण तयार केले जाते. गाढ झोप येण्यासाठी पुढील ९० मिनिटांसाठी तापमान कमी ठेवले जाते. ९० मिनिटांनंतर, एअर कंडिशनर २ आणि ३ या झोपेच्या खोल टप्प्यांसाठी तयारी करण्यासाठी तापमान वाढवतो. या टप्प्यांमध्ये शरीराचे तापमान आणि रक्तदाब सर्वाधिक कमी होतो, ज्यामुळे बाहेरचे तापमान थोडे उबदार असणे आवश्यक असते. थंड वाटण्यामुळे जाग येऊ नये यासाठी लक्ष्य तापमानाच्या पातळीपेक्षा दोन अंशांनी तापमान वाढवले जाते.

आठ तासांच्या झोपेच्या चक्रादरम्यान, हलक्या आरईएम झोपेच्या आणि खोल एनआरईएम झोपेच्या टप्प्यांमध्ये आलटून-पालटून बदल होतो. गुड स्लीप मोड रात्री तीन वेळा तापमान समायोजित करतो. झोपेच्या शेवटी तापमान वाढवले जाते, परंतु ताजेतवाने वातावरण तयार करण्यासाठी हलका वारा वाहू लागतो.

# मर्सिडीज-बेंझने भारतात इतिहासातील सर्वाधिक विक्री नोंदवली: २०२४ मध्ये मजबूत वाढ

**पुणे, १० जानेवारी :** भारतातील सर्वात लोकप्रिय लक्झरी कार ब्रँड असलेल्या मर्सिडीज-बेंझने जानेवारी-डिसेंबर २०२४ मध्ये सर्वोत्तम विक्री नोंदवली आहे. ब्रँडच्या भारतातील ३० वर्षांच्या इतिहासातील ही सर्वाधिक विक्री आहे. यामुळे, मर्सिडीज-बेंझच्या 'थ्री-स्टार' वाहनांच्या विशिष्टतेसह, भारतातील 'सर्वात इच्छित' लक्झरी कार ब्रँड म्हणून त्याची प्रतिष्ठा मजबूत झाली आहे. जानेवारी-डिसेंबर २०२४ या कालावधीत १९,५६५ नवीन कार विकल्या गेल्या. आव्हानात्मक बाजारपेठेतही कंपनीने १२.४ टक्के प्रभावी वाढ नोंदवली.

मर्सिडीज-बेंझने २०२४ मध्ये चारही सर्वोत्तम तिमाही अनुभवल्या आहेत, ज्यामध्ये ब्रँडने भारतातील आतापर्यंतची सर्वोत्तम वार्षिक विक्री नोंदवली आहे. २०२४ च्या चौथ्या तिमाहीत YTD वाढ १२% होती, तर दुसऱ्या सहामाहीत विक्री १६% वार्षिक वाढली. आव्हानात्मक बाजारपेठा आणि मॅक्रो-इकॉनॉमिक आव्हाने असूनही, मर्सिडीज-बेंझने वर्षभर स्थिर विक्री कामगिरी बजावली.




नवीन लाँच झालेल्या आणि विद्यमान वाहन पोर्टफोलिओ आणि सुधारित किरकोळ ग्राहक अनुभवामुळे विक्रीला चालना मिळाली. मर्सिडीज-बेंझच्या एंट्री, कोअर आणि टॉप-एंड व्हेईकल (TEV) सेगमेंटमध्ये जोरदार मागणी दिसून आली. नवीन आणि विद्यमान वाहनांनीही चांगली कामगिरी केली. २०२४ मध्ये मर्सिडीज-बेंझची १४ नवीन वाहने लाँच झाली. मर्सिडीज-बेंझच्या दृष्टिकोनानुसार ग्राहकांना आकर्षित करणारे आणि ग्राहकांच्या आकांक्षा उंचावणारे ९ आकर्षक टॉप-एंड वाहने भारतात लाँच करण्यात आली.

# महात्मा फुले विद्यालयाच्या वार्षिक उत्सवात अदानी फाउंडेशनने खेळाडूंना केले सन्मानित



**नागपूर, १० जानेवारी :** सुराबर्डी येथील महात्मा फुले विद्यालय व तुकारामजी पिसे कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले. यादरम्यान, विविध सांस्कृतिक व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा प्रदर्शित केली. स्पर्धेत तेराशे विद्यार्थी सहभागी झाले. त्यातून उत्कृष्ट साठ स्पर्धकांना अदानी फाऊंडेशनच्या सीएसआर उपक्रमातून त्यांना सन्मानित करण्यात आले. ज्यात मुलं आणि मुलींचा समावेश आहे.

फाउंडेशनचा उद्देश मुलांमध्ये खेळाची भावना निर्माण करणे आणि त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासाला प्रोत्साहन देणे हा आहे.

यात कबड्डी, लंगड़ी, खो-खो, ट्रिपल जंप, रस्सी कूद, सुई-दोरा, लिंबू चमचा स्पर्धा तसेच ५० मीटरची सामान्य स्पर्धेचा समावेश होता.

यावेळी चंद्रपूरचे जिला योजना अधिकारी, सुराबर्डीचे सरपंच, वाडीचे पूर्व पुलिस उपनिरीक्षक, अदाणी प्रशासनिक प्रमुख, कांधापुर शाळेचे निदेशक, फुले शाळेचे प्रधानाचार्य उपस्थित होते.

पाहुण्यांनी मुलांच्या मेहनतीचे कौतुक केले. अदाणी फाउंडेशनचा उद्देश विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासाला बढावा देणे हा आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुलांना स्पर्धेचा अनुभव तर मिळाला सोबतच त्यांचा आत्मविश्वास आणि खेळाची भावनाही मजबूत झाली. त्यांना अनुशासन, समर्पण आणि परिश्रमाचे महत्त्व समजण्याची संधी मिळाली. असेच कार्यक्रम भविष्यातदेखील व्हावे अशी आशा पालकांनी व्यक्त केली.

# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दिलीपला मिळाली आमदारकी

**मुंबई, १० जानेवारी :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील पुष्पा (करुणा पांडे) या धडाडीच्या आणि निडर स्त्रीच्या कथेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. पुष्पा आयुष्यातील संकटांना सकारात्मकतेने आणि हिंमतीने तोंड देते. अलीकडच्या भागांमध्ये पुष्पाच्या कुटुंबाचे नववर्षाचे सेलिब्रेशन सुरू असताना एक वेगळेच नाट्य रंगते. चाळीचा मालक बापोद्रा (जयेश भारभाया) अचानक दिलीप (जयेश मोरे)ला त्याची जागा खाली करण्याची नोटिस देऊन सगळ्यांना धक्का देतो. यावेळी बापोद्रावर कुरघोडी करण्यासाठी पुष्पा आणि दिलीप एक होतात. आणि मग दिलीप एका तिसऱ्या पार्टीच्या मदतीने घर विकत घेऊन बापोद्राला धक्का देतो.

आगामी भागांमध्ये, नाट्य आणखी रंगत जाते. बापोद्रा आणि दिलीप राजकारणाच्या रिंगणात उतरतात आणि निवडणुकीत एकमेकांसमोर उभे राहतात. बापोद्रा एक व्हिडिओ मीडियामध्ये लीक करून दिलीपची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करतो. या व्हिडिओमध्ये दिलीपने एका कारमध्ये बादशाह (हितू पुजारा)ला कसे डांबून ठेवले आणि त्याचा छळ केला हे दिसते. परंतु, बापोद्रा आपल्या या नीच क्लृप्तीने देखील दिलीपला रोखू शकत नाही आणि दिलीप निवडणूक जिंकतो.

शत्रू आता एकाच घरात आहेत. तर पुढे कोणते ट्विस्ट येणार?

दिलीप पटेलची भूमिका करणारा जयेश मोरे म्हणतो, दिलीप पटेल एक गुंतगुंतीची व्यक्तिरेखा आहे. ती सतत आपल्या वागण्याने प्रेक्षकांना धक्के देत असते. हे कथानक खूपच थरारक आहे. व्यक्तिगत आणि राजकीय लढ्यात बापोद्राच्या कृत्यांना प्रत्युत्तर देताना दिलीपची तल्लख बुद्धी आणि निर्धार प्रेक्षकांना दिसेल.

# वी आणि लायन्सगेट प्लेची धोरणात्मक भागीदारी वी मूव्हीज अँड टीव्हीवर प्रीमियम कन्टेन्ट प्रस्तुत करणार

**नागपूर, १० जानेवारी :** भारतातील आघाडीची टेलिकॉम ऑपरेटर कंपनी, वी ने लायन्सगेट प्ले या प्रीमियम स्ट्रीमिंग सर्व्हिससोबत धोरणात्मक भागीदारी केल्याची घोषणा केली आहे. या भागीदारीने टॉप-टीयर कन्टेन्टची विशेष लायब्ररी युजर्सना खुली करून दिली आहे. ॲक्शन ब्लॉकबस्टर, आयकॉनिक फ्रॅन्चायजी, प्रचंड गाजलेले सिनेमे व सीरिज, जागतिक पुरस्कार सोहळे, विशेष प्रीमियर्स आणि अनेक वेगवेगळ्या भाषांमधील डब केलेला कन्टेन्ट असा भरगच्च खजिना सादर करून अतुलनीय मनोरंजन अनुभव लायन्सगेट मिळवून देईल. या भागीदारीमुळे वीचा ओटीटी पोर्टफोलिओ अजून जास्त वाढणार आहे, अनेक वेगवेगळ्या प्रीमियम हॉलिवूड मूव्हीज, ओरिजिनल सीरिज, आंतरराष्ट्रीय टायटल्सची भली मोठी लायब्ररी सहज परवडण्याजोग्या किमतीला उपलब्ध होणार आहे.

वी मूव्हीज अँड टीव्ही हे ॲप ग्राहकांच्या वेगवेगळ्या मनोरंजन गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाईन करण्यात आले आहे. एकाच ॲपमध्ये, एकाच सबस्क्रिप्शनमध्ये आघाडीचे ओटीटी एकत्र आणून वी ने आपल्या ग्राहकांना खूप मोठी सुविधा प्रदान केली आहे. डिस्ने+ हॉटस्टार, सोनीलिव, झीपासून फॅनकोड फॉर स्पोर्ट्सपर्यंत तसेच सनएनएक्सटी, मनोरमामॅक्स, नम्माफ्लिक्स, क्लिक आणि चौपाल यासारखा क्षेत्रीय कन्टेन्ट आणि आता लायन्सगेट प्लेसोबत सहयोग करण्यात आल्यामुळे हॉलिवूडमधील सर्वोत्तम कन्टेन्ट याठिकाणी उपलब्ध झाला आहे. पेक्षा जास्त लाईव्ह टीव्ही चॅनेल्स, पेक्षा जास्त लाईव्ह न्यूज चॅनेल्स देखील यामध्ये आहेत. हे सर्व वी मूव्हीज अँड टीव्ही ॲपवर पाहता येईल, स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही तसेच लॅपटॉप्स, टॅबलेट्सवर देखील याचा आनंद घेता येईल.

लायन्सगेट प्लेसोबत वी ने हातमिळवणी केल्यामुळे वी मूव्हीज अँड टीव्ही युजर्सना आता जागतिक पातळीवर अतिशय लोकप्रिय असलेला कन्टेन्टची विशाल लायब्ररी खुली होणार आहे, यामध्ये जॉन विक, द हंगर गेम्स आणि सॉ, तसेच पास्ट लाइव्ह्ज, टोकियो व्हाईस, पॅरिस हॅज फॉलन, नॉर्मल पीपल, ऑपरेशन फॉर्च्युन, प्लेन, हिटमॅन्स वाईफ्स बॉडीगार्ड, द आयरन क्लॉ, द बीकीपर, आर्केडियन आणि इतर अनेक टायटल्स इथे उपलब्ध आहेत. जागतिक पातळीवरील प्रतिष्ठित पुरस्कार सोहळे प्राईमटाइम एमी अवॉर्ड्स, गोल्डन ग्लोब्स, क्रिटिक्स चॉईस आणि बाफ्टा अवॉर्ड्स इथे पाहता येतील. वी मूव्हीज अँड टीव्ही सबस्क्रायबर्सना प्रीमियम आणि जागतिक स्तरावरील सर्वोत्तम कन्टेन्ट सहज उपलब्ध होणार आहे.

नवनवीन विचार, संकल्पना आणि सर्वोत्तम मनोरंजन प्रदान करण्याप्रती वी ची वचनबद्धता लायन्सगेट प्लेसोबतच्या भागीदारीतून दिसून येते. लायन्सगेट प्लेसारखे नामांकित प्लॅटफॉर्म आणून वी ने भारतीय दर्शकांच्या बदलत्या व वाढत्या आवडीनिवडी पूर्ण करण्यासाठी एक समृद्ध व वैविध्यपूर्ण कन्टेन्ट इकोसिस्टिम डिझाईन करण्यासाठी आपली बांधिलकी पुन्हा एकदा प्रदर्शित केली आहे.

# सॅमसंग जानेवारीला मोबाइल एआय अनुभवांमधील आगामी मोठ्या झेपची घोषणा करणार

**मुंबई, १० जानेवारी :** अधिक नैसर्गिक व सर्वोत्तम असलेल्या एआयसाठी सज्ज राहा. गॅलॅक्सी एआयची आगामी उत्क्रांती येत आहे आणि यामुळे दररोज जगासोबत परस्परसंवाद साधण्याच्या पद्धतीमध्ये बदल होणार आहे. नवीन गॅलॅक्सी एस सिरीज पुन्हा एकदा वर्तमान व भविष्यासाठी मोबाइल एआय अनुभवाकरिता स्तर स्थापित करणार आहे.

जानेवारी रोजी सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स सॅन जोस येथे अनपॅक्डचे आयोजन करणार आहे. आमच्यासह सामील व्हा, जेथे आम्ही प्रीमियम गॅलॅक्सी इनोव्हेशन्स मोबाइल एआयमधील नवीन चॅप्टरचे अनावरण करणार आहोत, जे तुमच्या जीवनातील प्रत्येक क्षणामध्ये विनासायास सोयीसुविधा आणतील. या इव्हेण्टचे लाइव्ह स्ट्रिमिंग भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री . वाजता Samsung.com/in, Samsung Newsroom India आणि Samsung's YouTube channel यावर होणार आहे.

# विदिशा श्रीवास्तव यांनी 'गोरी मेम' म्हणून लोकप्रियतेप्रती दिली प्रतिक्रिया!

**मुंबई, १० जानेवारी :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये लोकप्रिय अनिता भाबीची भूमिका साकारणसाठी प्रसिद्ध प्रतिभावान अभिनेत्री विदिशा श्रीवास्तव त्यांची मोहकता, हुशारी व उत्साही आत्मविश्वासासह प्रेक्षकांचे मन जिंकत आहेत. पण विदिशा यांचे वास्तविक व्यक्तिमत्त्व आणि मालिकेमधील त्यांची भूमिका यांच्यामध्ये किती साम्य आहे? मुलाखतीदरम्यान त्यांनी त्यांचा प्रवास, आव्हाने आणि अनिता भाबीची भूमिका साकारण्यामागील सिक्रेट्स सांगितले.

**अभिनेत्री असण्याबाबत तुम्हाला कोणती गोष्ट सर्वाधिक आवडते?**

अभिनय मला प्रेक्षकांशी संलग्न होण्यास आणि विविध भूमिका साकारण्यास मंच देतो. सर्वात उत्साहवर्धक व लाभदायी बाब म्हणजे मनोरंजन करण्याची क्षमता. इतरांना हसताना किंवा माझे काम आपलेसे वाटताना पाहण्यासारखा आनंद नाही. यामधून खूप समाधान मिळते.

**अभिनेत्री नसता तर तुम्ही काय करत असता?**

मी मॉडेलिंग सुरू ठेवले असते किंवा कदाचित इमेज कोच म्हणून करिअर घडवले असते. मला नेहमी स्टाइल, ग्रुमिंग व वैयक्तिक सादरीकरणाची आवड आहे. इतरांना मदत केल्यानंतर आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या सर्वोत्तम बाबींना सादर करण्याचा अनुभव लाभदायी राहिला असता. हीच बाब मालिकेमध्ये अनिता भाबी करत असलेल्या कामाशी देखील संलग्न आहे.

**विदिशा अनिता भाबीपेक्षा किती वेगळी आहे?**

अनिता भाबी धाडसी, आत्मविश्वासू व स्पष्टवक्ती आहे, तर मी वास्तविक जीवनात ग्राऊंडेड व अंतर्मुखी आहे. अनिताची भूमिका साकारताना मला माझ्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्याच्या आव्हानाचा सामना करावा लागतो आणि मला ते आवडते. तिचा करिष्मा प्रत्यक्षात सादर करताना आणि तिच्या मोहकतेमध्ये अधिक भर करताना रोमांचक वाटते.

**अशा प्रख्यात भूमिकेमध्ये सामावून जाण्याचा दबाव वाटतो का?**

निश्चितच! माझ्यापूर्वी दोन इतर अभिनेत्रींनी अनिता भाबीची भूमिका सुरेखरित्या साकारली आहे. म्हणून अपेक्षा खूप मोठ्या होत्या. मी या लोकप्रिय भूमिकेमध्ये माझ्या स्वत:च्या गुणांची भर करण्याची संधी म्हणून या भूमिकेकडे पाहिले. चाहत्यांकडून मिळणारे प्रेम व पाठिंबा प्रेरणादायी आहे.

**कॉमेडी आव्हानात्मक शैली आहे. तुम्ही ती कशाप्रकारे अंगिकारली?**

कॉमेडीमध्ये निश्चितच आव्हाने असतात, पण मला माझ्या मर्यादांना दूर करायला आवडते. मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये काम करण्याचा निर्णय माझ्या करिअरला कलाटणी देणारा ठरला आहे. मला प्रत्येक लुकसह अनिता भाबीच्या भूमिकेत सामावून जाण्याची क्रिएटिव्ह प्रक्रिया देखील आवडते. प्रत्येक आऊटफिट तिच्या व्यक्तिमत्त्वामध्ये नवीन उत्साहाची भर करते, ज्यामुळे सर्वकाही उत्साहवर्धक वाटते.

**अनिता भाबी तिच्या ग्लॅमरस स्टाइलसाठी ओळखली जाते. तुम्ही तिच्या लुक्सप्रती किती योगदान देता?**

तुम्ही अचंबित व्हाल! मालिकेमध्ये तुम्हाला दिसणारा बहुतांश मेकअप व हेअरस्टाइल्स मी स्वत: करते. मी आऊटफिट्स व ॲक्सेसरीज निवडण्यामध्ये देखील सक्रियपणे सहभाग घेते. ही सर्जनशील प्रक्रिया आहे, जी मला खूप आवडते. यामुळे मला अनिताच्या धाडसी व मोहक व्यक्तिमत्त्वामध्ये माझ्या वैयक्तिक लुकची भर करता येते. चाहत्यांकडून मिळणारी कौतुकाची थाप सर्व प्रयत्न सार्थ ठरवतात.

**तुम्हाला 'गोरी मेम' म्हणून हाक मारल्यानंतर कसे वाटते?**

(हसतात) ते माझे दुसरे नाव असल्यासारखे वाटते! मी सेटवर असो किंवा नसो, लोक मला 'गोरी मेम' नावाने हाक मारतात आणि मला ते आवडते. माझ्या मैत्रिणी व कुटुंबातील काही सदस्यांनी देखील मला या नावाने हाक मारण्यास सुरूवात केली. यामधून या भूमिकेची लोकप्रियता दिसून येते आणि मला तिचा वारसा पुढे घेऊन जाण्याचा अभिमान वाटतो.

**अनिता भाबी फिटनेसबाबत जागरूक आहे. तुम्ही देखील वास्तविक जीवनात तसे आहात का?**

निश्चितच होय! मी आतून व बाहेरून फिटनेस उत्तम राखण्याला प्राधान्य देते. माझी चयापचय क्रिया उत्तम आहे, पण मी नेहमी आरोग्यदायी आहाराचे सेवन करते आणि हायड्रेटेड राहते. योगा माझ्या रूटिनचा महत्त्वपूर्ण भाग आहे. मी सकाळी लवकर उठून योगा करते. दीर्घकाळ, थकवणाऱ्या दिवसानंतर देखील मी रात्री जेवल्यावर चालण्यासाठी वेळ काढते. यामुळे मला जीवन संतुलित व उत्साहित राहण्यास मदत होते.

# कलाकारांनी मकर संक्रांतीनिमित्त त्यांच्या पहिल्यांदा पतंग उडवण्याच्या आठवणींना उजाळा दिला!


**मुंबई, १० जानेवारी :** संपूर्ण भारतात जल्लोषात साजरा केला जाणारा सण मकर संक्रांती पतंग उडवण्याच्या उत्साहपूर्ण परंपरेशिवाय अपूर्ण आहे. या सणानिमित्त, एण्ड टीव्ही कलाकार मकर संक्रांती सण साजरा करण्याच्या त्यांच्या अनोख्या व धमाल अनुभवांबाबत सांगत पहिल्यांदा पतंग उडवण्याच्या आठवणींना उजाळा देत आहेत. हे कलाकार आहेत आयुध भानुशाली (मालिका 'अटल'मधील यंग अटल), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अंगूरी भाबी). एण्ड टीव्हीवरील मालिका 'अटल'मध्ये यंग अटलची भूमिका साकारणारा आयुध भानुशाली म्हणाला, ''गुजरातमध्ये आम्ही मकर संक्रांती सण उत्तरायण म्हणून साजरा करतो, तसेच पतंग उडवण्याच्या परंपरेचा आनंद घेतो, जेथे कुटुंब व मित्र एकत्र येतात. पहिल्यांदा पतंग उडवण्याचा माझा अनुभव कॉमेडी शोसारखा होता. मी घराच्या छतावर आकर्षक पतंग व मांज्याच्या फिरकीसह उभा होतो, पण पतंग कसा उडवायचा याबाबत काहीच माहित नव्हते. प्रत्येक वेळी मी पतंग उडवण्याचा प्रयत्न करायचो तेव्हा पतंग शेजाऱ्यांच्या बाल्कनीमध्ये पडायचा किंवा झाडावर लटकून राहायचा. माझा संघर्ष पाहून पतंग उडवण्याची आवड असलेले माझे काका माझ्या मदतीस धावून आले. त्यांनी शांतपणे मला पतंग उडवण्याच्या मुलभूत गोष्टी स्पष्ट केल्या आणि पतंग स्थिर उडवत ठेवण्यासाठी मांजा कशाप्रकारे धरावा याचे प्रात्यक्षिक दाखवले. मी त्यावर इतके लक्ष केंद्रित केले की नकळतपणे मांजा सोडून दिला आणि माझा पतंग स्वत:हून उडून गेला. माझी चुलत भावंडे हसू लागली, माझा पतंग उडून जाण्यासाठी माझी मस्करी करू लागली. शेवटी, अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर मी आकाशात उंच पतंग उडवण्यास शिकलो. पतंगाला हवेत उडताना पाहण्याचा तो आनंदमय क्षण संस्मरणीय होता. आज, मी उत्तमप्रकारे पतंग उडवतो, पण झाडामध्ये अडकलेला पतंग पाहिल्यानंतर मला त्या विनोदी पहिल्या प्रयत्नाची आठवण येते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील गीतांजली मिश्रा ऊर्फ राजेश सिंग म्हणाल्या, ''मी पहिल्यांदा पतंग उडवण्याचा केलेला प्रयत्न कधीच विसरणार नाही. बालपणी, मी पतंग उडवण्याबाबत खूप उत्सुक होते, पण ते आव्हानात्मक असेल याबाबत काहीच कल्पना नव्हती. माझे पहिले काही प्रयत्न त्रासदायक होते. पतंग जमिनीवरून हवेत उडत देखील नव्हता. त्यावेळी माझ्या मैत्रिणींनी माझी मस्करी केली, जेथे माझा पतंग सतत झुडूपांमध्ये व झाडांमध्ये अडकत होता. अनेक यशस्वी प्रयत्नानंतर देखील मी हार मानली नाही. मी माझ्या मोठ्या चुलत भावंडांची मदत घेतली. त्यांनी शांतपणे मला मांजा



धरून पतंग उडवण्यास शिकवले. त्यानंतर मी पुन्हा एकदा नव्याने प्रयत्न केला. यावेळी, पतंग आकाशात उंच उडाला. पतंगाला आकाशात उडताना पाहून मला अभिमान वाटण्यासोबत खूप आनंद झाला. त्या क्षणाने सर्व प्रयत्नांचे फळ दिल्यासारखे वाटले. आजही, आकाशात पतंग उडताना पाहिल्यानंतर मला त्या अविश्वसनीय दिवसाची आठवण येते, ज्यामध्ये विनोद, निर्धार आणि पहिल्यांदाच काहीतरी यश संपादित करण्याचा आनंद सामावलेला होता. त्याक्षणी मी प्रयत्नामध्ये यशस्वी झाले आणि त्याचे श्रेय मी माझ्या चुलत भावंडांना देते (हसतात).'' मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अंगूरी भाबीची भूमिका साकारणाऱ्या शुभांगी अत्रे म्हणाल्या, ''इंदौरमध्ये पतंग उडवणे फक्त परंपरा नसून उत्साही सेलिब्रेशन आणि आकाशामध्ये मैत्रीपूर्ण पतंग कापण्याच्या स्पर्धेचा आनंद घेण्याचा क्षण देखील आहे. पतंग उडवण्याची माझी पहिली व धमाल आठवण बालपणीची आहे, जेथे मी घराच्या छतावर पतंग उडवत सर्वांचे लक्ष वेधून घेण्याचा निर्धार केला होता. माझा पतंग तयार होता आणि आत्मविश्वासाने मी हवेत पतंग उडवला. मी पतंग उडवण्यामध्ये माहीर झाल्याचे वाटत असतानाच मोठा वारा आला आणि माझा पतंग आमच्या छतावरील टीव्ही अँटेनामध्ये अडकला. पतंग काढण्याच्या उत्सुकतेने मी मांजा हातामध्ये धरत वर चढले, पण स्वत:च गुंतून गेले. माझ्या बहिणी माझ्यावर खदखदून हसत होत्या, ज्यामुळे त्या मला मदत करायच्या विसरून गेल्या. अनेक प्रयत्न व हास्यानंतर आम्ही पतंग काढला आणि अचंबित करणारी बाब म्हणजे पतंग उडण्यासाठी चांगल्या स्थितीत होता. आजही, मी पतंग उडवते तेव्हा हास्य, गोंधळ व यशाने भरलेला तो क्षण आठवतो. मकर संक्रांती निश्चित उत्साह, स्पर्धा आणि प्रियजनांसोबत संस्मरणीय क्षणांचा आनंद घेण्याचा सण आहे.''

# शब्दकोडे क्रमांक २०१२



**आडवे शब्द :-**


१) आश्चर्य
३) सैनिकांची एक स्फुर्तीदायक घोषणा
९) पार, ओटा
१०) गाणे गाणारा
११) मोठी जाड तलवार
१२) सुंदर युवती
१४) साय
१५) सुंदर, शहाणा
१७) गावाखालची जमीन
१९) नक्षीदार ताट
२१) शिसे आणि कथील यांचा मिश्र धातू
२२) मारझोड
२४) अनुमान, तर्क
२५) फळांचा राजा
२६) शोभिवंत, फक्कड
२७) घाण
२९) खोडण्याचे साधन
३०) बिया, रोपे इ
३२) पाणी, आयुष्य
३४) उपदेश
३६) वर-वधू मधील लग्नातील पडदा
३८) रेलचेल समृद्धी
३९) हरलेला
४१) गणितातील मध्यम प्रमाण
४३) लिखित निवेदन
४४) चेहऱ्यावरील तेज
४६) घ्राणेंद्रिय
४७) फळातील खाद्यभाग
४८) हुप्प्या
५०) गाडीचे छत
५२) देशोदेशीचे नाणे
५४) नसत्या उठाठेवी करणारी
५६) धोबी
५७) श्रम, मेहनत
५८) बक
६०) पशुतुल्य आचरण करणारा मनुष्य, नराधम
६२) गव्हाचे बारीक पीठ
६३) हत्ती, वारण
६५) विंचवाचा डसण्याचा अवयव
६६) पटाईत
६८) मुसलमानांचा एक सण
७०) मेहनत, श्रम
७१) लाज
७२) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
७४) समईतील कापसाची वळी
७५) पाण्याचा उकळताना होणारा आवाज
७६) ठकबाजी, फसविणे

**उभे शब्द :-**

१) परवानगी, मान्यता
२) बागांची लागवड करणारा मालक
३) उगाच
४) तात्काळ समर्पक उत्तर देणारा
५) दारूचा एक प्रकार
६) अस्वल, माकड यांना संभाळणारा
७) अस्थि, हाडूक,
८) उर्ध्व दिशा
९) गव्हाचे पीठ
१३) मृत्यू
१६) सरस्वती
१८) चावट, ताळतंत्र नसलेला
२०) गोंधळ व अव्यवस्थेची स्थिती
२२) मान देणे, मान्य करणे
२३) जयपराजय
२६) सावली
२७) थोडक्यात महानगरपालिका
२८) अफूचे बी
३१) बेलाचे पान
३३) वर देणारा, गणपती
३५) जननी
३६) फरक, तफावत
३७) कडक
३८) विसराळू मनुष्य
४०) बळकट, कणखर
४२) संताप
४३) मोकळीक, अनुमती
४५) मागणारा
४६) बेकरी मधील गोड बिस्किट प्रकार
४८) वक्र
४९) आकाश
५१) श्रीविष्णूचा सहावा अवतार
५३) धान्य कोठार
५५) पाणी
५९) हत्ती
६१) उथळ आकार
६४) साथ, मैत्री
६५) हल, शेतीतील एक अवजार
६७) माग, शोध
६९) प्रत्येक
७०) औषध
७१) बाण
७३) श्रीरामाचा एक पुत्र

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



## शेतकऱ्यांची कामे त्वरित मार्गी लावावी-आमदार कायंदे:मंडळ अधिकारी, तलाठ्यांना सिंदखेडराजात लॅपटॉप वितरण



**सिंदखेडराजा:** डिजिटल इंडिया खऱ्या अर्थाने तळागळापर्यंत पोहोचवण्यासाठी शासन पावले उचलत आहे. त्यामुळे ई गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांची कामे त्वरित मार्गी लावावीत, असे आवाहन आमदार आमदार मनोज कायंदे यांनी मंडळ अधिकारी व तलाठ्यांना केले.

महाराष्ट्र शासनाचे वतीने ई गव्हर्नन्स गतिमान प्रशासन कार्यक्रमांतर्गत आज, दि. ९ जानेवारी रोजी तहसील कार्यालयात तालुक्यातील ७ मंडळ अधिकारी व ३९ तलाठ्यांना एकूण ४६ लॅपटॉप, प्रिंटर व लॅपटॉप बॅगचे वितरण करण्यात आले. यावेळी आमदार कायंदे बोलत होते. आमदार कायंदे, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसीलदार दिवटे, अॅड. नाझेर काझी, माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे यांच्या हस्ते यावेळी या साहित्याचे वितरण करण्यात आले. आमदार कायंदे यांनी यावेळी देऊळगावराजा व सिंदखेडराजा येथील रिक्त पदे भरण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. प्रत्येक मंडळात तलाठी भवन बांधण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तहसीलदार दिवटे यांनी १५ दिवसांत गतिमान प्रशासनाची कामे करावीत, असे आवाहन यावेळी केले. ऑनलाईन प्रणाली गतिमान पद्धतीने आता संजय गाधी, श्रावण बाळ या योजनेचे काम सुरू आहे. याचे पैसे लाभार्थ्यांच्या खात्यात ऑनलाईन पद्धतीने पडणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विष्णू मेहेत्रे, वैभव मिनासे, सिद्धेश्वर जाधव, नायब तहसीलदार डॉ. प्रवीण वराडे, नितीन बढे उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या बँक खात्याला लावलेले होल्ड काढा:राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची मागणी ; आंदोलनाचा इशारा



**देऊळगावराजा:** राष्ट्रीयकृत बँकांनी पीक कर्ज वसुलीच्या नावाखाली शेतकऱ्यांचे बचत खाते होल्ड केले आहेत. तसेच त्यांना जामीन देणाऱ्या जमीनदारांच्या खात्यालाही होल्ड लावला आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचण येत असल्याने बचत खात्याला लावलेले होल्ड तत्काळ काढावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने केली आहे.

या संदर्भात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आज, दि. ९ जानेवारी रोजी तहसीलदारांना निवेदन दिले. त्यामध्ये नमूद आहे की, शहरातील राष्ट्रीयकृत बँकांनी पीक कर्ज वसुलीच्या नावाखाली शेकडो शेतकऱ्यांच्या बचत खात्यांना होल्ड लावले आहेत. बचत खात्याला होल्ड असल्याने निराधार योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, तसेच शेतमाल विक्री करून शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले पैसे काढता येत नाही. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. तालुक्यात अनेक शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले आहे. मात्र, बचत खात्याला होल्ड लावून कर्ज वसुलीची सक्ती करणे अन्यायकारक आहे. अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबात मुलींच्या लग्नाची लगबग सुरू आहे. अशा परिस्थितीत बँकांनी शेतकऱ्यांच्या अडचणीच्या वेळी बचत खाते होल्ड केले आहेत. सध्याचा ९० टक्के व्यवहार ऑनलाईन होतो. खात्यात शेतमालाचे पैसे जमा होतात. मात्र, ते पैसे शेतकऱ्यांना काढता येत नाही. शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड लावण्याचा अधिकार नसताना बँकेतील कर्मचारी व अधिकारी दडपशाही करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे होल्ड तत्काळ काढावेत, अन्यथा शेतकऱ्यांसोबत तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या देण्यात आला निवेदनाद्वारे दिला आहे.

राजेश इंगळे, राजीव शिरसाठ, रवी इंगळे, विजय खांडेभराड, रंगनाथ कोल्हे, नारायण कोल्हे, सुरज खांडेभराड, संतोष राजे जाधव, रफिक्क पठाण, शिवाजी कव्हळे, अभिनव खांडेभराड, आदित्य वाघमारे, ऋषिकेश वैष्णव, शुभम थोरवे यांनी हे निवेदन दिले.

## फंगल इन्फेक्शनचा संशय, पाण्याचे नमुने पाठवले तपासणीसाठी

**शेगाव :** बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील काही गावांमध्ये गेल्या आठवडाभरा पासून सुरू असलेल्या अचानक केस गळतीच्या प्रकाराने नागरिक भयभीत झाले आहेत. दरम्यान, बुधवारी आरोग्य विभागाच्या पथकाने या सहा गावांत जाऊन पाहणी केली असता फंगल इन्फेक्शनमुळे केस गळत असल्याचे सांगितले. तर ७ जणांच्या त्वचेच्या बायोप्सीचे नमुने अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले आहेत. दूषित पाण्यामुळे केस गळती होत असल्याचे लोकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पाण्याचे जैविक नमुनेही तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. आतापर्यंत शेगाव तालुक्यात ५१ रुग्ण आढळल्याचे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले.

बुधवारी शेगाव तालुक्यात डॉक्टरांचे विशेष पथक दाखल झाले. या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्र भोनगावअंतर्गत बोंडगाव येथे १६, कालवड १३, कठोरा ७, भोनगाव ३ तर प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा बुद्रुक अंतर्गत हिंगणा वैजनाथ येथे ६, घुई ७ असे एकूण ५१ रुग्ण आढळून आले. बुधवारी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या पथकाने या गावांमध्ये जाऊन दिवसभर सर्वेक्षण केले. मोठ्या प्रमाणात रुग्ण निघत असल्याने भीतीचे वातावरण आहे. आरोग्य पथकाने गावांमधील पाणी नमुने जैविक रासायनिक तपासणीसाठी पाठवले आहेत. तर यामधील ७ जणांना स्किन बायोप्सी टेस्टिंगसाठी अकोला येथील शासकीय महाविद्यालय येथे पाठवण्यात आले आहे. हा चर्मरोगाचा प्रकार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी सांगितले. नागरिकांनी स्वच्छता बाळगण्याचे आवाहन या वेळी करण्यात आले. मात्र शेगाव तालुक्यातील याच गावांमध्ये केस गळती कशी उद्भवली याचे उत्तर सर्व अहवाल आल्यानंतर कळेल, असे डॉक्टरांनी सांगितले.

**व्हायरल इन्फेक्शन, कोरोनाचाही परिणाम**

डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुन्या आदी व्हायरल इन्फेक्शन झालेले आजार होऊन गेले असतील तर त्याचा हा परिणाम होण्याची शक्यता अधिक असते. कोरोना झाल्यानंतरही काहींचे टक्कल पडले होते. हिवाळ्यातही केसात कोंडा झाल्यास अथवा व इतर कारणांमुळे केस जातात. अजून त्याबाबत निदान होऊ शकले नाही. तेल, निकेल, नायट्रेट असे हेवी मॅटर असले की केस जातात, अशा वेळी नखांचेही सॅम्पल पाठवावे लागेल.

# कोळसाखाणीत आढळला वाघाचा कुजलेला मृतदेह



**महासागर प्रतिनिधी,**

**वणी, दि. ९ :** मागील काही दिवसांपूर्वी मृत्यु झालेल्या एका पट्टेदार वाघाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत वेकोलिच्या उकनी कोळसा खाणीच्या परिसरात एका विद्युत डीपीच्या शेजारी पडुन असलेला आढळून आला. मंगळवारी ७ जानेवारी रोजी सकाळी ही घटनास उघडकीस आली. यानंतर आता या वाघाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा तपास वन विभागाने सुरू केला आहे. वीज तासांचा स्पर्श झाल्याने या वाघाचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणी सविस्तर असे की, वेकोली येथील काळसा खाण परिसरात काम करणारे सकाळ पाळीतील कर्मचारी कर्तव्यावर आले होते. त्यांना उकनी कोळसा खाणीतील आरसी कार्यालयाजवळ एक पट्टेदार वाघ मृतावस्थेत आढळून आला. यामुळे कोळसा खाणीतील कर्मचाऱ्यांचीही चांगलीच भंबेरी उडाली. त्यांनी ही माहिती लगेच वरिष्ठांना दिली. त्यानंतर ही वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी उसळली. ही माहिती वन विभागाला मिळताच पांढरकवडा वन विभागाचे उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, सहायक वनसंरक्षक व्ही.व्ही. खाडे, वणी वन परिक्षेत्राचे सहायक वनसंरक्षक ए. यु. देशमुख, मारेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी श.ग. हटकर, मानद वन्यजीव रक्षक डॉ. रमजान विराणी, क्षेत्र संरक्षक एस.आर. राजूरकर, वनरक्षक एस, ए. वाघ, वनरक्षक एस. डी. कतुरे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता त्यांना कुजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळून आला. त्यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. जिवंत विद्युत तारांचा स्पर्श झाल्याने १२ते१३ दिवसांपूर्वी या वाघाचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वन विभागाने वर्तवला आहे. वाघाचा वावरच्या चर्चेने नागरिकांमध्ये दहशत कोळसाखाणब परिसरात वाघाचा वावर असल्याची चर्चा मागील अनेक दिवसांपासून सुरु होती. कोळसाखाण परिसर हा झाडाझुडपांनी वेढलेला असून या ठिकाणी वन्य जीवांचे वास्तव्य असल्याचे अनेकदा समोर आले आहे. अशातच पट्टेदार वाघ मृतावस्थेत आढळल्याने कोळसा खाण असलेल्या परिसरात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांच्या काळजात धडकी भरली आहे.

## अंतराळातील आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र डोळ्यांनी पाहता येणारः.शुक्र, शनी, गुरुजवळः

**महासागर प्रतिनिधी,**

**अकोला, दि.९ :** आकाशात विविध ग्रह तारकासोबतच मानव निर्मित आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र फिरत्या चांदणीच्या स्वरूपात नुसत्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. आज, १० जानेवारीला सायंकाळी महाराष्ट्रासोबतच मध्य भारतातील विविध भागातून हे केंद्र जात असल्याने त्याचे अधिक प्रकाशमान स्वरूपातील दर्शन निरभ्र आकाशात नुसत्या डोळ्यांनी होईल. यावेळी शुक्र, शनी, गुरू जवळ चंद्र आणि मंगळ ग्रह सहज पाहता येईल. या अनोख्या खगोलीय घटनांचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी केले आहे. अवघ्या दीड तासात पृथ्वीची एक प्रदक्षिणा पूर्ण करणारे हे महाकाय आकाराचे आंतरराष्ट्रीय अवकाश केंद्र मुंबई ते नागपूर एवढे अंतर केवळ दीड मिनिटांत पूर्ण करते. बहुपरिचित भारतीय वंशाच्या सुनीता विल्यम्स यामध्ये वास्तव्यास असून केवळ सात दिवसांच्या संशोधनासाठी त्या गेल्या. मात्र, 'स्टार लायनर' या परतीच्या यानात हेलियम वायू गळतीमुळे गेल्या सात महिन्यांपासून त्याच पृथ्वीवर येण्याच्या प्रतिक्षेत आहेत, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले. यावेळी आंतरराष्ट्रीय अंतराळ अभ्यास व संशोधन केंद्र हे भारताच्या मध्य भागातून जात असल्याने त्याच्या दर्शनाचा लाभ अधिक संख्येने घेता येईल. हे केंद्र पृथ्वीच्या ज्या भागातून जाते.

## डिजिटल सेवेसाठी ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित

**महासागर प्रतिनिधी,**

**यवतमाळ , दि. ९ :** दरवर्षी निवृत्तीधारकांना हयातीचा दाखला बँकेत जमा करावा लागतो. या महिन्यांत तासन तास ज्येष्ठांना रांगेत उभे लागते. आता निवृत्तीधारकांसाठी केंद्र व राज्य सरकारने डिजिटल हयातीचा दाखला ही सेवा सुरू केली आहे. घरबसल्या हा दाखला काढता येणार आहे. विशेष म्हणजे, ज्या नागरिकांना मोबाइल हाताळता येत नाही अथवा ज्यांच्याकडे ऑनलाइन सिस्टिम नाही अशा ज्येष्ठांसाठी पोस्टमन थेट घरी येऊन हयातीचा डिजिटल दाखला तयार करून देणार आहे. पूर्वी निवृत्तीधारकांना स्वतः बँकेत जाऊन जीवन प्रमाणपत्र सादर करावे लागायचे. ही वेळखाऊ आणि कष्टदायी प्रक्रिया टाळण्यासाठी आता



सरकारने अशी व्यवस्था केली आहे की, निवृत्तीधारकांना घरबसल्या डिजिटल पद्धतीने जीवन प्रमाणपत्र बनवून सादर करता येईल. यासाठी मोबाइलमध्ये फेस आरडी आणि जीवन प्रमाण हे अॅप डाऊनलोड करणे आवश्यक आहे. सध्या इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक (आयपीपीबी) डिजिटल लाइफ सर्टिफिकेट देत आहे. बँकेने नॅशनल इफॉर्मेटिक्स सेंटर अर्थात एनआयसीशी हात मिळवणी केली आहे.

अनेकदा निवृत्तीधारकांचा प्रश्न असतो की, डीएलसी केल्यानंतर हे प्रमाणपत्र बँक, पोस्ट ऑफिसात देण्याची गरज आहे का? तर निवृत्तीधारकाला डीएलसी हे प्रमाणपत्र बँक, पोस्ट ऑफिस, पीडीए सादर करण्याची आता आवश्यकता भासणार नाही.

पोस्टमनशी संपर्क साधून द्यावी लागेल मूलभूत माहिती निवृत्तीधारकांनी जवळच्या पोस्ट ऑफिसमध्ये जावे. जर वृद्ध निवृत्तीधारकांना पोस्ट ऑफिस मध्ये जाता येत नसेल, तर त्यांना पोस्टमन किंवा ग्रामीण सेवा डाक सेवेमार्फत घरपोच सेवेचा लाभ घेता येतो. या वेळी टपाल सेवकाला आपल्या पेन्शन खात्या संदर्भात मूलभूत माहिती द्यावी. यामुळे तुमचा डिजिटल जीवन प्रमाण तयार होण्यास मदत होईल, यासाठी ७० रुपये सेवाशुल्क आकारले जाईल. ज्यांना आपल्या परिसरात कोण पोस्टमन येते, हे माहीत नाही त्यांना संपर्क साधून पोस्टमनची माहिती मिळवावी लागणार आहे.

## प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्र्याना दिला हा प्रस्ताव, फडणवीस म्हणाले नक्कीच विचार करू

**महासागर प्रतिनिधी,**

**बुलढाणा, दि. ९:** केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रताप राव जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या समक्ष महत्वाचा प्रस्ताव ठेवला आहे.महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र आयुष मंत्रालय आणि विदयापीठ निर्माण करावे तसेच इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील शासकीय कर्मच्याऱ्यांना आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना लोपॅथी सोबतच आयुर्वेदिक उपचारही मोफत मिळावा असा प्रस्ताव केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडला आहे. केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव हे बुधवारी,आठ जानेवारीला मुंबई दौऱ्यावर होते. या दरम्यान त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देंवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीमध्ये दोन्ही नेत्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आयुष मंत्रालयाची स्थापना करुन देशात आयुर्वेद उपचार पध्दतीला नविन दालन उपलब्ध करुन दिले आहे. देशातील नागरिकांचे आरोग्य निरोगी राहण्याच्या दृष्टीकोनातुन हर घर आयुर्वेद उपक्रमाअंतर्गत केंद्र सरकारच्या वतीने विविध उपक्रम आणि उपचार पध्दती संदर्भाची माहीती नागरीकांपर्यंत पोहचविण्याचे काम करण्यात येत आहे. आयुर्वेदीक उपचार



पध्दतीला देशातील नागरीकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे नामदार जाधव यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र राज्यामध्ये आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्यासाठी नविन स्वतंत्र मंत्रालयाची आणि आयुष विद्यापीठाची निर्मीती करण्यात यावी या संदर्भाचा प्रस्ताव त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडला.

आयुष मंत्रालयाच्या माध्यमातुन सार्वजनिक आरोग्य, संशोधन, तंत्रज्ञान, शिक्षण, जागतिकीकरण आणि गुणवत्ता वाढीसाठी भरीव काम करण्यात येत आहे. देशाअंतर्गत आयुर्वेद उपचार पध्दतीचा स्विकार नागरीक करु लागले आहे. महाराष्टातील लोकही प्राचीन आयुर्वेद उपचार पध्दतीचा अवलंब करत असल्याने आयुर्वेदाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातुन स्वतंत्र आयुष मंत्रालय किंवा आयुष विभाग स्थापन करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्याऱ्यांना राज्यस्थान दिल्ली व अन्य राज्यामध्ये मधुमेह, मूळव्याध, त्वचारोग, व इतर आजारांवर लोपॅथीसोबतच आयुर्वेद उपचार मोफत मिळतो. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मच्याऱ्यांना मोफ्फत आयुर्वेद उपचार मिळावा असा प्रस्तावही राज्याचे फडणवीस यांच्याकडे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी मांडला. या प्रस्तावा संदर्भात मुख्यमंत्री आणि केंद्रीय आयुषमंत्री यांच्या विचारविनिमय होवुन लवकरच योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांना दिले. यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील जळगांव मतदारसंघांचे आमदार संजय कुटे देखील उपस्थित होते.

## कापूस उत्पादकांची परवड 'सीसीआय'नेही घटवले दर

**महासागर प्रतिनिधी,**

**अमरावती, दि. ९:** राज्यात भारतीय कापूस महामंडळामार्फत (सीसीआय) हमीदराने कापूस खरेदी सुरू असली, तरी ओलाव्याच्या प्रमाणानुसार दर मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी कायम आहेत. कापसाचा हंगाम सुरू होऊन आता तीन महिने पूर्ण झालेले असताना बाजारात कापसाचे भाव शेतकऱ्यांना अपेक्षित असे नाहीत. दुसरीकडे 'सीसीआय'ने दरात कपात केल्याने त्याचा परिणाम बाजारावर जाणवणार आहे. कापसाचे या वर्षासाठी हमीभाव मध्यम धाग्यासाठी ७ हजार १२१ रुपये तर लांब धाग्यासाठी ७ हजार ५२१ रुपये प्रति क्विंटल आहेत. मंगळवारी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ९५ क्विंटल कापसाची आवक झाली. कापसाला किमान ७ हजार २५० तर कमाल ७ हजार ५५० रुपये म्हणजे सरासरी ७ हजार ४०० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला.

कापसात ओलाव्याचे प्रमाण कमी झाले असले तरी रूईचा उतारा कमी मिळत असल्याच्या कारणाखाली 'सीसीआय'ने कापसाचे हमीदर शंभर रूपयांनी घटविले आहेत. 'सीसीआय'च्या केंद्रांवर सध्या लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार ४२१ रूपये दर मिळत आहे. कापूस पणन महासंघ मोडीत निघाल्यानंतर आता सीसीआय मार्फत कापसाची खरेदी करण्यात येत आहे. हमीदराने



कापसाची खरेदी होत असल्याने शेतकऱ्यानी प्रांरभी खासगी बाजाराऐवजी 'सीसीआय'ला प्राधान्य दिले. पहील्या वेचातील कापसाला 'सीसीआय'ने हमीदर दिले.

आता मात्र हे दर शंभर रूपयांनी कमी करण्यात आले आहेत. सध्या दुसऱ्या वेचातील (झडतीचा) कापूस बाजारात येत आहे. या कापसातील रूईचे प्रमाण पहील्या वेचातील प्रमाणापेक्षा कमी असल्याचे कारण देण्यात आले आहे.

एक क्विंटल कापसातून सरासरी ३८ किलो रूई मिळत असल्याने व रूईचे दर बाजारात अधिक असल्याने 'सीसीआय'ने पहील्या वेचातील लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार ५१२ रूपये तर, मध्यम धाग्याच्या कापसाला ७ हजार १२१ रूपये हा हमीदर दिला.

दुसऱ्या वेचातील एक क्विंटल कापसातून ३४ते ३५ किलो रूई निघत असल्याने प्रत कमी करत हमीदर शंभर रूपयांनी कमी केले आहेत. त्यामुळे 'सीसीआय'च्या केंद्रावर सध्या शेतकऱ्यांना प्रतीक्विंटल ७ हजार ४२१ रूपये दर मिळू लागला आहे. 'सीसीआय'ने दर कमी करताच शेतकऱ्यांचा मोर्चा खासगी बाजाराकडे वळू लागला आहे. खासगी बाजारात सध्या हमीदराने खरेदी होऊ लागली आहे. पण, आवक वाढल्यास दर कमी होण्याची शक्यता आहे.

**Change Of Name**

I **MOHAN BHANUSHALI** WITH PASSPORT NO **M8592692** HEREBY AND DECLARE THAT IN MY PASSPORT MY WIFE OLD NAME WAS **DAKSHA MANGE** AND WE HAVE CHANGED IT TO NEW NAME AS **DAKSHA BHANUSHALI**
**ADDRESS**:- PLOT NO . 371, NEAR JAIN MANDIR, TULSI NAGAR, SHANTI NAGAR, NAGPUR 440002

कार्यालय
**नगर पंचायत कांद्री (कन्हान)**
तहसील-पारशिवनी, जिल्हा-नागपूर ४४१४०१
Email: nagrpanchayatkandri@gmail.com

क्रमांक/कलि-न.प./कांद्री (कन्हान)/आरोग्य. वि.-७१/२०२५ दि.: १०/०१/२०२५

**जाहीर दरपत्रके सुचना**

विषय : नगर पंचायत कांद्री (कन्हान) क्षेत्राकरिता विकासाच्या दृष्टीने सेल्फ क्लिनजिंग इलेक्ट्रॉनिक टॉईलेट (मोबाईल टॉयलेट) खरेदी करिता दरपत्रके मागविणेबाबत

१) दरपत्रके सादर करावयाचा दिनांक १३/०१/२०२५ ते १७/०१/२०२५
२) दर पत्रके सादर करावयाचे स्थळ नगर पंचायत कांद्री (कन्हान) कार्यालय
३) कामाचा अनुभव :- दरपत्रके धारकास सदर कामाचा अनुभव असणे आवश्यक असुन त्याचे दस्ताऐवज दरपत्रकासोबत सादर करावे,

टिप :-
१) साहीत्याचे Specification नगर पंचायत कांद्री कार्यालयातुन प्राप्त करूण घेण्यात यावे तसेच साहीत्याच्या Specification नुसारच दरपत्रके देणे बंधनकारक आहे.
२) सदर दरपत्रके हे केवळ अंदाजपत्रके तयार करण्याकरीता वस्तुचे बाजारमुल्य मागविण्याकरीता बोलविण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

-स्वा-
मुख्याधिकारी
नगर पंचायत कांद्री (कन्हान)

कार्यालय
**नगर पंचायत कांद्री (कन्हान)**
तहसील-पारशिवनी, जिल्हा-नागपूर ४४१४०१
Email: nagrpanchayatkandri@gmail.com

क्रमांक/कलि-न.प./कांद्री (कन्हान)/आरोग्य. वि.-७१/२०२५ दि.: १०/०१/२०२५

**जाहीर दरपत्रके सुचना**

विषय : नगर पंचायत कांद्री (कन्हान) क्षेत्राकरिता विकासाच्या दृष्टीने सेल्फ क्लिनजिंग इलेक्ट्रॉनिक टॉईलेट (मोबाईल टॉयलेट) खरेदी करिता दरपत्रके मागविणेबाबत

१) दरपत्रके सादर करावयाचा दिनांक १३/०१/२०२५ ते १७/०१/२०२५
२) दर पत्रके सादर करावयाचे स्थळ नगर पंचायत कांद्री (कन्हान) कार्यालय
३) कामाचा अनुभव :- दरपत्रके धारकास सदर कामाचा अनुभव असणे आवश्यक असुन त्याचे दस्ताऐवज दरपत्रकासोबत सादर करावे,

टिप :-
१) साहीत्याचे Specification नगर पंचायत कांद्री कार्यालयातुन प्राप्त करूण घेण्यात यावे तसेच साहीत्याच्या Specification नुसारच दरपत्रके देणे बंधनकारक आहे.
२) सदर दरपत्रके हे केवळ अंदाजपत्रके तयार करण्याकरीता वस्तुचे बाजारमुल्य मागविण्याकरीता बोलविण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

-स्वा-
मुख्याधिकारी
नगर पंचायत कांद्री (कन्हान)

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# बालांगण

## बनवा घरट्याची प्रतिकृती

फन टाईम

छोट्या दोस्तांनो, नव्या वर्षात काही तरी वेगळं करायचंय का? मग नेचर वॉकला चला. अभयारण्यात जाऊन पक्षी बघा. जवळच्या डोंगरावरही जाता येईल. सकाळी लवकर उठलात तर घराच्या बाहेरही विविध पक्षी दिसू शकतील. मित्रांनो, पक्षी घरटी तयार करतात. एवढी छान, सुबक आणि मजबूत घरटी त्यांना कशी बरं बांधता येत असतील, असा प्रश्न पडलाय का कधी? पडला असेल तर पक्ष्यांच्या घरट्याची कलाकृती तयार करून याचं उत्तर जाणून घेऊ शकता. यासाठी काही वस्तू जमवाव्या लागतील. पक्षी जमवतात अगदी तश्शाच! मग बनवायचं ना घरटं?



साहित्य : पानं, पालापाचोळा, कळ्या, फुलांचे देठ, काटक्या, काड्या, पिसं, गवत आणि भुसा. एखाद्या अभयारण्यात जाणार असाल तर सोबत पिशवी घेऊन जा. या वस्तू जमवा. गम, कागदी पिशवी, ब्राऊन पेपर, कापडी पोत्यासारखं कापड, रंगीत कागदी प्लेट, गुगली आईज, पक्ष्यांचे आकार कापण्यासाठी कागद, कात्री इत्यादी.

कृती : सर्वात आधी घरट्यासाठी लागणाऱ्या वस्तू तुम्हाला जमवायच्या आहेत. तुमच्याकडील कागदाचे पक्ष्यांचे आकार कापा किंवा पक्ष्याच्या चित्राची प्रिंटही काढता येईल. आकार कापून घ्या. आता तुम्हाला पक्ष्यांचं घरटं तयार करायचं आहे. यासाठी पोत्याचं जाड कापड घ्या. हे कापड अर्धगोल आकारात कापा. आता हा तुकडा पेपर प्लेटच्या खालच्या भागात चिकटवा. आता त्यावर पक्षी चिकटवा. नंतर पोत्याच्या तुकड्यावर इतर वस्तू चिकटवता येतील. काटक्या, काड्या, कापूस, पिसं, वाळलेली पानं, फुलं, देठ या सगळ्या वस्तू चिकटवा. पेपर प्लेट अजून सजवायची असेल तर अशाच काड्या, पानं, फुलं चिकटवता येतील. पांढऱ्या कागदाचे अंड्याचे आकार कापा. पक्ष्याच्या खाली ते चिकटवता येतील. आता तुमची कल्पकता वापरा आणि इतर सजावट करा. गम पूर्णपणे वाळू द्या. ही कलाकृती घरात ठेवता येईल किंवा कुणाला गंमत म्हणून भेटही देता येईल.


## लिथुआनियाविषयी...

सफर देशांची

युरोप खंडातल्या बऱ्याच छोट्या देशांपैकी एक म्हणजे लिथुआनिया. उत्तर युरोपातला हा देश बाल्टिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर वसला आहे. या देशाची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. 'लिथुआनियन' ही इथली प्रमुख भाषा. देशातले ८२ टक्के लोक ही भाषा बोलतात. 'व्हिल्नियस' या देशाची राजधानी आणि सर्वात मोठं शहर. १७९५ मध्ये लिथुआनिया रशियन साम्राज्याचा भाग झाला. १६ फेब्रुवारी १९१८ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. पण लिथुआनियावर आक्रमणं सुरूच राहिली. १६ जून १९४० या दिवशी 'सोव्हिएत युनियन'ने या देशाचा ताबा घेतला. १९४१ ते १९४४ या काळात लिथुआनियावर नाझी जर्मनीचं राज्य होतं. १९४४ पासून १९९० पर्यंत हा देश पुन्हा 'सोव्हिएत युनियन'च्या ताब्यात होता. ११ मार्च १९९० या दिवशी लिथुआनियाला स्वातंत्र्य मिळालं. हा देश नाटो आणि युरोपियन युनियनचा सदस्य आहे. या देशाला ९९ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. 'नेमुनास' ही या देशातली सर्वात मोठी नदी. लिथुआनियाचा बराचसा भाग सपाट आहे. देशात ३३ टक्के वनसंपदा आहे. या देशात बरेच तलावही आहेत. भरपूर जंगल असल्यामुळे इथे लाकूड उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. या देशात पाच राष्ट्रीय तर ४०२ निसर्ग उद्यानं आहेत. देशात वन्य प्राणीही मोठ्या प्रमाणावर आहेत. निसर्गसौंदर्याने नटलेल्या या देशात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. युरोपातल्या इतर देशांप्रमाणे युरो हे इथलं प्रमुख चलन असलं तरी 'लिथुआनियन लिटास' या चलनाचा वापरही केला जातो.




## ठिपके जुळवा



## सोनं का गंजत नाही?

जाणून घ्या

लोखंडाच्या वस्तू पटकन गंजतात. पण सोन्याच्या दागिन्यांवर गंज चढत नाही. कितीही वापरले तरी सोन्याचे दागिने खराब होत नाहीत. लोखंड आणि सोनं हे दोन्ही धातू असले तरी लोखंडाप्रमाणे त्यावर गंज का चढत नाही, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. चला तर मग याचं कारण जाणून घेऊ या.

सोनं हा एक निष्क्रिय धातू आहे. त्यामुळे त्याचा वातावरणातल्या कोणत्याही घटकाशी किंवा वायुशी संपर्क आला तर कोणतीही रासायनिक प्रक्रिया घडत नाही. लोखंडावर गंज चढण्यासाठी या धातूची वातावरणातल्या ऑक्सिजनशी प्रक्रिया व्हावी लागते. या प्रक्रियेनंतर आयर्न ऑक्साइडची निर्मिती झाल्याने लोखंड गंजतं. सोनं म्हणजे सुवर्ण निसर्गात शुद्ध स्वरूपात असतं. तसंच हा मऊ धातू आहे. मात्र दागिने घडवताना सोन्यात थोड्या प्रमाणात तांबं किंवा पितळ मिसळलं जातं. यामुळे या धातूला काठिण्य येतं आणि दागिने तयार करणं सोपं होतं.



काही काळानंतर सोन्याच्या दागिन्यांची चमक कमी झाल्याचं आपल्याला जाणवतं. सोन्याची कोणत्याही वायुसोबत रासायनिक प्रकिया होत नसली तरी यात मिसळलेल्या इतर धातूंचा ऑक्सिजनशी संपर्क होऊन ऑक्साइडची निर्मिती होते. यामुळे सोन्याचे दागिने फिके दिसतात. मात्र या ऑक्साइड्सचा रंग लाल किंवा भुरकट नसतो. त्यामुळे दागिने लालसर दिसत नाहीत. सोन्यात कधीही लोखंड मिसळलं जात नाही.

## देखणे ब्लू सी ड्रॅगन

दोस्त हे मस्त

दोस्तांनो, प्राणी–पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे शोध सतत लागत असतात. काही तरी नवं सापडत राहतं आणि अशा जिवांविषयी कुतुहल वाढत राहतं. ऑस्ट्रेलियातील समुद्र किनाऱ्यावर 'ब्लू सी ड्रॅगन' नावाचा एक जलचर सापडलाय. या जलचराचे फोटो सोशल मिडियावर वायरल होत आहेत. हा जलचर क्वींसलँड येथील समुद्र किनाऱ्यावर सापडलाय. त्यामुळे संशोधकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. 'ब्लू सी ड्रॅगन' हा सागरी जीव असून तो उडू शकतो. त्यामुळेच त्याच्या अस्तित्त्वाबाबत कुतुहल निर्माण झालंय. 'ग्लॉसियस अटलांटियस' या जलचरांच्या प्रजातीतील अत्यंत दुर्मिळ असा हा जीव आहे. हा प्राणी माणसांच्या फारशा नजरेत आला नसला तरी त्याचं सौंदर्य डोळ्यात भरणारं असतं. जेलीफिशप्रमाणे हा प्राणीही फार सुंदर आहे. असं असलं तरी याची गणना विषारी प्राण्यांमध्ये केली जाते. हा प्राणी चावला तर त्याच्या विषामुळे माणसाला त्रास होतो. हा जलचर आपल्या कल्ल्यांच्या मदतीने समुद्राच्या पृष्ठभागावर थोड्या उंचीवर उडू शकतो. या प्राण्याचा आकार फारच छोटा आहे. त्यातच याच्या निळ्याशार रंगामुळे तो पटकन दृष्टीस पडत नाही. या प्राण्याच्या शरीरावर चंदेरी रेषा असतात. या रेषाही समुद्राच्या पाण्याच्या रंगाशी मिळत्याजुळत्या असल्याने त्याच्या अस्तित्वाचा थांग लागत नाही. म्हणूनच शत्रूंपासून याचा अगदी सहज बचाव होतो. निळ्या सागरी ड्रॅगनचा आकार ४० मिलीमीटरपर्यंत वाढू शकतो. या प्राण्याचा आकार फारच वेगळा असल्याने सुरूवातीला आपला गोंधळ उडतो. पण ही कोणतीही वनस्पती नसून सजीव प्राणी असल्याचं आपल्या लक्षात येतं. हातांच्या तळव्यांवर ठेवल्यावर हा फारच छोटा दिसतो. हा सजीव नुकताच आढळल्याने त्यावर अजून संशोधन होईल. त्यानंतरच या प्राण्याचे रंगढंग आपल्या लक्षात येऊ शकतील.



## क्षेत्र हेल्थ मॅनेजमेंटचं

कोण होणार?

आरोग्य क्षेत्रात करीअर करण्यासाठी फक्त डॉक्टर हा एकमेव पर्याय नाही. हे क्षेत्र खूप मोठं आहे. इथे तुम्ही विविध प्रकारे काम करू शकता. व्यवस्थापन क्षेत्रात रस असेल तर हॉस्पिटल मॅनेजमेंट म्हणजे रुग्णालय व्यवस्थापनाकडे तुम्ही वळू शकता. हेल्थकेअर क्षेत्राची वाढ वेगाने होते आहे. त्यातच परदेशी कंपन्यांनीही या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केल्याने रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. म्हणूनच तुम्ही हॉस्पिटल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढे जाऊ शकता.

हॉस्पिटल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमापासून पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंतचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही कॉलेजेसमध्ये या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षेचं आयोजन केलं जातं. हॉस्पिटल मॅनेजमेंटसंबंधीच्या या अभ्यासक्रमांमध्ये कायदा, फायनान्स, ह्युमन रिसॉर्स, ऑपरेशन्स मॅनेजमेंट, वैद्यकीय तसंच कायदाविषयक प्रश्न असे विषय शिकवले जातात. यामुळे संपूर्ण व्यवस्थापनाचं ज्ञान तुम्हाला मिळतं.



हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर हॉस्पिटल बिझनेस मॅनेजर, फूड अँड बिव्हरेज मॅनेजर, गेस्ट रिलेशन मॅनेजर, हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर, फ्लोअर मॅनेजर, सेंटर मॅनेजर, पेशंट रिलेशन एक्सिक्युटिव्ह, फ्रंट ऑफिस ॲडमिनिस्ट्रेटर, ऑपरेशन एक्सिक्युटिव्ह म्हणून तुम्ही काम करू शकता. विविध शिक्षण संस्था आणि कॉलेजेसमध्ये हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

दोस्त हे मस्त

### व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन



पक्षी मुळातच सुंदर असतात. त्यांची रंगीबेरंगी पिसं खूप आकर्षक वाटतात. वेगवेगळ्या आकाराच्या, प्रकारच्या या पिसांमुळे पक्षी स्टायलिश दिसतात. काही पक्ष्यांना केसही असतात. या केसांचीही विशिष्ट रचना असते. त्यामुळे पक्ष्यांनी हेअरस्टाईल केल्यासारखंच वाटतं. असाच एक पक्षी म्हणजे व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन. हे पक्षी म्हणजे कबुतरांची सर्वात मोठी प्रजाती आहे. ते मादी टर्कीच्या आकाराचे असतात. त्यांचे केस तुऱ्यासारखे वाटतात. जांभळट रंगाच्या या तुऱ्यांमुळे डोक्यावर मुकुट घातल्यासारखं वाटत असल्याने त्यांना व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन हे नाव पडलं.

खादाडी

### यम्मी वॉटरमिलन स्मूदी



छोट्यांनो, कलिंगडं भरपूर प्रमाणात मिळतात. गारेगार कलिंगड खायला खूप छान वाटतं. या कलिंगडाची तुम्ही मस्त स्मूदी करू शकता. त्यासाठी तीन कप कलिंगडाच्या फोडी घ्या. बिया काढून टाका. अर्धा कप व्हॅनिला आईस्क्रीम, पुदीन्याची पानं हे साहित्य घ्या. मिक्सरच्या भांड्यात कलिंगडाचे तुकडे आणि व्हॅनिला आईस्क्रीम घाला. नीट फिरवून घ्या. हे मिश्रण ग्लासमध्ये ओता. पुदीन्याच्या पानांनी सजावट करा. गारेगार प्या. संध्याकाळी किंवा रात्री ही स्मूदी बनवून पिता येईल.

धमाल


### मित्रमैत्रिणींसोबत घालवा वेळ



मुलांनो, सुट्टीमध्ये तुम्हाला दररोज काहीतरी वेगळं करायचं असतं. मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायचा असतो. मग एखाद्या रविवारी तुम्ही मित्रमैत्रिणींना घरी बोलवू शकता. घरीच टीव्हीवर एखादा चित्रपट बघू शकता. थिएटरमध्ये जाऊनही चित्रपट बघण्याचा प्लॅन करता येईल. अशाप्रकारे प्रत्येक मित्रमैत्रिणीच्या घरी वेगळा कार्यक्रम ठरवा. काहीतरी क्रिएटिव्ह करा. तुमची सुट्टी मस्त आनंदात जाईल. लांब राहणाऱ्या मित्र किंवा मैत्रिणीला यावेळी पत्र लिहा. व्हॉट्स अ‍ॅप, फोनवर तुम्ही रोज भेटत असलात तरी पत्र लिहिण्याची गंमत वेगळीच असते. ती मजा अनुभवा.


योगा टाईम

### पाठीसाठी शिशुआसन



मुलांनो, शाळेत जाताना तुम्ही पाठीवर दप्तर घेता. दप्तराच्या वजनामुळे पाठीच्या कण्याला त्रास होतो. पाठीला आराम मिळावा यासाठी तुम्ही शिशुआसन करा. शिशुआसन म्हणजे लहान बाळ रांगताना ज्या स्थितीत असतं तशी शारीरिक स्थिती. यामुळे मज्जासंस्थेचं कार्यही सुधारतं. हे आसन अगदी सोपं आहे.

## छान रंगवा



## आग विझवणारा 'फायर वास'

व्हॉट्स न्यू?



आग लागल्यावर सगळ्यांची धावपळ होते. घरात लागलेली छोटीशी आगही मोठं नुकसान करू शकते. आग लागल्यावर आपण अग्निशमन दलाला फोन करतो. पण ते येईपर्यंत बराच वेळ जातो. पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न होतो. पण यात इजा होण्याची शक्यता असते. म्हणूनच सॅमसंगने अनोखा फ्लॉवरपॉट तयार केला. हा फ्लॉवरपॉट फेकल्यावर आग पटकन विझते. मित्रांनो, हा जादूचा फ्लॉवरपॉट नाही. यात आग विझवण्यासाठी वापरलं जाणारं पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण भरण्यात आलं आहे. आग लागलेल्या ठिकाणी हा फ्लॉवरपॉट फेकल्यानंतर तो तुटतो आणि त्यातून पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण बाहेर पडल्याने आग विझते.

'फायर वास' असं नाव या फ्लॉवरपॉटला देण्यात आलं आहे. नेहमीच्या फ्लॉवरपॉटप्रमाणेच तो घरात ठेवायचा. शोभेची वस्तू म्हणूनही तो वापरला जातो. मुख्य म्हणजे वेळेला पटकन मिळतो. या फ्लॉवरपॉटमधलं पोटॅशियम कार्बोनेट आग विझवतं. शिवाय आगीशी ऑक्सिजनचा संपर्क होऊ देत नाही. यामुळे आग पसरत नाही. अनेक ठिकाणी अग्निशमन यंत्र लावलेली असतात. पण त्यांच्या तुलनेत हा फ्लॉवरपॉट वापरायला अगदी सोपा आहे. त्यामुळे आपण अगदी बिनधास्त आग विझवू शकतो.

## का हसायचं?

हेल्थ वेल्थ

छोट्यांनो, तुम्ही सकाळी सकाळी जवळच्या बागेतून जोरजोरात हसण्याचे आवाज ऐकले असतील. कोण बरं हसत असावं, असा प्रश्नही तुम्हाला पडत असेल. मित्रमैत्रिणींनो, अनेक ठिकाणी लाफ्टर क्लब्ज असतात. इथे फक्त हसायचं असतं. वेगवेगळ्या लयीत हसायला शिकवलं जातं. हसणं आपल्या आरोग्यासाठी चांगलं असतं. हसल्यामुळे आयुष्य वाढतं असं म्हणतात. हसण्याचे फायदे जाणून घेऊ या.

* हसणं म्हणजे एकप्रकारचा व्यायाम. जोरात हसताना आपल्या हृदयाची गती वाढते. रक्तदाबही वाढतो. धावल्यामुळे किंवा कोणताही व्यायाम केल्यामुळे शरीराला होणारे फायदे फक्त हसल्यामुळे मिळू शकतात.

* हसणारे लोक आजारी पडत नाहीत. हसताना आपल्या शरीरात एचजीएच नावाचा हार्मोन तयार होतो. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते आणि शरीर जंतूंशी लढायला सज्ज होतं.

* हसण्याचं शास्त्र आणि त्याच्या आपल्या शरीरावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाला 'जेलोटोलॉजी' असं म्हणतात.



* समोरची व्यक्ती हसत असेल तर आपल्यालाही हसू येतं.

* हसल्यामुळे स्मरणशक्ती सुधारते. एकाग्रता वाढते. त्यामुळे तुम्हा मुलांनी भरपूर हसायला हवं.

* स्वत:ला गुदगुल्या केल्यावर हसायला येत नाही. दुसऱ्याने अचानक गुदगुल्या केल्यावर मेंदूला धक्का बसतो. पण आपणच गुदगुल्या करणार असू तर याची मेंदूला कल्पना असते. गुदगुल्या करण्याआधीच त्याला आपल्या बोटांच्या स्पर्शाची जाणीव झालेली असते. त्यामुळे स्वत:च स्वत:ला गुदगुल्या करणं मेंदूसाठी धक्का ठरत नाही आणि आपल्याला हसू येत नाही.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) एंटॉमॉलॉजीमध्ये कशाचा अभ्यास केला जातो?
२) फिल्म अँड टिव्ही इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया कुठे आहे?
३) गोवा शिपयार्ड लिमिटेडची स्थापना कधी झाली?
४) संयुक्त राष्ट्रांचं मुख्यालय कुठे आहे?
५) फॅथॉमीटरनी काय मोजतात?
६) महाराष्ट्रात लोकसभेच्या किती जागा आहेत?
७) कोणत्या ऋतूत शरीराला जास्त फॅट्सची गरज असते?
८) इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पेट्रोलियम कुठे आहे?
९) ट्रान्स सायबेरियन रेल्वे लाईन कुठे आहे?
१०)भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला कोणत्या वर्षी सुरूवात झाली?

उत्तरं : १) किटक २) पुणे ३) १९५७ ४) न्यूयॉर्क ५) समुद्राची खोली ६) ४८ ७) हिवाळा ८) देहराडून ९) रशिया १०) १९६२

# अनैतिक संबंधाच्या संशयातून पत्नीचा खून

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

दोन वर्षाच्या प्रेम प्रकरणानंतर युवक आणि युवतीने कुटुंबीयांच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह केला. दोघांचाही सुरळीत संसार सुरू झाला. मात्र पत्नीचे कुण्यातरी युवकाशी अनैतिक संबंध आहेत, असा संशय पतीला होता. याच वादातून पतीने पत्नीचे डोके भिंतीवर आपटून तिचा खून केला.

ही घटना हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून त्याने पत्नीची हत्या केल्याची कबुली दिली आहे. राखी उर्फ पूनम पाटील (२७) असे खून झालेल्या महिलेचे नाव असून सूरज पाटील असे आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सूरज आणि राखीने तुळजाईनगरात भाड्याने खोली घेतली होती. सूरज पेंटींगचे काम करतो. त्यांना पाच आणि तीन वर्षाच्या दोन मुली आहेत.

गुरूवार ९ जानेवारीला दुपारच्या सुमारास पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतल्याच्या कारणातून दोघांमध्ये वाद झाला. रागात सूरजने राखीला डोक्यात मारले. व तिचे डोके भिंतीवर मारले. त्यामुळे राखी रक्तबंबाळ होऊन खाली कोसळली. घरात रक्ताचा सडा पडला. पाहता पाहता राखी बेशुध्द झाली. दुपारी ३ वाजताच्या सुमारास सूरज राखीला मेडिकल रुग्णालयात घेऊन गेला. डॉक्टरांनी राखीला मृत घोषित केले. पत्नी इमारतीवरून खाली पडल्याने डोक्याला जबर लागल्याचे सूरजने डॉक्टरांना सांगितले.

राखीचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शवविच्छेदन गृहात पाठविण्यात आला. मेडिकल पोलिस बूथकडून हुडकेश्वर पोलिसांना घटनेची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भेदोडकर यांनी एक पथक रुग्णालयात तर दुसरे पथक घटनास्थळी रवाना केले. खोलीत जाताच पोलिसांना घरात रक्ताचा सडा दिसला. डॉक्टरांना दिलेली माहिती आणि घटनास्थळाचे दृष्य विरोधाभासी होते.

घटनेनंतर सूरज दोन्ही मुलींना घेऊन फरार झाला. घरमालकासह जवळपासच्या लोकांनाही त्याच्याबाबत माहिती नव्हती. पोलिसांनी पाहणी केली असता घरात रक्ताचा सडा पडून होता. ठाणेदार भेदोडकर यांनी सूरजला पकडण्यासाठी सापळा रचला. पोलीस अंमलदाराच्या माध्यमातून त्याला फोन केला.

मेडीकलच्या कागदपत्रावर तुझी स्वाक्षरी पाहिजे. हे कागदपत्र भविष्यासाठी महत्वाचे आहे. स्वाक्षरी करून कागदपत्र घेऊन जा. असे सांगताच सूरज रूग्णालयात पोहोचला आणि पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी करण्यात आली. त्याने पत्नीचा खून केल्याची कबुली दिली.

# मविआने पराभव मान्य केला ते बरे झाले : चंद्रशेखर बावनकुळे



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

महाविकास आघाडीने पराभवाचे कारण मान्य केले हे बरे झाले. कालपर्यंत मशीनला दोष देत असणारे वस्तूस्थितीवर आले आहेत. त्यांनी आत्मचिंतन केल्याचे दिसून येत आहे. काय चुकले हे जर त्यांनी समजून घेतले तर त्यांची गाडी रुळावर येऊ शकते, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी असे म्हटले आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे राजकारण करु नये. आरोपींवर कारवाई होईपर्यंत सर्वांनी एकत्र राहिले हवे, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. तर विरोधक कालपर्यंत ईव्हीएमला दोष देते होते आता त्यांनी आत्मचिंतन केल्याचे दिसत आहे, असा टोलाही त्यांनी मविआला लगावला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आम्ही लोकसभा निवडणुकीत काही चुका केल्या होत्या त्या विधानसभा निवडणुकीत सुधारल्या. आम्ही जनतेपर्यंत गेलो घर चलो अभियान केले. जनतेला पटवून दिले की डबल ईंजिन सरकार विकास करु शकते, हे सांगितल्याने जनतेने आमच्यावर विश्वास ठेवला.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मविआमध्ये विकासाचे व्हिजन नाही. मविआने लोकसभा निवडणुकीत जनतेला कन्फ्यूज केले आणि त्यांना मतदान झाले. ते आपसातल्या वादामध्ये पेटली आहे. ते एकमेकांना लाथाडत आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, कुठल्याही नेत्याला पक्षात घेत असताना स्थानिक भाजपा परवानगी देत नाही तो पर्यंत आम्ही कुणालाही पक्षप्रवेश देणार नाही. महायुतीमध्येनाराजी निर्माण होणार नाही याची पक्षप्रवेशावेळी काळजी घेतली जाईल. आमच्यासाठी महायुती महत्त्वाची आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, संतोष देशमुख प्रकरणी राजकारण करण्साची गरज नाही. या प्रकरणी मला कुणावर आरोप करायचे नाही. पण अशा वेगवेगळ्या भूमिकेमूळे तपासात थोडेसं किंतू परंतू राहिला तर आरोपीला ती सरळ मदत होईल म्हणून आरोपीला शिक्षा होण्यासाठी आपण सर्वांनी मिळून काम करायला हवे.

आमदार सुरेश धस यांच्याशी माझे 2-3 वेळा बोलणे झाले आहे. धस यांनी कोणतीही गोष्ट जाहीरपणे उघड करण्याऐवजी सरकारकडे मांडली पाहिजे. त्यांच्याशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही चर्चा झाली आहे. सरकारशी संबंधित भूमिका सरकारसमोर आणि पक्षाशी संबंधित भूमिका प्रदेशाध्यक्ष म्हणून माझ्यासमोर मांडली पाहिजे. परंतु, बीड हत्या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी सगळ्या प्रकारची चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्र जर विकसित करायचा असेल सत्ताधारी आणि विरोधक सर्वांनी निवडणुकीच्या राजकारणातून बाहेर आले पाहिजे आणि विकासासाठी कार्य केले पाहिजे. यासाठी आपल्याला हेवेदावे सोडवे लागतील. जर उद्या शरद पवार आणि देवेंद्र फडणवीस-उद्धव ठाकरे एका मंचावर आले त्याला काय अडचण आहे. विकासाच्या मंचावर एकत्र येण्यासाठी काहीच अडचण नाही. राजकारण, पक्षाचे आमचे व्यासपीठ वेगळे आहेत पण महाराष्ट्राच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे.

# कोपरगावात माजी उपनगराध्यक्षाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. १० :

कोपरगावचे माजी उपनगराध्यक्ष स्वप्नील शिवाजी निखाडे (३३) यांनी विषारी औषध प्राशन केले होते. गुरुवारी नाशिक येथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. निखाडे यांनी ७ जानेवारी रोजी सायंकाळी शहरातील येवला नाका परिसरात आपल्याच गाडीत बसून विषारी औषध घेतले होते. या घटनेमुळे कोपरगाव शहरासह तालुक्यात एकच खळबळ उडाली होती. उपनगराध्यक्षांनी हे पाऊल का उचलले याचे कारण अद्याप अस्पष्ट असून त्यांना तत्काळ कोपरगाव शहरातील मुळे हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले होते. मात्र, प्रकृती खालावल्याने त्यांना तत्काळ नाशिक येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

त्याठिकाणी त्यांच्यावर उपचार सुरू असताना गुरुवारी सकाळी प्रकृती खालावल्याने उपचारादरम्यान नाशिक येथील खासगी रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई, वडील, बहिण, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी निखाडे यांचे स्वप्नील चिरंजीव होत.

# अहमदाबादमध्ये ८ वर्षाच्या मुलीला हृदयविकाराचा झटका

■ वृत्तसंस्था
अहमदाबाद, दि. १० :

अहमदाबादमधील एका खासगी शाळेत शुक्रवारी एका ८ वर्षीय मुलीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. गार्गी रानपारा सकाळी आठच्या सुमारास शाळेत पोहोचली. पायऱ्या चढत असताना अचानक तिच्या छातीत दुखू लागले. वेदना झाल्यानंतर, मुलगी लॉबी बेंचवर बसली आणि काही सेकंदात जमिनीवर पडली.

थलतेज परिसरातील शाळेच्या कर्मचाऱ्यांनी मुलीला रुग्णालयात नेले, तेथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. प्राथमिक तपासात मुलीच्या मृत्यूचे कारण हृदयविकाराचा झटका असल्याचे सांगण्यात आले आहे.

सीसीटीव्ही कॅमे-यामध्ये गार्गी शाळेच्या कर्मचाऱ्यांजवळ उभी राहून त्यांचे बोलणे ऐकत आहे. गार्गी शाळेच्या कर्मचाऱ्यांजवळ उभी राहून त्यांचे बोलणे ऐकत आहे. छातीत दुखू लागल्याने गार्गी बेंचवर बसली. छातीत दुखू लागल्याने गार्गी बेंचवर बसली. बाकावर बसताच ती जमिनीवर कोसळली. आजूबाजूचे शिक्षक व विद्यार्थी मदतीसाठी धावले. बाकावर बसताच ती जमिनीवर कोसळली. आजूबाजूचे शिक्षक व विद्यार्थी मदतीसाठी धावले. अचानक छातीत तीव्र वेदना होऊ लागल्या.

शाळेच्या मुख्याध्यापिका शर्मिष्ठा सिन्हा यांनी सांगितले की, कर्मचाऱ्यांनी १०८ रुग्णवाहिका बोलावली, परंतु रुग्णवाहिका शाळेत पोहोचण्यास उशीर झाला. त्यामुळे गार्गीला कर्मचाऱ्यांच्या गाडीतून झायडस रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तिचे प्राण वाचवू शकले नाहीत. गार्गीचे आई-वडील मुंबईत राहतात. ती अहमदाबादमध्ये आजी-आजोबांसोबत राहत होती. घटनेनंतर पोलिसांनी शाळेत पोहोचून सीसीटीव्ही फुटेज तपासले. गुन्हे शाखेच्या पथकाने शाळेचीही चौकशी केली आहे. गार्गी पूर्णपणे निरोगी होती.

# पालकांच्या वादात अल्पवयीन मुलांना पारपत्रापासून वंचित ठेवता येणार नाही

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

## उच्च न्यायालयाचा निर्वाळा

पालकांमधील वैवाहिक वादामुळे अल्पवयीन मुलांचा पारपत्र मिळविण्याचा आणि परदेशात प्रवास करण्याचा अधिकार हिरावून घेता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या निमित्ताने स्पष्ट केले. तसेच, परदेशात प्रवास करण्याचा अधिकार हा संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकाराचा भाग असल्याचे निरीक्षण नोंदवून १७ वर्षांच्या मुलीला दोन आठवड्यांच्या आत पारपत्र देण्याचे आदेश न्यायालयाने पुणे प्रादेशिक पारपत्र कार्यालयाला (आरपीओ) दिले.

अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी ना हरकत देण्यास नकार दिल्याने याचिकाकर्त्या मुलीच्या संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करता येणार नाही. त्याचप्रमाणे, त्याबाबत पूर्वग्रहदूषित राहून निर्णय घेता येणार नाही किंवा तो हिरावूनही घेता येणार नाही. असे निरीक्षण न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना नोंदवले. आपल्यासमोरील प्रकरणात मुलीला परदेशात अभ्यास दौरा करण्याची संधी मिळाली आहे. परंतु, तिला पारपत्र नाकारण्याच्या पारपत्र प्राधिकरणाच्या कृतीमुळे या मुलीचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते, असेही न्यायालयाने नमूद केले.

ही मुलगी पारपत्र मिळवण्यासाठी स्वतः किंवा आईमार्फत नव्याने अर्ज करू शकत नाही, असे आदेश कोणत्याही न्यायालयाने दिलेले नाहीत. तसेच, पारपत्राला ना हरकत नाकारण्यासह ते न देण्यासाठीचे कोणतेही वैध कारण मुलीच्या वडिलांनी दिलेले नाही. त्यामुळे, पारपत्र प्राधिकरणाला वडिलांच्या ना हरकतीच्या आधारे मुलीला पारपत्र नाकारता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, या मुलीला पारपत्र उपलब्ध करण्याचे आदेश प्राधिकरणाला दिले.

# मुंबई महानगरपालिकेकडून औषध वितरकांची १२० कोटींची देयके थकीत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :



वैद्यकीय महाविद्यालये, उपनगरीय रुग्णालये आणि दवाखान्यांना औषधांचा पुरवठा करणाऱ्या वितरकांची सुमारे १२० कोटी रुपयांची देयके मुंबई महानगरपालिकेने चार महिन्यांपासून थकवली आहेत. देयके थकवल्यामुळे वितरकांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे. परिणामी, वितरकांनी तातडीने देयके मंजूर न झाल्यास १३ जानेवारीपासून औषधांचा पुरवठा बंद करण्याचा इशारा मुंबई महानगरपालिकेला दिला आहे.

मुंबई महानगरपालिकेने मागील वर्षभरापासून वैद्यकीय महाविद्यालये, उपनगरीय रुग्णालये, प्रसूतिगृह, दवाखान्यांमध्ये शून्य औषध चिठ्ठी योजना राबविण्याची केवळ घोषणाच केली. शून्य औषध चिठ्ठीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे प्रशासनाला शक्य होत नसल्याने ही योजना वारंवार पुढे ढकलली जात आहे. मात्र सध्या रुग्णालयांमध्ये उपलब्ध करण्यात येणाऱ्या औषधांची जवळपास १२० कोटींची देयके मागील चार महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे उघडकीस आले आहे. यासंदर्भात औषध वितरकांकडून वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही औषधांची देयके मंजूर झालेली नाहीत. त्यामुळे औषध वितरकांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. अनेकांना दैनंदिन कामकाज करणे व अन्य बँकांच्या कर्जाची परतफेड, देणी देणे अवघड झाले आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवा खंडित होऊ नये, तिच्यामध्ये कोणताही व्यत्यय येऊ नये व रुग्णांचे हाल होऊ नयेत यासाठी वितरकांकडून मागील काही महिन्यांपासून सहकार्याची भूमिका घेतली होती. मात्र वारंवार पाठपुरावा करूनही देयके मंजूर केली जात नाही. औषधांची देयके तातडीने मंजूर करण्यात यावीत, अन्यथा १३ जानेवारीपासून मुंबई विविध रुग्णालयांचा औषध पुरवठा बंद करण्याचा निर्णय औषध वितरकांनी घेतला आहे. दरम्यान, औषध वितरकांनी प्रलंबित देयकांसंदभार्तील पाठवलेले पत्र प्रशासनाला मिळाले आहे. याबाबत सविस्तर माहिती घेण्याचे काम सुरू असल्याचे मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे उप आयुक्त संजय कुऱ्हाडे यांनी सांगितले.

# शाळेत अल्पवयीन मुलीची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

मुंबईतल्या एका आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या शाळेत अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या मुलीचा मृतदेह शाळेच्या प्रसाधनगृहात आढळून आला अशी माहिती पोलिसांनी दिली. ही मुलगी ११ वीला शिकत होती. तिने बुटाच्या नाडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी ही माहिती दिली. या प्रकरणात आरे पोलीस ठाण्यात आत्महत्येचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार ११ वीत शिकणारी ही मुलगी गेल्या दोन महिन्यांपासून नैराश्यात गेली होती. ती नेहमीप्रमाणे शाळेत गेली. त्यानंतर तिचे कराटे क्लास सुरु असताना ती मुलगी प्रसाधनगृहात गेली. मात्र प्रसाधनगृहातून बराच वेळ झाला तरीही कराटे क्लासला आली नाही. शाळेत असलेल्या अटेंडंटनी प्रसाधनगृहात जावून पाहिलं तेव्हा प्रसाधनगृहाचं दार बंद आढळून आलं. त्यानंतर प्रसाधनगृहाचा दरवाजा तोडण्यात आला. ज्यावेळी ही मुलगी गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आली.

# भिंत अंगावर पडून दांपत्य गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
हिंगोली, दि. १० :

सेनगाव तालुक्यातील गुगुळपिंपरी येथे घराची भिंत अंगावर पडून दांपत्य गंभीर जखमी झाले होते. त्यातील जखमी व्यक्तीचा उपचार सुरु असताना गुरुवारी सकाळी मृत्यू झाला, तर महिलेवर उपचार सुरु आहेत. गुगुळपिंपरी येथील ज्ञानेश्वर रामभाऊ कोकाटे (५०) व त्यांची पत्नी मजूरी करून उदरनिर्वाह करतात. त्यांना शासकीय योजनेमध्ये घरकुल मंजूर झाले असून नवीन घराचे बांधकाम सुरु करावयाचे होते. त्यासाठी त्यांनी जुन्या घराच्या तीन बाजूच्या भिंती पाडल्या होत्या, तर एक भिंत तशीच ठेऊन त्या बाजूने कापड लावले होते. बुधवारी ८ रोजी रात्री ते घरात झोपले होते. रात्रीच्या वेळी अचानक त्यांच्या अंगावर भिंत कोसळली.

यामध्ये दोघेही दगड व मातीच्या ढिगाऱ्याखाली दोघेही दबले गेले. मोठा आवाज झाल्याने परिरातील गावकरी धावून आले. ग्रामस्थांनी तातडीने दगड व माती हटवून गंभीर जखमी झालेल्या दांपत्याला बाहेर काढले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर गोरेगाव पोलिस ठाण्याचे निरीक्षक व्ही. एम. झळके, जमादार अनिल भारती, नवले यांच्या पथकाने तातडीने भेट दिली.

# टोरेस घोटाळा प्रकरणात तिघांना अटक

## २६ लाखांची रोकड जप्त

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १० :

टोरेस आर्थिक घोटाळ्यात भाईंदर येथील कंपनीशी निघडीत तिघा जणांना नवघर पोलिसांनी अटक केली आहे. त्यात शाखेची जागा भाड्याने देणारी महिला तसेच शाखेचा व्यवस्थापक आणि पर्यवेक्षकाचा समावेश आहे. आरोपींकडून २६ लाखाची रोखड जप्त करण्यात आली आहे. त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

टोरेस कंपनीने आठवड्याला ११ टक्के व्याज परतावा देण्याच्या नावावर मिरा भाईंदरसह मुंबई व इतर शहरात गुंतवणूकदारांची कोट्यावधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले आहे. भाईंदरच्या रामदेव पार्क येथील शाखा देखील बंद झाली आहे. याप्रकरणी नवघर पोलिसांनी कंपनीच्या तिघाजणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी व्यवहारासाठी वापरण्यात येणारी कंपनीची दोन बँक खाती गोठवली आहे. भाईंदरच्या नवघर पोलिसांनी कंपनीशी संबंधित तिघांना विविध ठिकाणांवरून अटक केली आहे. मिरा रोड च्या रामदेव पार्क येथील कार्यालय भाडेतत्वार देणारी महिला लक्ष्मी यादव हिला ताडदेव येथून अटक करण्यात आली आहे.

तर पर्यवेक्षक नितित लाखवानी (४७) आणि व्यवस्थापक कैसर खालिद शेख (५२) यांना अटक करण्यात आली आहे. हे दोघे रामदेव पार्क येथील शाखेत काम करत होते. यातील व्यवस्थापक आणि रोखपालाकडून जवळपास २६ लाख २० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.


# पद्मावती मंदिरातून १५ लाखांचे दागिने लंपास

■ महासागर प्रतिनिधी
सांगली, दि. १० :

आरग (ता. मिरज) येथील पद्मावती मातेच्या मंदिरातून चोरट्यांनी बुधवारी रात्री १५ लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मध्यरात्री दीडच्या सुमारास चोरट्यांनी मंदिराच्या बाजूस असणाऱ्या जिन्याने मंदिरात प्रवेश केला. गाभाऱ्यासमोरील लाकडी दरवाजाची कडी तोडली आणि गाभाऱ्यात जात १८ तोळे दागिने लंपास केले. तीन दिवसांपूर्वीच या मंदिरात वार्षिक उत्सव झाला होता. त्यासाठी सांगली, कोल्हापूर, कर्नाटकातून भाविक आले होते. त्याच वेळी चोरट्यांनी पाळत ठेवून हा प्रकार केला असावा असा संशय आहे.

# विष्णू चाटेला खंडणी प्रकरणात न्यायालयीन कोठडी

■ महासागर प्रतिनिधी
बीड, दि. १० :



बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ९ डिसेंबर रोजी झाली होती. या सगळ्या मुळाशी खंडणी प्रकरण असल्याचे स्पष्ट झाले आहे. पवनचक्की प्रकल्प अधिकाऱ्यांना खंडणी मागण्यात आली होती. या प्रकरणात वाल्मीक कराडला अटक झाली आहे, त्यात आता या प्रकरणात विष्णू चाटेला सुद्धा पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर केज कोटार्ने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यामुळे आता चौकशीला आणखी गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विष्णू चाटेवर खुनाचाही गुन्हा दाखल झाला आहे. खुनाचा तपास एसआयटीकडून केला जात आहे, तर सीआयडीकडून खंडणीचा तपास सुरू आहे. यात खंडणी प्रकरणी तपास संपला असे सीआयडीने कोर्टात म्हंटले. विष्णू चाटेला केज कोर्टात हजर करण्यात आले होते. यावेळी केवळ सात मिनिटांत दोन्ही बाजूंचा युक्तिवाद संपला व कोटार्ने विष्णू चाटेला न्यायालयीन कोठडी सुनावली. मात्र, विष्णू चाटेवर खुनाचा गुन्हा असल्याने एसआयटीला त्याचा ताबा मिळू शकतो.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात देखील वाल्मीक कराडचे मास्टरमाइंड असल्याचा आरोप केला जात आहे. वाल्मीक कराड मंत्री धनंजय मुंडे यांच्या जवळचा आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी देखील त्यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा देण्याची मागणी विरोधकांकडून केली जात आहे. या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीडमधील गुन्हेगारी तसेच वाल्मीक कराड आणि धनंजय मुंडे यांच्यावर चांगलाच निशाणा साधला आहे.

वाल्मीक कराड आणि आता विष्णू चाटेला खंडणी प्रकरणात अटक केली आहे. यावर अंजली दमानिया यांनी थेट सीआयडीलाच सवाल केला आहे. सीआयडी आणि एसआयटीची चौकशी जी होती ती संतोष देशमुख हत्येच्या चौकशीसाठी होती. खंडणीचे आरोप शोधण्यासाठी नव्हती. असे असताना सीआयडीने वाल्मीक कराडला कोणत्या ग्राउंडवर अटक केली, खंडणीमध्ये सीआयडी होते का? असा सवाल अंजली दमानिया यांनी उपस्थित केला आहे.

अंजली दमानिया पुढे म्हणाल्या, मे महिन्यात देखील खंडणीचे प्रकरण गंभीर झाले होते. त्यावेळेस जर योग्य कारवाई झाली असती तर संतोष देशमुख यांचा जीव गेला नसता. खंडणीची मागणी मे महिन्यापासून होती.

एका अधिकाऱ्याचे अपहरण देखील केले गेले होते आणि या सगळ्या गोष्टी एकच आहेत. विष्णू चाटे आणि जे काही माणसे होती त्यांनी फक्त आणि फक्त वाल्मीक कराडच्या सांगण्यावरून काम केले होते, असा दावा अंजली दमानिया यांनी केला आहे.

# ईव्हीएम म्हणजे एव्हरी व्होट अगेन्स्ट मुल्ला

## भाजप आमदार नीतेश राणेंचे भाषण, हिंदुत्वाच्या मुद्यावर बोलताना केला हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
सांगली, दि. १०



ईव्हीएम म्हणजे एव्हरी व्होट अगेन्स्ट मुल्ला असे म्हणत भाजप आमदार व मंत्री नीतेश राणे यांनी सांगलीमध्ये भाषण केले. या भाषणात त्यांनी पुन्हा एकदा हिंदुत्वाच्या मुद्दयावर भर दिला आहे. भाजपमधील हिंदुत्ववादी चेहरा म्हणून आता नीतेश राणे यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यांच्या आक्रमक भाषणामुळे समाजात तेढ निर्माण होईल असे भाषण त्यांनी करू नये, असा सल्ला देखील विरोधकांनी त्यांना दिला होता. मात्र सांगली येथे बोलताना त्यांनी पुन्हा एकदा विशिष्ट समाजाला लक्ष्य करत भाषण केले आहे.

राज्यात महायुतीचे स्पष्ट बहुमताने सरकार स्थापन झाले. मात्र विरोधकांकडून ईव्हीएम मशीनवर टीका केली जात आहे. यावर भाषणात बोलताना नीतेश राणे म्हणाले, विरोधक ईव्हीएमच्या नावाने बोंबलतात, ईव्हीएम ला दोष देतात. पण विधानसभेला आम्ही तिकडे ईव्हीएमवरच निवडून आलोय. ईव्हीएम म्हणजे एव्हरी व्होट्स अगेन्स्ट मुल्ला, असा फुलफॉर्मच नीतेश राणे यांनी सांगितला आहे. असे म्हणत त्यांनी एका विशिष्ट समाजाला लक्ष्य केले आहे.

पुढे बोलताना नीतेश राणे म्हणाले, ज्याने भगवाधारी सरकार आणले त्यांचे रक्षण करणे ही आमची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात हिंदुत्ववादी सरकार आहे. आम्हाला विशाळगडावर १२ तारखेला कसा उरूस होतो हे बघायचे आहे. असे म्हणत राणे यांनी यावेळी १२ जानेवारी उरूस निघू देणार नसल्याचे भाषणातून स्पष्ट केले आहे.

सांगलीचे खासदार विशाल पाटील यांच्यावर टीका करताना नीतेश राणे म्हणाले, सांगलीत दोन कत्तलखाने सुरू आहेत, ते कसे सुरू आहेत हे खासदार विशाल पाटील यांनी सांगणे गरजेचे होते. परंतु मी फाटक्या तोंडाचा आहे हे त्यांना माहिती होते. म्हणूनच, माझ्या भाषणापूर्वीच ते येथील कार्यक्रमातून निघून गेले, असा टोमणा राणेंनी पाटलांना लगावला आहे. जो नियम हिंदूंना लागू होतो तो इतर धमार्ला देखील लागू झाला पाहिजे. आता सरकार हिंदुत्ववादी आहे, आता कोणाचे लाड चालणार नाहीत, असेही नीतेश राणे म्हणाले.

दरम्यान, १२ जानेवारी रोजी विशाळगडावर उरूस निघत असतो. यावर बोलताना नीतेश राणे म्हणाले, १२ तारखेला विशाळगडावर उरूस काढण्याचे नियोजन आहे. तिथे काही महिन्यांपूर्वी काय घडले आहे हे सर्वांना माहीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. हिंदू समाजाच्या एकंदरीत इच्छेनुसार १२ तारखेला कोणीही विशाळगडावर कायदा व सुव्यवस्था खराब करण्याचे काम करू नये, असे आवाहन नीतेश राणे यांनी केले आहे.

पुढे नीतेश राणे म्हणाले, हिंदू समाजाने संयमाने घेतले असताना इतर समाजानेही संयमाने घ्यावे, उगाच कोणालाही चिथावण्याचे काम करू नये. उरूस काढून कोणालाही चिथावण्याचा प्रकार करू नये. शासन म्हणून आम्ही या घटनांवर लक्ष ठेऊन असणार आहोत, असेही नीतेश राणे यांनी स्पष्ट केले आहे.

# महासागर वृत्तसागर

नागपूर

■ शनिवार, दि. ११, जानेवारी २०२५ ■


# देवलापार येथील ताज राईस मिलची १.१५ कोटी रुपयांची वीज चोरी उघडकीस

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

रामटेक तालुक्यातील देवलापार येथील ताज राईस मिल या औद्योगिक ग्राहकाकडील तब्बल 1 कोटी 2 लाख 23 हजार 894 रुपयांची वीज चोरी महावितरणच्या भरारी पथकाने उघडकीस आणली असून सोबत तडजोडीच्या रकमेपोटी 13 लाख 10 हजाराच दंड देखील ठोठविण्यात आला आहे. संपुर्ण विदर्भात एवढ्या मोठ्या रकमेची वीज चोरी पहिल्यांदाच उघडकीस आली आहे. याप्रकरणी ताज राईस मिलचे शफि क रीर अंसारी याचेविरोधात रामटेक पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा 2003, सुधारीत 2007 च्या कलम 151 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.



30 डिसेंबर 2024 रोजी महावितरणच्या नागपूर शहर भरारी पथकाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता वैभव नारखेडे हे दुपारी 4.45 च्या सुमारास त्यांचे सहकारी सहायक अभियंता एन. आर. बागडे, सहयक सुरक्षा व अंमलबजावणी अधिकारी व्ही. एस. बिसने, वरिष्ठ तंत्रज्ञ एस. आर. यादव व मुमारी व्हि. के बारलिंगे यांचेसह देवलापार येथील ताज राईस मिलचा विजपुरवठा व संच तपासणी करण्याकरिता गेले असता तेथे विज वापराची नोंद होण्यासाठी असलेल्या थ्री फेजच्या औद्योगिक विजमिटरला आणि मिटर टर्मिनल कव्हरला सुद्धा सील नव्हते.

ही राईस मिल पुर्ण लोडवर सुरु असतांनाही विजमिटरच्या डिस्प्लेवर कमी वापर दिसत होता. सबब, सदर विजमिटरला येणारी इनकमिंग सर्विस केबलची पाहणी करून या इनकर्मींग केबलला जोडलेला ट्रान्सफॉर्मरच्या डिस्ट्रीब्युशन बाक्सच्या जागी करंट मोजले असता सुरु असलेल्या वापराप्रमाणे करंत दिसत होता. सर्विस केबलला दोन ठिकाणी जोड दिसत होता. सर्विस केबल व मिटरच्या डिस्प्ले वरील करंट मध्ये तफावत असल्याने या विजमिटरला येणा-या केबलची तपासणी केली असता या मिटर रूमच्या मागील खोलीत या इनकमिंग सर्विस केबलला अतिरिक्त केबल जोडल्याचे निदर्शनास आले व या केबल द्वारे संपूर्ण राईस मिलचा विजपुरवठा चालू असल्याचे निदर्शनास आले. या अतिरिक्त जोडलेल्या केबलवर देखिल सुरु असलेल्या वीज वापरा प्रमाणे करंट दिसत होता. मात्र या विज वापराची नोंद मिटर मध्ये होत नव्हती.

या सर्व प्रकाराची योग्य शहानिशा करून ग्राहकाने अवैधरीत्या विज पुरवठा घेत मागील 12 महिन्याच्या कालावधीत 4 लाख 90 हजार 32 विज युनिटचा अवैध वापर करून रुपए 1 कोटी 2 लाख 23 हजार 894 चे महावितरणचे आर्थिक नुकसान केल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी भारतीय विज कायदा 2003 सुधारित 2007 कलम 135 अन्वये ताज राईस मिलचे शफि क रीर अंसारी याचेविरोधात रामटेक पोलीस ठाण्यात विजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय विज कायदा 2003 सुधारित 2007 चे कलम 152 प्रमाणे तडजोडीची रक्कम म्हणून 13 लाख 10 हजाराचा दंड असे एकुण 1 कोटी 15 लाख 33 हजार 894 रुपयाचे देयके आकारण्यात आले आहे.

सुरक्षा आणि अंमलबजावणी विभागा अंतर्गत कार्यरत नागपूर शहर भरारी पथकाने विदभार्तील आजवरची सर्वात मोठि वीज चोरी उघडकीस आणण्यासाठी महावितरणचे संचालक (संचालन) अरविंद भादिकर, कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) अपर्णा गिते (म.पो.से),नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक परेश भागवत, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, सुरक्षा व अंमजबावणी विभागाच्या नागपूर परिक्षेत्राचे उपसंचालक सुनिल थापेकर यांच्यासह अनेकांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता वैभव नारखेडे आणि त्यांच्या सहका-यांचे अभिनंदन केले आहे.

# प्रेयसीला आयफोन घेऊन देण्यासाठी चोरी

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

प्रेयसीला आयफोन घेऊन देण्यासाठी दोन भावंडांनी चोरीचा मार्ग पत्करला. एका घराचे कुलूप तोडून रोख 1.44 लाखांवर डल्ला मारला. पळून जात असताना गस्तीवर निघालेल्या कळमना पोलिसांच्या ते हाती लागले. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरीची रक्कम जप्त केली.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही आरोपी सख्खे भाऊ आहेत. एक 17 तर दुसऱ्याचे वय 16 वर्षे आहे. जुनी कामठी मार्गावरील कामनानगर परिसरात राहणारे दिघेश्वर किसनलाल रहांगडाले (36) हे गत 6 जानेवारी रोजी घराला कुलूप लावून गावी गेले होते. बुधवारी आरोपींना त्यांच्या घरी कुलूप दिसले. सुरक्षा भिंत ओलांडून ते आवारात शिरले. मुख्य दाराचे कुलूप तोडून आत घुसत कपाटातील 1 लाख 44 हजारांची रोकड चोरी करून पसार झाले. गुरूवारी पहाटे कळमना पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान दोघेही भाऊ संशयास्पदरित्या फिरताना दिसले. त्यांना थांबण्यासाठी आवाज दिला असता दोघांनीही पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून दोघांनाही पकडले. झडतीमध्ये त्यांच्याजवळ 1.43 लाख रुपये मिळाले. काही पैसे त्यांनी खाण्या-पिण्यात उडवले होते. पोलिसांनी पैशांबाबत विचारले असता कामनानगरात घरफोडी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी रहांगडाले यांच्या तक्रारीवरून दोघांविरुद्धही गुन्हा नोंदविला.

## चोरीचे ८ गुन्हे आहेत दाखल

सखोल चौकशीत माहिती मिळाली की, मोठ्या भावाचे परिसरातच राहणाऱ्या एका मुलीशी प्रेमसंबंध आहेत. तिला आयफोन पाहिजे होता. त्यामुळे दोघांनीही चोरीची योजना बनवली. दोघांविरुद्ध यापूवीर्ही चोरीचे 8 गुन्हे नोंद आहेत. मात्र दरवेळी त्यांना अल्पवयीन असल्याचा लाभ मिळतो. बाल निरीक्षणगृहातूनही ते लवकरच बाहेर येतात. दोघाही भावांना दारू आणि गांजाचे व्यसनही आहेत. चोरीचे पैसे ते मौजमज्जा करण्यात उडवतात.

# ट्रेनमधून पडल्याने तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

यशोधरानगर ठाण्यांतर्गत एका तरुणाचा धावत्या ट्रेनमधून खाली पडल्याने मृत्यू झाला. शैलेंद्र रामदास चक्रवर्ती (29) रा. पाटन, जबलपूर असे मृताचे नाव आहे.

गत 2 जानेवारीच्या रात्री शैलेंद्र रेल्वेने प्रवास करीत होता. कळमना स्टेशनपासून नागपूर रेल्वे स्टेशनकडे जाताना यशोधरानगर परिसरात तोल गेल्याने तो ट्रेनमधून खाली पडला. जखमी अवस्थेत एक तरुण पडून असल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून पोलिसांना मिळाली. यशोधरानगर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्याला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले. मंगळवारी उपचारादरम्यान शैलेंद्रचा मृत्यू झाला. त्याच्याजवळ मिळालेल्या कागदपत्रांवरून शैलेंद्रच्या कुटुंबीयांशी संपर्क करून घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# घरगुती वादातून पत्नीचा खून

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

शहरात पुन्हा एकदा खुनाची घटना पुढे आली आहे. घरगुती वादातून पतीने पत्नीच्या डोक्यावर जड वस्तूने प्रहार करून यमसदनी पाठवले. उपचाराच्या बहाण्याने तिला रुग्णालयात घेऊन गेला. दिशाभूल करण्यासाठी डॉक्टरला ती छतावरून पडल्याची माहिती दिली. रुग्णालयातून एमएलसी हुडकेश्वर ठाण्यात पोहोचली. पोलिस घटनास्थळी गेले असता घरात रक्त पसरलेले होते आणि पती गायब होता. पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. रात्रीच्या सुमारास पोलिसांनी आरोपी पतीला शोधून काढत बेड्या ठोकल्या. राखी सूरज पाटील (27) असे मृत महिलेचे तर सूरज पाटील (34) असे आरोपी पतीचे नाव आहे. त्यांना 5 आणि 3 वर्षांची दोन मुलेही आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारीच सूरज आणि राखीने तुळजाईनगरात नीलेश दाढे यांच्या घरी भाड्याने खोली घेतली होती. गुरूवादी दुपारी कौटुंबिक कारणातून दोघांमध्ये वाद झाला. रागात सूरजने काहीतरी जड वस्तूने राखीच्या डोक्यात मारून रक्ताच्या थारोळ्यात लोळवले. तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दुपारी 3 वाजताच्या सुमारास तो राखीला घेऊन उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात गेला. डॉक्टरला ती इमारतीच्या तिसऱ्या माळ्यावरून खाली पडल्याने डोक्याला जबर मार लागल्याची माहिती दिली. डॉक्टरांनी तपासून राखीला मृत घोषित केले. त्यानंतर राखीचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठ शवविच्छेदन गृहात पाठविण्यात आला.

मेडिकल पोलिस बूथकडून हुडकेश्वर पोलिसांना घटनेची माहिती मिळाली. ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर यांनी एक पथक मेडिकल रुग्णालयात तर दुसरे पथक घटनास्थळी रवाना केले. खोलीत जाताच पोलिसांना फर्शीवर सर्वत्र रक्त पसरलेले दिसले. डॉक्टरांना दिलेली माहिती आणि घटनास्थळाचे दृष्य विरोधाभासी होते.

## अनैतिक संबंधाचा होता संशय

सूरज दोन्ही मुलांना घेऊन फरार झाला. घरमालकासह आसपासच्या लोकांनाही त्याच्याबाबत माहिती नव्हती. तत्काळ तीन पथक तयार करून त्याचा शोध घेण्यासाठी रवाना करण्यात आले. रात्री उशिरा एका पथकाने सूरजला मुलांसह पकडले. सांगण्यात येते की, काही दिवसांपूर्वी राखी घरून बेपत्ता झाली होती. सूरजने ती बेपत्ता असल्याची तक्रारही दाखल केली होती. काही दिवसांपूर्वीच ती घरी परतली होती.

# कारच्या धडकेत चिमुकलीसह दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी

नागपूर, दि. १० :

विविध घटनांमध्ये कार चालकांच्या निष्काळजीपणामुळे एका चिमुकलीसह मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या वृद्धाचा नाहक बळी गेला. दोन्ही घटना कोराडी पोलिस ठाण्यांतर्गत घडल्या. पहिल्या घटनेत कारचालकाने निष्काळजीपणे वाहन मागे घेऊन परिसरात खेळत असलेल्या एका मुलीला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी मुलीची काही क्षणातच प्राणज्योत मालवली. साधना अरुण उईके (2) असे मृत चिमुकलीचे नाव आहे.

उईके कुटुंब मुळचे मध्यप्रदेशातील शिवनी येथील रहिवासी आहे. काही महिन्यांपूर्वीच अरुण उईके हे पत्नी व दोन मुलींना घेऊन रोजगाराच्या शोधात नागपुरात आले होते. कोराडी परिसरात कमल आणि संजू इमलेच्या विटाभट्टीत पती-पत्नीला काम मिळाले. विट्टाभट्टी परिसरातच एका झोपडीत उईके कुटुंब रहात होते. दुपारी 2 वाजताच्या सुमारास अरुण आणि त्यांची पत्नी भट्टी काम करीत होते.

मोठी मुलगी घरातच होती, तर साधना आवारात खेळत होती. या दरम्यान इमलेच्या कार क्र. एमएच-49/सीडी-9971 चा चालक राजेश हरकू (35) याने निष्काळजीपणे वाहन मागे घेतले. साधना कारच्या मागेच खेळत होती. वाहन वेगाने मागे आल्याने साधनाच्या डोक्याला जबर धडक लागली. ती बेशुद्ध होऊन खाली कोसळली. साधनाला तत्काळ उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.




# मराठी शाळेच्या उन्नतीसाठी कटिबध्द : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

भारताची वैश्विक प्रगती होईल. या शाळेची कारकीर्द मला माज्या विद्यार्थी दशेपासूनच माहिती आहे. लोकांची शाळा ही शहरातील एक नामांकित शाळा असून या शाळेने अनेक विद्यार्थी घडवले आहे.

या शाळेच्या प्रगती करिता मी सवोतोपरी सहकार्य करून शासन स्तरावरील आवश्यक ती सर्व मदत करण्यास तयार असल्याचे प्रतिपादन लोकशिक्षण संस्था संचालित लोकांची शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील स्नेह संमेलन प्रसंगी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. उद्घाटक डॉ. अस्मिता पाटील यांनी मराठी शाळांच्या दुरावस्थेचा प्रश्न उपस्थित करीत विद्यार्थ्यांच्या जडण



घडणीत मराठी शाळांचा मोलाचा वाटा असल्याचे सांगितले. यावेळी व्यापीठावर लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभूजी देशपांडे, उपाध्यक्ष डॉ वि स जोग, सचिव मनोहर ढोक, कोषाध्यक्ष शामकांत पुसदकर शाळेच्या प्राचार्या रजनी राजुरकर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी जागर लोककलेचा हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या प्रसंगी दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोहर ढोक व अहवाल वाचन हर्षिता काळे यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी मोहन देशपांडे, जयश्री देशपांडे, डॉ भारती सुदामे, डॉ विजय घुगे, माधुरी पंडित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका माला केचे, फुलोरा विभाग प्रमुख दीप्ती टेकाडे, पर्यवेक्षक श्रीकांत देशमुख, कला विकास मंडळ अध्यक्ष आशिष टेंभेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.स्वाती मोहरीर व आभार प्रदर्शन रजनी राजुरकर यांनी केले.

यांप्रसंगी कार्यक्रमाला लोकशिक्षण संस्थेचे आजी माजी सदस्य, शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# जीवन गौरव पुरस्कार आणि माँ संस्कार पुरस्काराने चंद्रशेखर अरगुलेवार सन्मानित




■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. १० :

असे म्हणतात देव देतो तर छप्पर फाडून देते. कुठेतरी चांगल्या कामाचे चांगले कार्याचा सन्मान होतो. अरगुलेवार यांनी या ७ वर्षात हे सिद्ध केले आहे, त्यांच्या कायार्चा राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रतिध्वनी होत आहे, तेजस संस्थेच्या कायार्चा प्रतिध्वनी आहे, आम्हालाही अभिमान आहे, आमच्या जिल्ह्यात एक अशी व्यक्ती आहे.

ज्याच्या छोट्याशा घरात हजारो पुरस्कार आहेत. त्यांना मिळालेल्या पुरस्काराचे श्रेय ते त्यांचे आई-वडील, त्यांना खांद्याला खांदा लावून साथ देणाऱ्या पत्नी कुटुंब, तेजस संस्थेचे दानशूर, पत्रकार, डॉक्टर, अधिवक्ता, संस्थेचे मित्र यांना देत आहे.

म्हणूनच वर्षाच्या शेवटी, २९ डिसेंबर २०२४ रोजी रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या वतीने संस्थापक/दिग्दर्शिका/लेखक क्रांती महाजन यांच्या संस्थेतर्फे जीवन गौरव पुरस्कार व नवीन वर्षाचे पहिल्याच दिवशीच, चैतन्य जनता सामाजिक सुरक्षा कल्याणकारी संस्था (फैजाने ताजुल औलिया वृद्धाश्रम) च्या वतीने १ जानेवारी २०२५ रोजी, महत्त्वाच्या व्यक्तींच्या उपस्थितीत, वृद्धाश्रमाचे संचालक, मौलाना इरशाद पठान यांनी माँ संस्कार गौरव पुरस्कार इरशाद पठाण, चैतन्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा सुनीता ठाकरे, उपाध्यक्ष हाफिज साबरी यांच्या हस्ते अरगुलेवार यांचा गौरव करण्यात आला.

अरगुलेवार यांच्या सोबतच त्यांच्या सहकारी मित्रांचाही सन्मान करण्यात येत आहे, २९/१२/२०२४ रोजी अरगुलेवार च्या बरोबर एम ए जब्बार यांना रेडियंट टेलेंट बुक ऑफ रिकार्ड द्वारे सन्मानित केले आणि १/१/२०२५रोजी मिसबाह रहमान यांना देखील चैतन्य सामाजिक संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले.

# भाजपा वाडी मंडळा तर्फे सदस्यता अभियान



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

भाजपावाडी मंडळाच्या वतीने बुथ क्र.९६,९७,९८,९९ येथे सदस्यता अभियान २०२४ बुधवार ८ जानेवारीपासून सुरू करण्यात आले. ८८००००२०२४ या क्रमांकावर मिस कॉल देवून भाजपाचे प्राथमिक सदस्य ऑनलाईन बनविण्यात आले संपूर्ण देशभर हे अभियान सुरू आहे महाराष्ट्रात दीड कोटी सदस्य बनविण्याचे लक्ष ठरविले आहे.

तर नागपुर जिल्ह्यात पाच लाख सदस्य बनविण्याचे लक्ष ठरविले आहे. संपूर्ण जिल्ह्याच्या ठिकानी हे अभियान कार्यकर्त्यांतर्फे राबविण्यात येत आहे वाडी मंडळात १५४ बुथवर हे अभियान सुरू आहे. प्रत्येक बुथवर २०० सदस्य बनविण्याचे लक्ष ठरविले आहे.

यावेळी भाजपा वाडी मंडळ अध्यक्ष आनंदबाबु कदम, प्रफुल्ल गिरी, बंटी गोडे, रोहित तिवारी, दत्ता बाबर, लिलाधर भोयर, रोहित अग्रवाल,भिमराव धाडसे, गणपत वसाके, महेन्द्र देशमुख, विक्की चौधरी, मंगला पडोळे, नंदा कदम, सोनाली देशमुख, कविता ढेरकर, सरीता लिल्हारे, छाया बाबर, वृषाली ढेरकर, सिमा चौधरी, लता बाबर, मजुशा राजुरकर पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद, ज्येष्ठ नागरिक मंडळ धंतोली, नागरी सेवा मंच धंतोली, कलासंगम रेशीमबाग, भाग्यश्री फिल्म अँड डान्स ड्रामा अकॅडमी आणि छंद सम्राट मित्र मंडळ यांच्या संयुक्त सहभागाने आयोजित, राष्ट्रीय ग्राहक दिन च्या निमित्याने ग्राहक जागृती चा कार्यक्रम, अभ्यंकर स्मारक ट्रस्ट, धंतोली, नागपूर येथे, ग्राहक कार्यकर्ते आणि नागपूरकर नागरिक यांच्या मोठ्या उपस्थितीत, उत्स्फूर्त-साजरा झाला.

राज्य ग्राहक आयोगाच्या सदस्या, कल्याणी कापसे, शैला वांढरे तसेच, जिल्हा ग्राहक आयोग अध्यक्ष, सचिन शिंपी, सतीश सप्रे आणि मिलिंद केदार आणि शितल पेटकर व जिल्हा ग्राहक आयोगाच्या माजी सदस्या चंद्रिका बैस यांनी, ग्राहकांचे उद्बोधन आणि मार्गदर्शन केले. तसेच, वेट अँड मेजरमेंटचे विभागीय आयुक्त पी.एम.बिरादर यांनी ग्राहकांची वजन-मापामध्ये, बाजारात होणाऱ्या दिशाभूलचे प्रात्यक्षिक दाखवून,माहिती दिली. यावेळेस, प्रोटेक्शन ऑफ सिविल राइट्स विंगचे पोलिस उपायुक्त, डॉ. अशोक बागुल यांनी, सायबर क्राईम आणि होणाऱ्या विविध फसवणुकीचे प्रकार सांगून त्यासंबंधीच्या दक्षता व ग्राहकांनी घ्यावायच्या दक्षता तसेच नागरी कर्तव्ये यावर मार्गदर्शन केले. अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषदेचे राष्ट्रीय सचिव,देवेंद्र तिवारी, ज्येष्ठ नागरिक मंडळ धंतोलीचे सचिव यशवंत खरे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. याप्रसंगी जेष्ठ नागरिक विनायक घारे व भाग्यश्री कला आणि नाट्य अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संजीवनी चौधरी यांनी ग्राहक गीत आणि पथनाट्यचे सादरीकरण केले.

ग्राहक-सेवक आणि ग्राहक कल्याण परिषदेचे विदर्भ विभागाचे कार्याध्यक्ष, मिलिंद खेकाळे यांनी, कार्यक्रमाचे संचालन तर, नागरीसेवा मंच धंतोलीचे अध्यक्ष, उमेश गोखले यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कलासंगमह्न रेशीमबागचे सचिव संदीप वाघ, छंद सम्राट मित्र मंडळचे अध्यक्ष दिलीप डहाके, ग्राहक कल्याण परिषदेचे गडचिरोली पदाधिकारी माधुरी केदार आणि कार्यकर्ते, या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या १५ गोवंशांची सुटका

**नागपूर** : सदर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर गड्डीगोदाम परिसरात धाड टाकून कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या 15 गोवंशांची सुटका केली. पोलिसांनी तीन जणांवर गुन्हा नोंदवून त्यांचा शोध सुरू केला आहे. निजीम कुरेशी, साबीर कुरेशी आणि नासिर कुरेशी तिन्ही रा. कसाई मोहल्ला, गड्डीगोदाम अशी आरोपींची नावे आहेत. गड्डीगोदाम परिसरातील लाल शाळेजवळ वरील आरोपींनी गोवंशांना कत्तलीसाठी निर्दयतापूर्वक बांधून ठेवले असून त्यांना चारा आणि पाण्याचीही व्यवस्था केली नसल्याची माहिती बुधवारी सकाळी पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंचासह तेथे धाड टाकली. झडतीमध्ये 15 गोवंश आढळून आली. मात्र आरोपी पोलिसांच्या हाती लागले नाही.

# माधव नेत्रालयाच्या वतीने सायकलिंग मॅरेथॉनचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

माधव नेत्रालयाच्या वतीने शनिवार, ११ जानेवारी रोजी रश २४ टाइम ट्रायल सायकलिंग चॅलेंजचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सायकलस्वार डॉ. अमित समर्थ यांनी पत्रपरिषदेत दिली.

यावेळी माधव नेत्रालयाचे संचालक सुधाकर गोखले, कार्यकारणी सदस्य संदीप धर्माधिकारी, दिलीप वर्कंड आदी उपस्थित होते. प्रसिध्द सायकलस्वार डॉ. समर्थ हे स्वतः चोवीस तास सायकलिंग भाग घेणार आहेत. दरम्यानच्या काळात अर्धा तासाचा ब्रेक घेतील. २४ टाइम ट्रायल सायकलिंग चॅलेंज स्पर्धेत २५ स्पर्धक भाग घेणार आहे. ही स्पर्धा २४ तास, १२ तास आणि ६ तासांची सायकलिंग मॅरेथॉन घेतल्या जाणार आहेत. माधव नेत्रालयाच्या मिशनला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सायकलपटू आणि माधव नेत्रालयाचे ब्रँड डॉ. अमित समर्थ यांनी चोवीस तासात जवळपास ७०० किलोमीटरहून अधिक अंतर कापण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी सावनेर मार्गावरील रस्त्यांची निवड करण्यात आली आहे. सायकल चालविण्यासारखा दुसरा व्यायाम नाही. स्पर्धेच्या माध्यमातून ७ लाख रुपयांचा निधी गोळा होण्याची आशा सुधाकर गोखले यांनी व्यक्त केली आहे.

# ग्रंथ दिंडीतून तिडके महाविद्यालयाचा वाचन संकल्प जागर

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १० :

सध्याच्या धावपळीच्या काळात स्थिर शाश्वत जीवन जगता यावे यासाठी वाचन आवश्यक आहे या हेतूने श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथील राष्ट्रीय छात्र सैनिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी संस्कृत विद्यापीठ आयोजित अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून नवीन वर्षाच्या पर्वावर दिनांक ०१ ते १५ जानेवारी २०२५ या पंधरवड्यात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यानिमित्ताने कवी कालिदास संस्कृत विद्यापीठातील ग्रंथालय विभागामार्फत रामटेक नगरातील सगळ्या शाळा व महाविद्यालयीन वाचनप्रेमी, विद्यार्थी, प्राध्यापक, लेखक आणि साहित्यिक आदींचा




सहभागातून वाचन संस्कृतीचा विकास व्हावा या उद्देशाने भव्य ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या ग्रंथदिंडीचे उद्घाटन कुलगुरू हरेराम त्रिपाठी यांच्या विशेष उपस्थितीत सन्माननीय राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते संपन्न झाले.ही ग्रंथदिंडी कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ ते रामटेक बस स्थानकापर्यंत नियोजित होती. टाळ, मृदुंग, लेझीम आणि भक्ती गीताच्या गजरात दिंडी काढण्यात आली व परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कार रुजावे म्हणून ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करण्यात आली.

याप्रसंगी तिडके महाविद्यालयाचे प्रा. गजानन रेवतकर आणि प्रा. संतोष जाधव यांनी सुद्धा दिंडीत सहभाग घेतला यानिमित्ताने कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक वाचन संकल्प महाराष्ट्र उपक्रमाची नांदी ठरली.

# गोरेवाड्यात खबरदारीच्या उपाययोजना करा

## केंद्रीय पशु संवर्धन आयुक्तांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

गोरेवाडा प्राणी संग्रहालयात तीन वाघ आणि एका बिबट्याचा बर्ड फ्लूने मृत्यू झाला होता. आता इतर प्राण्यांना त्या वायरसची लागण होऊ नये, यासाठी केंद्रीय पशुसंवर्धन विभागाकडून काही मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत. भोपाळ येथील लॅबमधून गोरेवाड्यातील प्राण्यांच्या मृत्यूबाबतचे कारण स्पष्ट झाल्यानंतर हे निर्देश देण्यात आले आहेत. यात सांगितले आहे की, ज्या प्राण्यांना आजाराची काही लक्षणे दिसतील त्यांना विलगिकरणात ठेवण्यात यावे. जर प्राणी संग्रहालयातील अधिकाधिक प्राण्यांना विशिष्ट आजाराची लागण झाली असेल तर सामान्य नागरिकांसाठी प्राणी संग्रहालय तात्पुरते बंद करावे. तसेच तेथे आवश्यक त्या सुरक्षेत वाढ करावी. ज्या भागात लागण झालेल्या प्राण्यांना ठेवले असेल त्याठिकाणी जंतूनाशकाची फवारणी करावी. लागण झालेल्या प्राण्यांच्या नाकातील द्रवाचे आणि लाळेचे नमूने घेऊन तपासणीसाठी पाठवावे. एखाद्या प्राण्याचा मृत्यू झाला असल्यास त्याबाबतची माहिती संबंधित विभागाला ताबडतोब द्यावी.

प्राणीसंग्रहालयातील इतर प्राण्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे. त्यांच्या हालचाली असामान्य आढळल्यास त्यांची त्वरित तपासणी करावी. प्राणी संग्रहालयातील सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी खबरदारीच्या उपाययोजना कराव्या. त्यांना सर्व साधनांची उपलब्धता करून द्यावी, असे निर्देश केंद्रीय पशु संवर्धन आयुक्त अभिजीत मित्रा यांनी महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत.

# ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफ बेतुलने हरवलेला बॅग प्राप्त करून दिला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

9 जानेवारी 2025 रोजी रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) बेतुलने एक प्रवाशाचे हरवलेले बॅकपॅक यशस्वीपणे परत केले. हा प्रकार आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमता आणि समर्पणाचे उदाहरण ठरतो, जे ऑपरेशन अमानत या उपक्रमांतर्गत प्रवाशांची हरवलेली वस्तू परत करण्यासाठी प्रतिबद्ध आहेत. 8 जानेवारी 2025 सायंकाळी, नागपूर डिव्हिजनल सिक्युरिटी कंट्रोल रूम कडे ट्रेन क्रमांक 12804 च्या कोच र1 मध्ये बर्थ नंबर 73 आणि 75 वर एक ग्रे रंगाचा बॅकपॅक विसरला असल्याची माहिती 5:50 ढट ला प्राप्त झाली. तत्परतेने, उप-निरीक्षक सचिन सोनुले यांनी कांस्टेबल अनिल टेकम यांना बेतुल स्टेशनवर ट्रेन आगमनानंतर कोच तपासण्याचे निर्देश दिले. कांस्टेबल टेकम यांनी बॅकपॅक शोधून आरपीएफ बेतुल पोस्टवर सुरक्षित ठेवला. त्याचवेळी प्रवाशाशी संपर्क साधण्याचे आणि ऊउफला बॅगच्या पुनर्प्राप्तीबद्दल माहिती देण्याचे प्रयत्न केले. दुसऱ्या दिवशी, जो प्रवासी राणी लक्ष्मीबाई जंक्शनवरून भोपालला जात होते, ते आरपीएफ बेतुल पोस्टवर आले आणि बॅग परत घेतली. प्रवाश्याने सांगितले की, ट्रेनमध्ये एका कुटुंबातील सदस्याला वैद्यकीय उपचारासाठी उतरण्यात मदत करत असताना, तो अनवधानाने बॅग विसरला होता. त्या बॅकमध्ये वैद्यकीय उपचाराशी संबंधित महत्त्वाची फाइल्स, दोन शॉल, दोन जोड्या दस्ताने, मोबाइल चार्जर आणि जुने कपडे होते, ज्यांची एकूण किंमत 2,500 होती. सर्व तपासणी आणि कायदेशीर औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर डी.के. देशमुख यांनी दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत वस्तू प्रवाशाला परत दिल्या.




# सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा : अनिल वाळके

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी महाराष्ट्र शासन विविध योजना राबवित असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा तसेच सामाजिक न्याय विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या बार्टी संस्थेच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण राबविण्यात येत असून या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे मत अध्यक्षस्थानावरुन महिला हक्क जाणीव जागृती पर्वाच्या निमित्ताने अनिल वाळके यांनी केले.

समता बुद्ध विहार,नंदनवन,नागपूर येथे बार्टी प्रादेशिक कार्यालय नागपूर व जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण नागपूरच्या संयुक्त विद्यमाने महिला हक्क जाणीव जागृती पर्वाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन




करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सदस्य ॲड.सुरेखा बोरकुटे, मनीष बारापात्रे, सेवानिवृत्त खंड विकास अधिकारी व स्त्रीभूषण रमाई आंबेडकर संस्थेचे अध्यक्ष राजकुमार वंजारी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व संविधान उद्देशपत्रिका वाचनाने करण्यात आली.

प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी सलमान शेख यांनी केले. संचालन सहाय्यक प्रकल्प अधिकारी सरिता महाजन यांनी तर आभार राजकुमार वंजारी यांनी मानले. भारतीय संविधान व त्याचे महत्व प्रकल्प अधिकारी शीतल गडलिंग यांनी सांगितले. प्रकल्प अधिकारी तुषार सुर्यवंशी यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाऊ यांचा इतिहास व आजचे वर्तमान, बार्टीचे प्रशिक्षण व इतर योजना बाबत माहीती दिली. सुरेखा बोरकुटे यांनी कायदेविषयक तर मनिष बारापात्रे यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

# वाडीत श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १० :

दत्तवाडीतील गजानन सोसायटी मधील श्री संत गजानन महाराज व श्री विठ्ठल रुख्मिनी मंदीरात श्री संताजी मंडळ वाडी, डिफेन्स यांच्या वतीने श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव रविवार ५ जानेवारी रोजी मंडळाचे अध्यक्ष चंद्रशेखर येनुरकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणी पदाधिकारी सचिन थोराणे, सुमित चाफले, भारत केवटे, विजय नासरे, लक्ष्मण आकरे, सुरज गिरडकर, संजय बेलखोडे, प्रकाश घाटोळे, पुरुषोत्तम इखार, निळकंठ कोचे, अरविंद निरगुळकर, अविनाश सालनकर, शरद साखरकर, उमेश गोमासे, सुभाष पडोळे, सुधीर कल्हाणे, विनायक रागीट यांच्या सहकार्याने महोत्सव पार पडला.



ह.भ.प. प्रभाकर महाराज केदार यांचे काल्याचे भजन व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी दहावी व बारावीत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच डॉ. मोहित प्रकाश घाटोळे यांनी एम. बी. बी. एस. पाठ्यक्रम उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

ह.भ.प. प्रभाकर महाराज केदार यांचे काल्याचे भजन व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

संचालन संताजी मंडळाचे सचिव सचिन थोराणे यांनी तर आभार सुमित चाफले यांनी मानले. यावेळी पुरुषोत्तम रागीट, मदनकर, राजेश थोराणे, शैलेश थोराणे, प्रशांत बुटले, पुरुषोत्तम लिचडे, चंद्रशेखर येनुरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ९२ प्रकरणांची नोंद






## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,
**नागपूर, दि. ९ :** नागपूर महानगर पालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फ्फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. शुक्रवार (१०) रोजी शोध पथकाने ९२ प्रकरणांची नोंद करून ५१,६००/-रुपयाचा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी रस्ता फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी थुंकणे (रु. २००/ दंड) या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून २०० रुपयांची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल, पानठेले, फ्फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत २१ प्रकरणांची नोंद करून ८,४००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फ्फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ६ प्रकरणांची नोंद करून ६०० रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फ्फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/दंड) या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून ८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून ४,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ४३ प्रकरणांची नोंद करून २७,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्याचा कचरा रस्ता, फ्फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून २,०००/रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फ्फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ३००० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ८ प्रकरणांची नोंद करून १,६००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ४ प्रकरणांची नोंद करून ४,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. मेड प्लस यांनी रस्त्यावरील कचरा आणि सांडपाणी टाकल्याबद्दल रू. ५,०००/हजार रुपयांचा दंड वसुल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. फ्फॉरर्च्यूनर इन्फ्फ्रास्ट्रक्चर यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्या कडेला टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. धंतोली झोन अंतर्गत मे. द अचिएव्हर्स स्कूल यांनी मनपा यांच्या विरूध्द विनापरवानगीशिवाय जवळच्या रस्त्याच्या कडेला बॅनर होर्डिंगचे प्रदर्शन केल्याबद्दल ५,०००/हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. नेहरू नगर झोन अंतर्गत मे. व्यंकटेश ग्लोरी यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. उदय किराणा स्टोअर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. आशीनगर झोन अंतर्गत मे. रवि टेड्रर्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. उपद्रव शोध पथकाने ६ प्रकरणांची नोंद करून रू. ४०,०००/-दंड वसूल केला.

# चैतन्येश्वर विद्यालय तारणा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**कुही :** नैसर्गिक सृष्टी सौंदर्याने वेढलेल्या तारणा येथील चैतन्येश्वर विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची मोठी जय्यत तयारी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने कार्यक्रमाअंतर्गत क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि आपली कला व कौशल्ये सादर केली. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच पराग तळेकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी माजी मुख्याध्यापक रवींद्र बाभरे यांनी भूषविले. मंचकावर प्रमुख अतिथी सहारकार सर, उपसरपंच दुर्गा गूबरे, ग्रा. पं. सदस्य प्रेमलता तांबे, ऊर्मिला चादुरकर, विलास वरेकर, दिनेश चक्रधरे उपस्थित होते.

सर्वप्रथम सरस्वतीच्या प्रतिमेला माल्यार्पण व पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक पंकज तळेकर यांनी प्रास्ताविक व अहवाल वाचन केले. त्यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक व्यक्त केले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते, नाट्य सादरीकरण, वेशभूषा स्पर्धा यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवून उपस्थितांचे मने जिंकली. क्रीडामहोत्सवात विद्यार्थ्यांनी मैदानी आणि इनडोअर खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी दाखवली. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाला नेहमीप्रमाणे गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आणि उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या कला व कौशल्याचे कौतुक केले. चैतन्येश्वर विद्यालयाने अशा प्रकारे एक आदर्श स्नेहसंमेलन साजरे करत शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन स्नेहा चंदनखेडे, आभारप्रदर्शन टेंभरे सर यांनी केले.

# इंदिराबाई भोसले महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती




**कुही :** राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयात आद्य स्त्री शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध ऊपक्रमाचे आयोजन करीत साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागांतर्गत जयंती दिनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सावित्रीबाई यांचे प्रतिमेला माल्यार्पण व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. मंचावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन मांडेकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.सारीका गावंडे होत्या. मंचावर डॉ कटमुसरे डॉ मिनाक्षी झाडे यांची विशेष ऊपस्थीती होती. नविन शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचा आधार घेत विद्यार्थ्यांसाठी प्रश्न मंजुषा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेत ऊत्तम सहभाग घेत विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वाची ओळख दिली. आयोजित वक्तृत्व स्पर्धेत रूचिका दूधपचारे, हर्षदा क्षीरसागर, योगेश्वरी देशमुख व मिनाक्षी भिवणकर यांनी सावित्रीबाईच्या जीवनकार्याची ओळख करुन दिली. प्रश्न मंजूशेत समुहाने विद्यार्थ्यांनींनी सहभाग नोंदवीला. परीक्षक म्हणून प्रा.शेबे, प्रा.मंजुशा पिसे/पडोळे यांनी काम केले. मार्गदर्शन करतांना प्रा.सारीका गावंडे यांनी अत्यंत कडवे आव्हान व टोकाच्या प्रतिकुल परस्थीतीमधे सामाजिक व शैक्षणिक कार्य केलेल्या सावित्रीबाई भारतीय स्त्री विश्वाच्या खऱ्या ऊध्दारक होत, त्यांची जिद्द व ध्येयशिलता आपण अंगीकारायला पाहिजे व शिक्षणाच्या मिळालेल्या संधीचे सोने करायला पाहिजे. असे ऊपस्थीत विद्यार्थ्यांना ऊद्देशून त्या म्हणाल्या. यावेळी डॉ लामखेडे, डॉ केने, डॉ करंभे, यांची ऊपस्थीती होती. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रा.स्नेहल खेडीकर यांचेसह विजय देशमुख, संजय टेकाम, भरत वानखडे, टेकेश्वर देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु श्रुती तलवारे तर आभारप्रदर्शन हर्षदा क्षीरसागर हिने मानले. राष्ट्र गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# हडस ची छात्रसैनिक दिता आकनुरवार ठरली विदर्भातून प्रथम

**हिंगणा :** जनजाती गौरव गाथा प्रश्नमंजुषा स्पर्धेचा निकाल जाहीर

विदर्भ जनजाती कल्याण आश्रम, नागपूर महानगर व वनगुंजन प्रकाशन, नागपूर द्वारा आयोजित जनजाती गौरव गाथा भाग -२, आंतरशालेय प्रश्न मंजुषा स्पर्धा -२०२४ मध्ये हडस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, रामदास पेठ, नागपूर मधील वर्ग ८ ची विद्यार्थिनी व टू महाराष्ट्र सिग्नल कंपनीची प्रथम वर्षाची छात्रसैनिक कुमारी दिता आकनूरवार हिने सलग दुसऱ्या वर्षी विदर्भातून प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावले. विदर्भ जनजाती कल्याण आश्रम, नागपूर महानगराचे अध्यक्ष डॉक्टर शेरील पडोळे ,सचिव पंकज पत्की, आयाम प्रमुख वैशाली बोपर्डीकर यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करताना कुमारी दिता हिला अकरा हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे बक्षीस प्रदान केले. सदर स्पर्धेत विदर्भातील ९० शाळांमधील १५००० विद्यार्थ्यांचा सहभाग होता याच स्पर्धेत तृतीय क्रमांकाची मानकरी कुमारी वर्ग ९ ची विद्यार्थिनी मृणाली पाटील ही ठरली हिला ५००० रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त झाले. विदर्भ जनजाती कल्याण आश्रम द्वारा उत्कृष्ट सहभागासाठी हडस विद्यालयाच्या प्राचार्या जयश्री उदय रानडे यांना सुद्धा स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

सहभागी विद्यार्थ्यांचे पर्यवेक्षक अजय लाबडे यांनी प्रमाणपत्र प्रदान करून अभिनंदन केले. सदर प्रश्नमंजुषा स्पर्धेतील विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षिका रूपाली निंबाळकर व प्रियंका पुनसे यांनी मार्गदर्शन केले. विदर्भ स्तरीय स्पर्धेत शाळेतील विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ ए.पी. जोशी, सचिव निलेश साठे यांच्यासह २ महाराष्ट्र सिग्नल कंपनी , एनसीसी चे कमांडिंग ऑफिसर कर्नल अंकुर भटनागर, चीफ्फ ऑफिसर डॉ. सुशील सोपानराव वंजारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांसह सहभागी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# नागपूर शहरातील अट्टल वाहनचोर हिंगणा पोलिसांच्या जाळ्यात...



■ महासागर प्रतिनिधी,
**हिंगणा, दि. ९ :** नागपूर शहरातील विविध भागात घरफ्फोडी, चोरी व वाहन चोरी करणा ?्या अट्टल आरोपीला आज हिंगणा पोलिसांनी अटक केली. नितीन दिलीप रेवडीया वय३५)रा.कीर्ती नगर, नरसाळा रोड नागपूर असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून एक हिरो होंडा स्प्लेंडर एम एच४० बी एक्स ९९०६ ,एक होंडा कंपनीची कथ्थ्या रंगाची शाईन मोटरसायकल क्र एम एच २९ ए बी १६०१ , सुझुकी कंपनीची सिल्वर रंगाची एसेस मोपेड एम एच ४० बी एच ९१९५ या तीन दुचाकी व एक अँड्रॉइड मोबाईल फ्फोन असा एकूण १५५००० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. त्याने ही वाहने कॅन्सर हॉस्पिटल, मोंढा व सहारा सिटी भागातून चोरी केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे. १ जानेवारीला मिहान परिसरात मोटरसायकल चा अपघात झाला होता. तिथे जमलेल्या नागरिकांनी जखमीला उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. त्याची स्पलेंडर मोटरसायकल रस्त्याच्या कडेला उभी केली होती. तेथून आरोपीने ही दुचाकी उचलून नेली. अश्याच प्रकारे चोरी केलेल्या दुचाकी तो मिहान परिसरालगत एका पडक्या झोपडीत लपवून ठेवत होता. हिंगणा पोलीस अपघातातील मोटरसायकल चा शोध घेत असताना सदर आरोपी दररोज नवीन नवीन दुचाकी घेऊन इकडे फिरत असल्याची गुप्त माहिती मिळाली.

त्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आज आरोपीला अटक केली. नितीन हा सराईत चोर नागपूर शहरातील ब ?्याच पोलीस ठाण्यात त्याच्यावर चोरी, घरफ्फोडी चे १५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध अप. क्र. ०७/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं.* गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु केला आहे.हिंगण्याचे जितेंद्र बोबडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक संतोष राठोड ,हवालदार नागेश्वर दासरवार , नंदकिशोर रडखे , अनिल झाडें यांनी ही कामगिरी केली

# मंत्री आशिष जयस्वाल यांनी घेतला आदिवासी बहुल भागातील विकास कामाचा आढावा

## विविध विकास कामांचे भूमिपूजन संपन्न



■ महासागर प्रतिनिधी,
**रामटेक, दि. ९ :** विकास कामांमध्ये आघाडीवर असलेले रामटेक विधानसभा मतदारसंघाचे आमदार ?ड. आशिष जयस्वाल यांच्या कार्याची दखल घेत शिवसेने राज्यमंत्री पदी नियुक्ती केली. त्यांच्याकडे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधि व न्याय, कामगार, या खात्याचा पदभार देण्यांत आला आहे.

हा पदभार स्वीकारताच आमदार जयस्वाल यांनी रामटेक विधानसभा मतदारसंघातील आदिवासी बहुल भागातील उमरी-बोथियपालोरा व वडंबा-पथरई जिल्हा परिषद सर्कलमध्ये भुमिपुजन, विकास कामाची पाहणी व दौरा आयोजीत केला. दिनांक (१० जानेवारी) रोजी हा दौरा संपन्न झाला.यात देवलापार, मौदी,पवनी, चारगाव, हिवरा, पथरई, शहापूर, जमुनिया, मोहगाव, घोटी, पिपरिया, खापा, झिंझेरिया, डोंगरताल, वडांबा, कामठी, कडबीखेडा, उसरीपार, सावरा, बांद्रा, करवाही,लोधा, सितापार,पिंडकापार, बेलदा, खनोरा, टुयापार, अकोला, तुमडीटोला, हिवराबाजार गावांना मंत्री जयस्वाल यांनी भेट दिली.

या दौ ?्या दरम्यान देवलापार दुर्गा मंदिर येथे पुजा करून या दौ ?्याची सुरूवात झाली.

तर मौदी चारगाव पुलासह पोच रस्ता भुमिपुजन, हिवरा वथरई पोच रस्त्यावरील पुलाचे भुमिपुजन,पथरई बंजार रस्त्याचे भुमिपुजन,पथरई गावाला पुलासह बांधकाम भुमिपुजन,शहापूर पोच मार्ग रस्त्याचे भुमिपुजन,जमुनिया मोहगाव रीठी रोड बांधकामाचे भूमिपुजन,घोटी जि.प. शाळेजवळ भेट,पिपरीया येथे भेट,वनविभाग अमलतास सिल्लारी येथे मिटींग, खापा टी-पॉईंजवळ, खापा झिंझेरीया रस्त्याचे भूमिपुजन, झिंझेरीया येथे भेट,डॉगरताल कट्टा रस्ता पाहणे,वडंबा येथे भेट,कामठी मार्गे कडबिखेडा येथे कडबी खेडा डोंगरताल रस्त्याचे पाहनी करणे, उसरीपार उसरीपार टोला फॉरेस्ट गेट पर्यंत रस्त्याचे भुमिपुजन,उसरीपार सावरा रोडवरील पुलाचे पाहनी करणे, भुमिपुजन, सावरा ते कामठी रस्त्याचे पाहणी करणे, बांद्रा येथे भेट,करवाही मरार टोला रोड व खंडासा रोड पाहणी करणे,लोधा पांदन रस्ता पाहणी करणे,सितापार येथे भेट, पिंडकापार येथे भेट, बेलदा पुलाचे बांधकाम पाहने,खनोरा, खनोरा टुयापार रोड पाहणी करणे, अकोला येथे रस्त्याची पाहणी करणे, हिवरा बाजार येथे भेट, तुमडीटोला येथे पुलाची पाहणी करण्यात आली.

चालू असलेल्या सर्व कामांची पाणी करून सर्व काम दर्जेदार व लवकरात लवकर करण्यात यावें अशा सूचना संबंधित अधिका ?्यांना देण्यांत आल्या. यावेळी ग्रामस्थांनी मंत्री जयस्वाल यांचे जागोजागी भव्य दिव्य स्वागत केले. तर या स्वागता प्रती मंत्री जयस्वाल यांनी आभार व्यक्त केले. यावेळी रामटेक शिवसेना तालुका प्रमुख विवेक तुरक,उपतालुका प्रमुख देवानंद वंजारी, युवासेना उपजिल्हा प्रमुख कमलेश शरणांगात, पंचायत समिती सभापती चंद्रकांत कोडवते, माजी सभापती संजय नेवारे, शिवा कोकोडे,रोमित गुप्ता, प्रितम गुप्ता,शेखर खंडाते,आकाश पंधरे, सिमी गुप्ता, रिजवान शेख,आकाश जयस्वाल , एकनाथ गोडबोले, अशोक जयस्वाल,ग्राम पंचायत वडांबा सरपंच मुकेश दुबे, ग्रा.पं.सालई सरपंच उत्तम धराडे, ग्रा.पं.वराघाट सरपंच देवराज इनवाते, ग्रा. पं. दाहोदा सरपंच वासनिक, ग्रा. पं. पिंडकापार लोधा सरपंच विलास उईके, ग्रा. पं. बांद्रा सरपंच कल्पना भलावी, कुंदन वैद्य, काशिनाथ मरसकोल्हे, चमन जयस्वाल, बंटी गुप्ता यांच्यासह वनविभाग, महसुल विभाग, सार्वजानिक बांधकाम विभाग,पोलिस प्रशासन विभाग, पंचायत समिती चे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शहरात सर्वत्र अतिक्रमण विरोधात धडक कारवाई मेयो हॉस्पिटल जवळ अतिक्रमणचा सफाया

■ महासागर प्रतिनिधी,
**नागपूर, दि. ९ :** नागपूर शहरातील अतिक्रमण हटविण्यासाठी मनपाद्वारे सुरु असलेल्या कारवाईला गती देण्यात आल्यांनतर शुक्रवारी (ता.१०)देखील पोलिस प्रशासनाच्या सहकार्याने विविध झोनमध्ये शुक्रवारी धडक कारवाई करण्यात आली.

प्रवर्तन विभागामार्फ्फत कारवाईत अनेक साहित्य जप्त करण्यात आले आहे. बांधकाम करण्यात आलेले अतिक्रमण पाडण्यात आले. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार प्रवर्तन विभागाद्वारे शहरात विविध ठिकाणी अतिक्रमण कारवाई केली जात आहे.

प्रवर्तन विभागातफ्र्फे शुक्रवारी (ता.१०) सकाळी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो हॉस्पिटल)जवळ मोठी कारवाई करण्यात आली. येथे तीन ठेले जप्त करण्यात आले आणि शेड तोडण्यात आले.

तर मंगळवारी झोनमध्ये जरीपटका येथील जिंजर माल येथे अतिक्रमण विभागातफ्र्फे १४ ठेले आणि दुकानाचे २ काउंटर जप्त करण्यात आले. याशिवाय ग्रामीण प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ)जवळ बुफ्फे टेबल, स्टूल, खुर्च्या व इतर साहित्य जप्त करण्यात आले. सायंकाळी जरीपटका येथील जिंजर माल येथे अतिक्रमण कारवाई करण्यात आली. सीताबर्डी येथे २ लोखंडी ट्रॉली, ३ लोखंडी स्टॅन्ड, ३ बोरे कपडे आणि एक मोठा काउंटर ठेला जप्त करण्यात आला. याशिवाय अतिक्रमण निर्मूलन पथकातर्फे कॅन्सर हॉस्पिटल येथे सायंकाळी कारवाई करण्यात आली.

अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त श्री. हरीश राऊत यांच्या मार्गदशनात अतिक्रमण पथक प्रमुख श्री. भास्कर माळवे, श्री संजय कांबळे, श्री शहदाब खान, उपद्रव्य शोध पथक आणि पोलीस प्रशासन यांच्याद्वारे संयुक्तरित्या ही कारवाई करण्यात आली.

# एम.एस.एफ सुरक्षा रक्षकावर हल्ला आणि वाहन जाळणारे तीन आरोपी अटक

## कन्हान पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा पथकाने तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणला



■ महासागर प्रतिनिधी,
**कन्हान, दि. ९ :** नागपुर जिल्ह्यातील वेकोलि कामठी उपक्षेत्र अंतर्गत एकिकृत इंदर कामठी खुली कोळसा खदान परिसरात खाजगी सुरक्षा रक्षकावर हल्ला आणि सुरक्षा रक्षकांचे वाहन जाळणाऱ्या तीन हल्लेखोरांना कन्हान पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा पथकाने तासाच्या आत पकडुन गुन्हा उघडकीस आणला .

प्राप्त झालेल्या माहिती नुसार मंगळवार (दि.) जानेवारी ला रात्री ते वाजता च्या दरम्यान फिर्यादी प्रशांत सुधाकर सोनेकर (वय ) रा.ओम नगर कोराडी आणि त्यांचे सहकारी प्रविण ठाकरे , विलास मापारी हे खाजगी चालक आशिष मेश्राम यांच्यासोबत वेकोलि खदान परिसरात महिंद्रा बोलेरो कॅम्पर चार चाकी वाहन क्रमांक एम एच सी एम ने पेट्रोलिंग करीत असतांना एका अनोळखी इसमाने त्याची गाडी थांबवून त्याची चाबी काढली .

दुसऱ्या बाजुने आलेल्या दोन इसमानी हातात तलवार घेवुन तुम लोगो को मार डालेंगे असे म्हणुन प्रशांत सोनेकर व त्याच्या सहकाऱ्यांवर जिवे मारण्याचा उद्देशाने हल्ला केला . प्रशांत सोनेकर व त्याचे सहकारी स्वतःचा जिव वाचवुन तेथुन निघुन गेले असता आरोपींनी सुरक्षा रक्षकांच्या वाहनाला आग लावली . प्रशांत सोनेकर व त्याचा सहकार्यांनी फायर ब्रिगेडच्या वाहनाने आग विजवली .

या प्रकरणी कन्हान पोलीस स्टेशन येथे अज्ञात आरोपी विरुद्ध कलम , , (एफ) , वि.एन.एस. तहत गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

सदर घटना गांभीर्याने घेत नागपुर ग्रामीण पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार , अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनात कन्हान उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड यांच्या आदेशाने कन्हान पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा पथकाने तासाच्या आत गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करीत आरोपीतांचा शोध घेतला .

या प्रकरणी पोलीसांनी आरोपी नामे आदित्य अखिलेश राय , वर्षे , रा खदान नंबर याला अटक केली असुन विधीसंघर्ष ग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे . सदर गुन्ह्याचा पुढील तपास कन्हान पोलीस करत आहे .

# वाडीत आजपासुन राष्ट्रीय स्तरावरील व्हॉलिबॉल स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी,
**वाडी, दि. ९ :** येथील गजानन सोसायटीच्या क्रीडा मैदानावर श्री बालाजी व्हॉलिबॉल असोसिएशनच्या वतीने शनिवार ११ जानेवारी व रविवार ११ जानेवारी रोजी राष्ट्रीय स्तरावरील व्हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन शनिवार ११ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता आमदार समीर मेघे यांच्या हस्ते होणार आहे.स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा, मध्य प्रदेश, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश आदी राज्यांतील संघ सहभागी होत आहेत.

बक्षीस वितरण रविवार १२ जानेवारी रोजी माजी मंत्री रमेश बंग, माजी आमदार गिरीश व्यास , न.प.वाडीचे मुख्याधिकारी संदीप बोरकर यांच्या उपस्थितीत होणार आहे. प्रथम विजेत्या संघाला ७१ हजार रुपये तर उपविजेत्या संघाला ५१ हजार रुपये, तिस ?्या स्थानावरील संघास २५ हजार रुपये आणि पाचव्या ते आठव्या क्रमांकाच्या संघांना प्रत्येकी ११ हजार रुपये आणि चषक व इतर विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. क्रीडा प्रेमींनी मोठ्या संख्येने स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक बालाजी व्हॉलिबॉल असोसिएशन अध्यक्ष विनोद बट्टू, सतीश जिंदल, राकेश मिश्रा, अशोक पंडित, नवीन शर्मा, चंदन सुथार, केशव बांदरे, मनोज शर्मा, संजय शर्मा, राजेंद्र चौहान आदींनी केले आहे.

# आपली बसच्या वाहकांना मिळणार किमान वेतन कायद्यानुसार पगार

## नागपूर मनपा आपली बस कंत्राटी कामगार संघाच्या मागणीवर आयुक्तांचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

नागपूर महानगरपालिकेच्या आपली बस परिवहन सेवेतील वाहकांचे वेतन आता किमान वेतन कायद्यानुसार होणार आहेत. यासंदर्भात नागपूर मनपा आपली बस कंत्राटी कामगार संघाद्वारे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांना निवेदन देण्यात आले. संघटनेच्या मागणीनुसार किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करुन वेतन देण्याबाबत चलो मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेडला आदेश देण्यात येणार असल्याबाबत यावेळी आयुक्तांनी संघटनेच्या शिष्टमंडळाला आश्वस्त केले.



नागपूर मनपा आपली बस कंत्राटी कामगार संघाचे अध्यक्ष नागेश सहारे, महासचिव कमलेश वानखेडे, सुमित चिमोटे, निलेश पौनीकर, विक्की चौधरी, प्रवीण नरवणे, संदेश डोंगरे, प्रवीण काटोले, सचिन वसू, अश्विन दोनाडकर, सागर मडके यांनी शुक्रवारी (१० जानेवारी) मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांची भेट घेतली व आपली बसच्या वाहकांना महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार वेतन देण्याची विनंती केली. १० ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य सरकारने कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हितासाठी व आपली बस मधील कर्मचाऱ्यांच्या पगार वाढीबद्दल अधिसूचना लागू केली होती. या अधिसूचनेनुसार आपली बसच्या चालक आणि वाहकांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे आवश्यक आहे. मात्र असे असूनही नागपूर महानगरपालिकेतील आपली बसच्या चालक व वाहकांच्या वेतनामध्ये वाढ झालेली नाही.

अधिसूचना जारी होऊन तीन महिन्यानंतरही मनपाद्वारे अंमलबजावणी न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करीत नागपूर मनपा आपली बस कंत्राटी कामगार संघाद्वारे आयुक्तांना निवेदन देण्यात आले. यावेळी मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी चालकांच्या वेतनाच्या संदर्भात कायदेशीर अभिप्राय (लिगल ओपिनियन) मागविण्यात आले असून त्यानंतरच पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले. मात्र वाहकांच्या वेतनासंदर्भात त्यांनी सकारात्मकता दर्शवित शासनाच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करुन किमान वेतन कायद्यानुसार वाहकांचे वेतन करण्याचे आदेश चलो मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेडला देत असल्याचे शिष्टमंडळाला सांगितले. मनपा आयुक्तांच्या या निर्णयाचे नागपूर मनपा आपली बस कंत्राटी कामगार संघाद्वारे स्वागत करण्यात आले. त्यांनी या विषयाकरिता सातत्याने पुढाकार घेऊन पाठपुरावा केल्याबद्दल आमदार प्रविण प्रवीण दटके यांचे आभार मानले.

कंत्राटी कामगार आणि आपली बसचे वाहक व चालकांच्या वेतनाच्या अनुषंगाने प्रविण दटके यांनी सातत्याने प्रश्न उपस्थित केले व मागील अनेक वर्ष संघर्ष दिला. त्यांचा पुढाकार आणि सततचा पाठपुरावा यामुळे आजचा आनंदाचा दिवस आल्याचे संघटनेचे अध्यक्ष नागेश सहारे यांनी सांगितले.

# हातचलाखी करीत अडीच तोळे सोने लंपास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

तोतया पोलिसांनी हातचलाखी करून एका दाम्पत्याचे अडीच तोळ्यांचे दागिने लंपास केले. ही घटना अजनी पोलिस ठाण्यांतर्गत सकाळच्या सुमारास घडली. पोलिसांनी पीडित विजय महाबुधे (60) रा. हिंगणघाटच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. आरोपी ईरानी टोळीतील असून, वर्धा मार्गाने पळाल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट झाले आहे.

विजय महाबुधे हे मोहता मिलमध्ये अधिकारी होते. काही दिवसांपूर्वीच ते तेथून सेवानिवृत्त झाले. त्यांची मुलगी मानेवाडा परिसरात राहते. त्यामुळे ते पत्नी ज्योती महाबुधे (57) यांच्यासह मुलीची भेट घेण्यासाठी कारने नागपुरात आले होते. सकाळी 11.45 वाजताच्या सुमारास ते अजनी ठाण्यांतर्गत असताना कोणीतरी पाठलाग करीत असल्याचे त्यांना जाणवले.

परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ दुचाकीस्वार 2 आरोपींनी दुचाकी आडवी लावून त्यांची कार थांबवली. पोलिस असल्याची बतावणी करून त्यांना ओळखपत्रही दाखवले. पुढे दागिने लूटपाट करण्याच्या उद्देशातून खून झाला असल्याची माहिती दिली. तसेच तुम्ही एवढे दागिने अंगावर घालून कुठे जात आहात, अंगावरील दागिने काढा आणि खिशात ठेवा, अशी सूचना दिली. घाबरल्यामुळे ज्योती यांनी गळ्यातील सोनसाखळी, नेकलेस आणि अंगठी काढून पतीजवळ दिली.

ते खिशात ठेवत असतानाच आरोपीने त्यांच्याजवळून दागिने घेतले आणि असेच ठेवू नका, पुढे धोका आहे, अशी बतावणी करून दागिने एका कागदात बांधून देत असल्याचे भासविले. या दरम्यान हात चलाखी करीत दागिन्यांऐवजी दगड ठेवून पुडी विजय यांच्याकडे दिली. काही अंतर गेल्यावर विजय यांनी खिशातील पुडी काढून बघितली असता त्यात दगड आढळून आले.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी अजनी पोलिस स्टेशन गाठून घडलेला प्रकार सांगितला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीनचंद्र राजकुमार यांनी घटनेची गंभीर दखल घेतली असून, वर्धा मार्गावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले. आरोपींची ओळख पटली असून ते ईरानी टोळीचे असल्याची माहिती राजकुमार यांनी दिली. पुढील तपास पोलीस करीत आहे.

# आंतरजातीय विवाह आर्थिक सहाय्य योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

सामाजिक समता व समरसता निर्माण करण्याचे दृष्टीने आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही योजना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती व भटक्या जमातिच्या व्यक्तीपेकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सुवर्ण, हिंदू लिंगायत जैन, शिख यांच्यातील असेल तर अशा आंतरजातीय विवाहितास लागू करण्यात आलेली आहे. तसेच या योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यामधील आंतर प्रवर्गामधील आंतरजातीय विवाहितांसाठी आंतरजातीय विवाहाच्या सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. या योजनेमध्ये रक्कम ५० हजार रुपये याप्रमाणे प्रति जोडपे डीबीटी तत्वावर अनुदान देण्यात येते. हे अनुदान विवाहित जोडप्यांचे मूळ कागदपत्राची तपासणी करून त्यांचे संयुक्त बँक खात्यावर पीएफएमएस प्रणालीमार्फत डीबीटीद्वारे प्रदान करण्यात येते. ही योजना जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत नवविवाहित लाभार्थी जोडप्यांना आर्थिक सहाय्य करीत आहे.

विभागामार्फत कुठल्याही नवविवाहितांना दूरध्वनीद्वारे संपर्क केला जात नाही. तरी काही अनोळखी व्यक्ती दूरध्वनी द्वारे आंतरजातीय विवाहित जोडप्यांना आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजनांचे पैसे मिळत असल्याबाबत चुकीची माहिती पसरवित असल्याचे या कार्यालयाचा निदर्शनास आले आहे.

सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून नवविवाहित जोडप्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याची आशंका नाकारता येत नाही. तरी असे फोन आल्यास त्वरित स्थानिक पोलीस स्टेशन व जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयात तत्काळ तक्रार करण्यात यावी, असे आवाहन विभागामार्फत करण्यात येत आहे. या पूर्वी आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजनांचे लाभ दिलेल्या लाभार्थी जोडप्यांची यादी ही जिल्हा परिषद, नागपूर यांची वेबसाईट https://www.»»fagpurzp.com वर उपलब्ध आहे.

# आजपासून लिटाचा द्विदिवसीय जागतिक माजी विद्यार्थी मेळावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲल्युमनी असोसिएशन (लिटा) च्या द्विदिवसीय जागतिक माजी विद्यार्थी मेळावा "कोनेक्ट 24-25" ला शनिवार, 11 जानेवारी पासून एलआयटी विद्यापीठ परिसर, अमरावती रोड, नागपूर येथे प्रारंभ होत आहे.

शनिवारी दुपारी 3 वाजता 15, 25 व 50 व्या बॅचचे रियुनियन व बॅच चॅम्पियनचा सत्कार होणार असून दुपारी 4 वाजता "बॅक टू द अल्मा मेटर" विषयावर पॅनेल चर्चा होईल.

सायंकाळी 6 वाजता होणा-या "बॉलीवूड हंगामा" मध्ये गाण्यांचा जागतिक विक्रम करणारे प्रशांत नासेरी, नाट्य अभिनेत्री अंजली जोशी व गायिका ज्योती नालसे सादरीकरण करतील. रविवार, 12 जानेवारी रोजी सकाळी 10 वाजता "सपनों की एलआयटी युनिव्हर्सिटी" विषयावर तर दुपारी 3 वाजता "फ्रॉम वेलनेस टू वेलबीइंग" विषयावर पॅनेल चर्चा होणार आहे. सायंकाळी 6.30 वाजता ज्वेल अँड युथ आयकॉन पुरस्कार वितरणाचा मुख्य सोहळा होणार आहे.

या कार्यक्रमाला आयसीटी युनिव्हर्सिटी, मुंबईचे पद्मविभूषण प्रा. डॉ. एम. एम. शर्मा, एलआयटी युनिव्हर्सिटीच्या बोर्ड ऑफ गव्हर्नन्सचे अध्यक्ष प्रा.डॉ. जी. डी. यादव, एलआयटी विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ. अतुल वैद्य, प्रमुख सल्लागार मोहन पांडे यांच्यासह एलएज टोटली ऑसम ग्रुपचे सीईओ लोकसारंग हरदास, चैतन्य केमिकल इंडस्ट्रीजचे संचालक संतोष बोरगावकर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑनलाइन संदेशाद्वारे शुभेच्छा देतील.

# प्रो. राजेंद्र सिंह यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १० :

प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी (पीआरएसएसई) तर्फे प्रो. राजेंद्र सिंह यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा जागृत करणे, वैज्ञानिक उपक्रमाला प्रेरणा देणे आणि शहरातील विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञान प्रेमींच्या सर्जनशीलतेला चालना देणे, हा त्यामागील उद्देश आहे.

इयत्ता ७ वी आणि ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तसेच, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या विज्ञान शिक्षकांसाठी १५ ते २२ जानेवारी दरम्यान 'घरी विज्ञान अन्वेषण स्पर्धा' घेण्यात येईल. त्यासाठी सादरीकरण आणि नोंदणीची अंतिम तारीख १३ जानेवारी आहे. त्याच कालावधीत 5 वी ते 8 वीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन गटात व्हिडिओ मेकिंग स्पर्धा, शॉर्ट्स कॉंटेस्ट स्पर्धा आयोजित केली आहे. जाईल. ही स्पर्धा इयत्ता ५वी आणि ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी आणि इयत्ता ७वी आणि ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अशा दोन गटांमध्ये विभागली आहे. लघुपट स्पर्धेसाठीचे अर्ज १६ ते २२ जानेवारी २०२५ पर्यंत स्वीकारले जातील. याशिवाय, शिक्षकांसाठी दोन कार्यशाळा नियोजित करण्यात आल्या आहेत. या दोन्ही कार्यशाळांसाठी नोंदणीची शेवटची तारीख २० जानेवारी २०२५ आहे. सर्वांसाठी मूलभूत खगोलशास्त्र आणि आकाश निरीक्षणावरील फाउंडेशन कोर्स या आभासी कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आहे आहे.

# जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

शैक्षणिक सत्र सन २०२४ - २०२५ या वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे अशा विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते, याबाबत महाविद्यालयास इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिकणारे व पॉलीटेक्नीक तृतीय वर्षात शिकणारे विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी करीता ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज कार्यालयात सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. ही मुदत आता २८ फेब्रुवारीपर्यंत वाढविण्यात येत आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ मधील नियम १८ (५) अन्वये जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला ३ महिन्याचे आत जास्तीत जास्त २ महिन्याचा जास्तीचा कालावधी अशा ५ महिन्यात निर्णय घ्यावा लागतो. व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्याचा कालावधी जुलै, ऑगस्ट व सप्टेबर असा असून व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश प्रक्रियेपूर्वी विद्यार्थ्यांकडे जातवैधता प्रमाणपत्र नसल्यास त्यांना सामाजिक आरक्षणांतर्गत प्रवेश मिळणार नाही. त्याकरीता अर्जदारांचे अर्ज ६ महिन्यापूर्वी समिती कार्यालयाकडे प्राप्त होणे आवश्यक आहे.

जेणे करुन अर्जदाराचे प्रवेश प्रक्रियेपूर्वी त्यांना जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करता येतील व कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचीत राहणार नाही.

कार्यालयात येणारे अर्जदारांची संख्या पाहता व त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही या करीता इयत्ता बारावी विज्ञान व पॉलीटेक्नीक तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना १ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधी पर्यंत जात प्रमाणपत्र पडताळणी करीता अर्ज सादर करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली आहे.

तसेच इयत्ता अकरावी विज्ञान शाखेचे अर्ज १ मार्च २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत स्विकारण्यात येतील.

दिलेल्या वेळेपत्रकानंतर येणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत व त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसानीसाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी, असे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य डॉ. मंगेश वानखडे यांनी कळविले आहे.

## श्री शिवपंचायतन हनुमान मंदिराची पंढरपूर भजनवारी

**नागपूर:** महालातील भोसलावेद शाळेच्या मागे असलेल्या श्री शिव पंचायतन हनुमान मंदिराच्या भजन मंडळाने नुकतेच पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिरात भजन सेवा सादर केली. नविन वर्षाच्या सुरुवातीला श्री विठ्ठल मंदिर समीतीतर्फे या मंडळाला 4 जानेवारी रोजी भजन सेवा करण्याची परवानगी देण्यात आली होती. भजन मंडळात एकंदरीत 18 सेवक सहभागी होते. यशस्वीतेसाठी अनिल साळुंके, गजानन दुबे व राजेन्द्र ढोबळे यांनी मोलाची कामगिरी बजावली. यामध्ये गुणवंत घटवाई, अजीत पाध्ये, अरविंद भारती, वासु पराये, प्रकाश मुठाळ, शैलेश मुठाळ, नरसिकर व मास्टर वलंभ मुठाळ या सर्वांनी भजने सादर केली.

# टेनिस बॉल क्रिकेट, ज्युडो, बॅडमिंटन, पंजाकुस्ती आणि लॉन टेनिस स्पर्धा १३ जानेवारीपासून

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

नागपूर. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सातव्या खासदार क्रीडा महोत्सवांतर्गत सोमवार १३ जानेवारी २०२५ पासून टेनिस बॉल क्रिकेट, विदर्भस्तरीय ज्युडो, विदर्भस्तरीय बॅडमिंटन, पंजा कुस्ती (आर्म रेसलिंग) आणि लॉन टेनिस या स्पर्धांना सुरुवात होणार आहे.

सोमवारी १३ जानेवारीपासून नागपूर शहरातील विविध सहा क्रीडांगणांवर पुरुष खुल्या गटातील टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे सामने सुरु होतील. स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ६ लाख ८४ हजार रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक डॉ. पीयूष आंबुलकर (8928646746) व समन्वयक बादल राऊत (9595338156) यांच्याशी संपर्क साधावा. विदर्भस्तरीय ज्युडो स्पर्धा १३ व १४ जानेवारी रोजी ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालय हनुमान नगर येथे पार पडेल. १९ वषार्खालील, १५ वषार्खालील आणि १२ वषार्खालील मुले व मुलींच्या गटात ही स्पर्धा होणार असून स्पर्धेतील विजेत्यांना एकूण १ लाख १२ हजार २०० रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक सौरभ मोहोड (9579117650) व समन्वयक राजेंद्र सोनकुसरे (9168072347) यांच्याशी संपर्क साधावा. १३ ते १९ जानेवारी या कालावधीमध्ये विदर्भस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ सुभेदार सभागृह रवी नगर येथे होणार आहे. खुला गट पुरुष व महिला, १७ वर्षाखालील, १५ वर्षाखालील, १३ वर्षाखालील, ११ वर्षाखालील आणि ९ वर्षांखालील मुले व मुली तसेच प्रौढ गट ३५ वर्षावरील, ४५ वर्षावरील व ५५ वर्षावरील पुरुष आणि महिला गटात ही स्पर्धा होईल.

स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ४ लाख ५८ हजार रुपयांचे रोख पुरस्कार प्रदान करण्यात येतील. स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीसाठी स्पर्धेचे सह निमंत्रक सचिन देशमुख (9766893380) व समन्वयक शांतनू येरपुडे (8698960440) यांच्याशी संपर्क साधावा. १३ आणि १४ जानेवारी रोजी पंजा कुस्ती (आर्म रेसलिंग) स्पर्धा सक्करदरा तलाव परिसरात पार पडेल.

# महावितरणच्या भरारी पथकाने शोधल्या विदर्भातील २४२१ वीजचोऱ्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

महावितरणच्या नागपूर प्रादेशिक विभागा अंतर्गत सुरक्षा व अंमजबावणी विभागातील भरारी पथकाकडून एप्रिल 2024 ते डिसेंबर 2024 या कालावधीत संपुर्ण विदभार्तील एकूण 7 हजार 984 ग्राहकांची तपासणी करण्यात आली. यापैकी 2 हजार 421 ग्राहकांकडे विजचोरी आढळून आली. या ग्राहकांविरूध्द भारतीय विद्युत कायदा 2003, सुधारीत 2007 च्या कलम 135 अन्वये कारवाई करून तब्बल 17.39 कोटी रुपये किंमतीच्या विजचोरीचे प्रकरणे उघडकीस आणली. याशिवाय विद्युत कायदा 2003 कलम 126 अन्वये व इतर 1 हजार 466 प्रकरणांमध्ये 14.56 कोटी कोटी रुपये किंमतीच्या वीज वापरातील अनियमितता उघडकीस आणली.

वीज चोरीच्या या सर्व प्रकरणांतून एकूण 31.95 कोटी रुपये इतक्या रकमेचे निर्धारण करून त्यापैकी 26.69 कोटी रुपये संबंधीत ग्राहकांकडून वसूल करण्यात आले आहे. तसेच विजचोरीची रक्कम न भरलेल्या 207 वीज ग्राहकांविरूध्द विविध पोलीस स्टेशन मध्ये विजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.



ग्राहकांना अखंडीत व दर्जेदार विज पुरवठा देण्यासाठी महावितरण सातत्याने प्रत्यनशील असतांना विज वितरण हानी व विजचोरीमुळे महावितरणचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असते. सदरचे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी कंपनीमध्ये सुरक्षा व अंमलबजावणी विभाग अविरतपणे काम करीत आहे. कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमजबावणी), मुंबई यांच्या अधिपत्याखाली नागपूर प्रादेशिक विभागा अंतर्गत उपसंचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) यांच्या देखरेखी खाली विदर्भात मंडल स्तरावर 12 भरारी पथके व विभागीय स्तवरावर 3 भरारी पथके तसेच नागपूर व अकोला येथे सुरक्षा व अंमलबजावणी परिमंडल कार्यरत असून त्यांच्यामार्फत्त वीज चोरी विरोधातील ही मोहीम राबविण्यात आली आहे

विजचोरी हा सामाजिक अपराध असुन त्यामुळे महावितरण सोबतच समाजाचे देखील मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याने सर्व नागरिकांनी त्यांच्या परिसरात होत असलेल्या विजचोरीची माहिती स्थानिक भरारी पथके, सुरक्षा व अंमलबजावणी कार्यालये किंवा जवळच्या महावितरणच्या कार्यालयास देण्याचे आवाहन करण्यात आले असून. विजचोरी प्रकरणाची माहिती देण्या-या व्यक्तीस महावितरणकडून यथायोग्य बक्षिस दिल्या जात असून माहिती देण्या-यांचे नाव सुध्दा गोपनीय ठेवले जात असल्याची माहीती देखील महावितरणकडून देण्यात आली आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्रा, कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमजबावणी) सौ. अर्पणा गिते (म.पो.से), उप संचालक श्री सुनिल थापेकर, उप संचालक (सुरक्षा व अंमजबावणी), नागपूर परिक्षेत्र व त्यांच्या अधिपत्यातील सुरक्षा व अंमलबजावणी विभागातील अभियंते, अधिकारी व कर्मचारी हे विजचोरीमुळे महावितरणचे होणारे आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. वीज ग्राहकांनी अधिकृतपणे वीज पुरवठा घेवून सहकार्य करण्याचे आवाहन देखील महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# नायलॉन मांजा व प्लास्टिक पतंग विरोधात कठोर कारवाई

**३० हजार प्लास्टिक पतंग जप्त**
**२५ हजारांचा दंड वसूल**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :

नायलॉन मांजा आणि प्लास्टिक पतंग विरोधात नागपूर महानगरपालिकेने कार्यवाही सुरु केली आहे. प्रतिबंधित नायलॉन मांजा आणि प्लास्टिक पतंगची विक्री करणाऱ्या व्यावयिकांविरोधात मनपाने कठोर कारवाईचा पवित्रा घेतला आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार उपद्रव शोध पथकाद्वारे दहाही झोन स्तरावर कार्यवाहीला गती देण्यात आली आहे.



नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोनमधील उपद्रव शोध पथकाद्वारे नायलॉन मांजा आणि प्लास्टिक पतंग विरोधात राबविण्यात आलेल्या कारवाईमध्ये २८ नोव्हेंबर २०२४ ते ९ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये ४७७ दुकानांची तपासणी करण्यात आली. या कारवाईमध्ये ५ दुकानांवर कारवाई करण्यात आली असून प्रत्येकी ५ हजार रुपये याप्रमाणे २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या कारवाईमध्ये ३० हजार ५०० प्लास्टिक पतंग जप्त करण्यात आल्या, अशी माहिती उपद्रव शोध पथक प्रमुख श्री. वीरसेन तांबे यांनी दिली.

सक्रांतीच्या अनुषंगाने पतंग उडविताना नायलॉन मांजाचा वापर हा मनुष्य तसेच प्राणी व पक्ष्यांसाठी अत्यंत जीवघेणा ठरतो. अडकलेल्या नायलॉन मांजामुळे अनेकांचे जीवघेणे अपघात होण्याच्या घटना घडतात तर त्यात अनेकांना दुर्दैवी रित्या जीव देखील गमवावा लागतो. संक्रातीच्या सणामध्ये आनंदाची देवाण घेवाण व्हावी. त्यातून कुणाच्या जीवाला धोका होउ नये यासाठी नागपूर महानगरपालिकेने नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व हाताळणी विरोधात कठोर पवित्रा घेतला आहे. यात दुकानांची तपासणी करण्यात येत आहे. दुकानामध्ये नायलॉन मांजा आढळल्यास तो साठा जप्त करुन संबंधित दुकानदारावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. यासोबतच प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर करुन तयार करण्यात आलेल्या पतंग देखील पर्यावरण व मनुष्य आणि पक्षी, प्राण्यासाठी धोकादायक आहेत. त्याविरोधात देखील मनपाद्वारे कारवाई करण्यात येत आहे. नागरिकांनी देखील जबाबदारीने सणाचा आनंद साजरा करावा. स्वतः किंवा घरातील मुलांना पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर करण्यास प्रवृत्त करू नये. नायलॉन मांजा मानवासह पक्षी आणि प्राण्यांसाठी किती घातक आहे.